साप्ताहिक

# माणूस

८ सप्टेंबर ८२
दोन रूपये


## शिरर लिहितो ......

## गांधींनी माघार घेतली.........
## पण ही पुढील विजयाची नांदी होती.......

## महात्मा आणि माणूस



..........जेव्हा युरी गिलरला जमालगोटा मिळतो
त्याची गोष्ट
कोण हा युरी गिलर?



## राजीव गांधींना 'सूर्य' नको होते काय?

# माणूस

▫

वर्ष : बाविसावे

अंक : तेरावा

४ सप्टेंबर १९८२

किंमत : दोन रुपये

▫

संपादक

श्री. ग. माजगावकर

▫

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

▫

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

▫

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

▫

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

▫

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

▫

मुखपृष्ठ

अनंत सालकर

▫


# स्वातंत्र्य आणि जबाबदारी

बिहार सरकारने समत केलेल्या वृत्तपत्र नियंत्रण विधेयकाविरुद्ध देशभर निषेधाच्या लाटा उठत आहेत. गेल्या वर्षी तामिळनाडू शासनानेही अशा स्वरूपाचे विधेयक संमत केले होते. पण दक्षिणेकडचा विषय सहजासहजी भारतव्यापी ठरत नाही असा नेहमीचा अनुभव आहे. तामिळनाडू विधेयकाची त्यामुळेच गंभीरपणे दखल घेतली गेली नसावी. पण बिहारच्या विधेयकाने चागलाच पेट घेतला आहे व शक्यता अशी दिसते की, केंद्र सरकारला प्रभावी लोकमतापुढे नमते घ्यावे लागेल, आहे त्या स्वरूपात तरी या विधेयकाला केंद्राची मान्यता मिळणार नाही. पाटण्यातील पत्रकारांच्या मोर्चावर लाठीहल्ला झाल्यामुळे तर वातावरण अधिकच प्रक्षुब्ध झाले आहे, मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रावर बिहारच्या राज्यपालापासून सर्वजण कडक टीका करीत आहेत. देशभरची वृत्तपत्रे, वृत्तसंस्था, विरोधी राजकीय पक्षच नव्हेत तर खुद्द इंदिरा कॉंग्रेस पक्षाचे काही खासदार – आमदारही या विधेयकाला विरोध करण्यासाठी पुढे आलेले आहेत. नभोवाणी मंत्री श्री. वसत साठे यांची अलिकडील वक्तव्ये पाहता, तेही या विधेयकाला अनुकूल नसावेत असे दिसते. तरीही आहे त्या स्वरूपात विधेयकाला केन्द्राची मान्यता मिळाली तर बिहारमधील पत्रकाराना आपला व्यवसाय मोकळेपणाने करणे अशक्य होणार आहे, हे अगदी स्वच्छ आहे. या विधेयकामुळे वदनामी हा दखलपात्र व जामीन न मिळू शकणारा गुन्हा ठरणार आहे व कुठलाही मंत्री, राजकारणी, कोणाही पत्रकाराला, केव्हाही १०।१५ दिवस तरी सहज विनाचौकशी पोलीस चक्रात अडकवू शकणार आहे; त्याचा या चक्रात वेडावाकडा छळ होण्याची शक्यता, विशेषत. बिहारसारख्या अधाधुंद राज्यात तर खूपच आहे. या तरतुदीमुळे बिहारमधील पत्रव्यवसायच धोक्याचा व पत्रकाराना सतत धास्ती वाळगायला लावणारा ठरणार आहे. ही धोक्याची – धास्तीची सततची टागती तलवार, हे स्वतंत्र पत्रकारितेवरील गभीर संकट आहे, आज जे बिहारमध्ये घडले ते उद्या इतरत्रही घडू शकते म्हणून देशभरचे पत्रकार, पत्रकार संस्था आज खडबडून जाग्या झाल्या आहेत, सर्वांनी एकमुखाने बिहारच्या संकल्पित विधेयकाविरुद्ध आपला विरोध प्रभावीपणे नोंदला आहे, बिहारच्या पत्रकारामागे आपले सर्व बळ उभे केले आहे. असे घडायला हवेच होते. एकेका राज्यातून स्वातंत्र्याचा आवाज असा दडपत जाऊन, मागील दाराने, वेगळ्या पद्धतीने आणीबाणी सदृश्य स्थिती उत्पन्न करण्याचा राज्यकर्त्यांचा प्रयत्न असलाच तर त्याला सुरुवातीपासूनच असा जागोजाग पायबद घातला जाणे केव्हाही चागले व पत्रव्यवसायाला भूषणास्पदच आहे. मागेही बिहारनेच पुढाकार घेतला, जयप्रकाशांनी बिहारमधनच देश हलवला व एका हुकुमशाही पर्वाचा अस्त घडवून आणला. पुन्हा तोच मान, तेच

पुढारपण बिहारला लाभत आहे. पुढचे आजच कसे सांगता येणार? केंद्राची दडपशाही वाढत आहे, असतोषही वाढतो आहे. त्यावेळी अपवादात्मक परिस्थितीत पोलिसानी – सैनिकांनी वरिष्ठाचे अन्यायकारक हुकुम पाळू नयेत, निरपराध स्वबाधवांवर गोळ्या चालवण्यास नम्रतापूर्वक नकार द्यावा, असे जयप्रकाशाना सांगावे लागले होते. आता महाराष्ट्र–हरयानातले पोलीस उघड उघडच बेशिस्ती दाखवत आहेत. ज्या तऱ्हेने गिरणी कामगारांचा संप हाताळला जात आहे, त्यामुळे मुबई-सारख्या भारताच्या औद्योगिक राजधानीतला कामगार वर्ग निश्चितच अपमानित आणि दुखावला गेलेला आहे. असंतोषाची कमान अशीच वाढत गेली तर आज हतबल व फाटाफूट झालेले विरोधीपक्षही, परिस्थितीच्या रेटयामुळे संघटित होणारच नाहीत असे नाही. ७७ ची पुनरावृत्ती नाही, तरी दिल्लीला चांगली धडक तरी बसू शकेल. दशकाचा पूर्वार्ध नेहमी इंदिरा गांधी गाजवतात. उत्तरार्ध विरोधकाकडे असतो. ६७, ७७ साली याप्रमाणे इजा आणि बिजा झालेले आहे. तिजा कशावरून होणार नाही? बिहारने या तिजाचे पहिले प्रकरण लिहिले आहे. पुढची प्रकरणे कोण कशी लिहितो की लिहीत नाही, की, लिहायची गरजच पडणार नाही, हे पाहायचे !

¤

स्वातंत्र्याला जबाबदारीची जोड हवी, स्वातत्र्य म्हणजे स्वैराचार व बेबदपणा नाही, हेही याचवेळी ध्यानात ठेवले पाहिजे. अनिर्बंध स्वातंत्र्य कोणालाच, कुठल्याच समाजव्यवस्थेत असू शकत नाही, पत्रकारानेही तशी अपेक्षा बाळगू नये. स्वातंत्र्याचा दुरुपयोग बिहारच्या काही पत्रकाराकडून झालाच नसेल असे आपण ठामपणे म्हणू शकतो का? मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यानी एक उदाहरण दिले आहे. मिश्रांनी म्हणे कुणा मात्रिकाने सागितल्यावरून बारा बोकड कापले व त्या रक्ताने आंघोळ केली, अशी धादांत खोटी बातमी एका वृत्तपत्राने छापली. मिश्रा पूर्ण शाकाहारी आहेत. ते म्हणतात, मी असले काही करणे स्वप्नातही शक्य नाही. मग कसलीही शहानिशा करून न घेता अशा बातम्या छापणे हा वृत्तपत्रस्वातंत्र्याचा दुरुपयोगच नाही का? पत्रकाराच्या सघटनानीच असल्या दुरुपयोगाला योग्यवेळी, योग्य प्रकारे पायबंद घातले पाहिजेत, म्हणजे राज्यकर्त्यांनाही पत्रकारांवर ठपका ठेवण्याची, त्यांच्यावर बंधने लादण्याची संधीच मिळणार नाही. बिहारातच कशाला? महाराष्ट्रातही असे अधुनमधून घडतच असते. मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांना राजकीय पातळीवरून प्रखर विरोध करणे समजू शकते. पण त्यांच्या सुनेचे प्रकरण उकरून त्यांना त्रास देणे हे असंस्कृतपणाचे लक्षण आहे. वृत्तपत्रांनी सद्भिरुची, सुसंस्कृतपणाची बधने स्वतःहूनच आपल्यावर घालून घेतली तर जगन्नाथ मिश्रा याच्यासारख्या भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांशी ती अधिक समर्थपणे टक्कर देऊ शकतील. किती पत्रकार सरकारी वा इतर प्रकारच्या मिंधेपणापासून स्वतःला प्रयत्नपूर्वक दूर ठेवू शकतात? अंतुल्यांनी ओबेरॉय शेरेटनमध्ये योजलेल्या लहान व मध्यम वृत्तपत्रांच्या मेळाव्याला गर्दी करणाऱ्यांनी, फुकटच्या एस्. टी. प्रवासासारख्या भुक्कड सवलतीसाठीसुद्धा धडपडणाऱ्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याची मागणी जरूर करावी. पण त्याच वेळी त्यातला पोचटपणा, नकलीपणा व विसंगतीही ध्यानात असू द्यावी. खाण्यापिण्याशिवाय आणि अनेकदा भेटवस्तूही दिल्याघेतल्याशिवाय पार न पडणाऱ्या पत्रकारपरिषदा, हा काय सगळा वृत्तपत्रस्वातंत्र्याचा आविष्कार समजायचा? अशा आविष्कारापासून दूर राहणारे तरूण पत्रकारही आहेत, हे खूप आशादायक आहे. मुंबईचे अरूण साधू, हेमंत देसाई, पुण्याचा सतीश कामत, मुकुंद संगोराम ही सहज आत्ता आठवणारी काही नावे. अशाची संख्या वाढली, पत्रकारानीच काही नैतिक – व्यावसायिक आचारसंहिता ठरवून, ती आचरणात आणण्याचा परिपाठ ठेवला तर वृत्तपत्रस्वातत्र्य असे वरचेवर धोक्यात येणारही नाही. आणि आलेच तर त्याविरुद्ध उठवायचा वृत्तपत्राचा आवाज पुरेसा प्रामाणिक व म्हणूनच परिणामकारकही असेल. स्वातंत्र्य आणि स्वयंशासन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

—श्री. ग. मा.

मुंबई वार्ता

## जनांचा असहाय्य प्रवाहो

दिनांक–१८ ऑगस्ट १९८२.
मुक्काम–मुंबई.
वेळ–सकाळी ९॥ ते १० च्या दरम्यान.

गच्च भरून वाहणारी उपनगरी. रेल्वेची निरनिराळी स्टेशनं. घड्याळाचे नियमित सरकते काटे. झगमगत्या विद्युत्इंडिकेटर्सचे तपशील हरवलेले, आणि एकच लाल पट्टी सगळ्यांच्या कपाळी लिहिलेली, गाडियाँ समयानुसार नहीं है, ट्रेन सर्विस डिस्ऑर्गनाइज्ड.

नाही म्हटलं तरी सकाळपासून पाऊस भुरभुरतोय. रात्रीतूनही बराच पडून गेला असावा. रुळमार्गावर साठणारं पाणी, दगा देणाऱ्या विजेच्या तारा, म्हणजे गाड्यांना सर्दी पडसं व्हायचंच. माणसं अगदी समजूतदार विचार करतात आणि गाड्याची गर्दी बस स्थानकांना रांगा लावण्यासाठी वळते.

गर्दी कोलाहलातून अस्पष्ट घोषणा कानी

येते. दादरला काही गडबड झाल्यामुळे गाड्या केवळ वांद्र्यापर्यंतच जातील. दादरला गडबड म्हणजे पश्चिम आणि मध्यरेल्वेचं भवितव्य एकच म्हणायचं. शिवाय बसनं जाण्यात तरी अर्थ काय ? गाडीनंच गेलेलं बरं. ती जिथे आणि जेव्हा पोचवेल तिथे जाऊ. स्टेशना-स्टेशनावर लहान-मोठ्या गटातून चाललेल्या चर्चा–

मुख्य रहस्य म्हणजे ही नव्यानंच दादरला उपटलेली गडबड काय झालं असावं ? मग कोणी तरी 'रास्ता रोको' शब्द सोडून देतं. *आता कोण बरं रोकणार रास्ता ?* हे नक्की गिरणीकामगारच असले पाहिजेत !

पण त्यांना रस्ते अडवून काय मिळणार ? एक संतप्त पृच्छा.

ते तरी बिचारे काय करणार ? महिनोन महिने काम–धंदा नाही काही तरी करणारच की ते. एकूण सर्व सूर सहानुभूतीचा.

आमच्याकडे चालत उशीर झाला तरी. कधी तरी ऑफिसला पोचलं म्हणजे झालं.

अहो, तो झाला तुमचा सरकारी खाक्या. आमच्याकडे उशीर झाला तर म्हणतील घरी जा !

गोगलगायीहूनही मंद गतीनं चालणाऱ्या गाड्या. वांद्रा आणि कुर्ला स्थानकावरची अफाट गर्दी. उपनगरी आणि बाहेरच्या गाड्या इथेच येऊन थांबताहेत किंवा माघारी वळताहेत आतापर्यंत पश्चिम रेल्वे आणि मध्यरेल्वेची मेन लाइन पूर्णपणे बंद पडल्याचं स्थानकावरून सांगितलं जातंय; पण ऑफिसवाल्याच्या उत्साहाला तोड नाही. अजून मध्यरेल्वेची हार्बर लाइन तर चालू आहे ना ? मग झालं तर. इंच-इंच लढवू आणि ऑफिसला पोचू. गोंधळाच्या दिवसाचं वेळापत्रक तसं रम्य असतं. १२, १, २ कधीही ऑफिसला जावं. मस्तपैकी मस्टरवर सही ठोकून दिवसाचं सार्थक करावं. तोपर्यंत लंच टाइम होतोच. मग सुख–दुःखाच्या गोष्टी कराव्या कहाण्या सांगाव्या. ऐकाव्या. चार वाजता ऑफिस सुटतंच. तोपर्यंत गोंधळही थोडा कमी होतो. असा एक बिनकामाचा दिवस आणि बदल म्हणजे झकास !

आतापर्यंत वांद्रा-कुर्ल्याहून परत फिरणाऱ्या गाड्या भरभरून चालल्यात. त्याच्यातली माणसं उत्साही आरडाओरडा करून बाकीच्यानाही परतायला सांगताहेत. प्रसंगाचं गांभीर्य अजून कळलेलं नाही.

बारा वाजताहेत.

सगळ्या वाहतूकव्यवस्थेचे आता मात्र पुरे बारा वाजल्याचे लक्षात येतंय. 'गाडियां नही चल रही है. अशा निर्णायक घोषणा. रेल्वेस्थानकं, गाड्या, रेल्वेमार्ग, बसेस, टॅक्सी, खासगी वाहनं, रस्ते, माणसं आहेत त्या ठिकाणी साचून राहिली आहेत.

सँडहर्स्ट रोड, मस्जिदहून चालत येणारी माणसं ऑफिसात पोचतात आणि खळबळीची सुरुवात होते. एव्हाना साजवर्तमानपत्रं बाहेर पडली आहेत. पोलिसाच्या बंडामुळं मुंबईचं जनजीवन उध्वस्त झालंय ही एक नवीच धक्कादायक बातमी कानावर पडते आहे. पण वृत्तपत्रामधल्या बातम्या अपुऱ्या आहेत. आकाशवाणीच्या बातम्या तर त्याहून सयत आहेत.

गोंधळ बराच रंगीत-संगीत असला पाहिजे. सकाळी ९ वाजताच ऑफिसमध्ये पोचणाऱ्याना आता खडबडून जाग येते आहे. घबराटीचं वातावरण पसरलंय. दुकानं-उपहारगृह भराभरा बंद होताहेत. माणसं घोळक्या-घोळक्यांनी चर्चा करताहेत.

अशातच ऑफिसंही सोडली जातात.

आता एकच ध्येय. घरी जायचं. होम, स्वीट होम. दूर उपनगरात राहिलेलं. पंधरा-वीस–पंचवीस किलोमीटर लांब असणारं– आपलं हक्काचं घर, आपला निवारा.

पण जायचं कसं ?

एकही गाडी नसणाऱ्या वाझ चर्चगेट आणि व्ही. टी. स्थानकांचे परिसर माणसांनी वाहून चाललेत. क्वचित सुटणारी गाडी. तिच्यावर होणाऱ्या दगडफेकीचं वृत्त. मरणाची गर्दी. बस नाही, टॅक्सी नाही, खाजगी वाहन कोण बाहेर काढणार ?

घरी काळजी करत असतील. फोन करायला पाहिजे. बायकोच्या ऑफिसमध्ये. मुलाच्या शाळेत.' ते कुठे आहेत ? मी अजून तरी सुरक्षित आहे हे त्यानाही जाणून घ्यायचं असेल.

फोन ? सॉरी, रॉंग नंबर.

फोन चालू नाहीत. सार्वजनिक फोनपुढे लागलेल्या रांगा आठ आणे फुकट घालवून निराशपणे फोन ठेवणारी माणसं.

मुंबई बेट तर खरंच. घराला ऑफिसपासून तोडणारं. माणसाला माणसापासून तोडणारं.

घरी जायचा एकच निश्चित मार्ग माहीत आहे. चालत जाणं. चरति चरतो भगः !

भाग्य वगैरे काही उदयाला येत नव्हतं. फक्त पायाला फोड येत होते. मनावर भीतीचं जबर सावट होतं. सकाळपासून बरोबर आलेले जेवणाचे डबे निरर्थकपणे बॅगेत पडले होते आणि पोटात भूक लागली होती.

पावलं चालत होती, रेंगाळत होती, पळत होती. फोर्टपासून दादरपर्यंत, कुर्ल्यापर्यंत, विक्रोळीपर्यंत, पाय नेतील तिथवर माणसं चालत होती. व्ही. टी. पासून बॅलार्डपियरपर्यंत आणि चर्चगेटपासून हॉर्निमन सर्कलपर्यंतसुद्धा बसनंच जाणारे मुंबईकर आज थव्या–थव्यानं चालत घरी निघाले होते. रस्ते माणसांनी फुलून गेले होते. आजू-बाजूच्या घराच्या खिडक्या, गॅलऱ्या या माणसांना बघण्यासाठी दाटीवाटीनं उभ्या होत्या.

माहिमला इमारतीतून दगडफेक होत होती.

माटुंग्याला काही तरुण मुलं चालणाऱ्यांना पाणी, कॉफी, कुणी चुरमुरे वाटत होतं.

एल्फिन्स्टनरोडला एकजण बसून पाणी विकत होता.

चर्चगेटला डोक्यांचा आकार तळहाताएवढा झाला होता आणि कपातल्या चहाची पातळी निम्म्यावर आली होती.

हा टॅक्सीवाला अंधेरीपर्यंत जायला मीटरप्रमाणे पैसे घेईन म्हणतोय.

हा टॅक्सीवाला दरडोई तीस रुपये मागतोय. बसेस, ट्रक्सना लोंबकाळून माणसं चाललीत. त्या टॅक्सीच्या टपावर माणूस बसलाय याचा बहुधा आतल्या माणसाना पत्ता नसावा.

रेल्वेगाड्याची अवस्था याहूनही वाईट आहे.

महिलांचा पहिल्या वर्गाचा डबा.

पहिल्या वर्गाचा तर तो राहिलेला नव्हताच; पण नंतर तो केवळ महिलांचाही राहिलेला नाही. अन–जेन्टल असलेल्या जेन्ट्सची गर्दी. सहेतुक–अहेतुक. धक्के, चिमटे, अश्लील शेरे, गाणी.

स्त्रियानी तक्रार केल्यावर–'गप्प बसा. आम्ही काय तुमच्यावर बलात्कार करतोय?' असं साळसूद उत्तर.

डोळ्यादेखत होणारी दुकानांची लुटालूट,

वाहनांची जाळ-पोळ. रोरावत येणाऱ्या सैनिकी गाड्या. गोळीबार. अगदीच दुर्दैव असेल, तर तुम्हालाच अडवून सुऱ्याच्या धाकानं केलेली पैशाची मागणी गणपती आहे ना !

निराधार, निरपराध माणसं. थकलेली माणसं, लहान मुलं, वृद्ध, गरोदर स्त्रिया, आजारी, अपंग.

एक जण म्हणे चालून इतका दमला की, पोद्दार रुग्णालयात शिरताच मरण पावला !

एकजण वांद्र्याच्या खाडीत पडला. स्वतः थांबून त्याला कोण बाहेर काढणार ?

किती दुकानं लुटली ? वाहनं जाळली ? किती माणसं गोळीबारात मेली ? किती जखमी झाली ? चारापासून चारशेपर्यंत सगळे आकडे पुढे येताहेत. नंतर बातमी येते की, आकाशवाणी बंडखोरांनी काबीज केली. घबराट वाढतेय. अफवा पसरताहेत. सरकारी पत्रकं भिंतीवर निरर्थकपणे फडफडताहेत— —'डोण्ट स्प्रेड रूमर्स-अफवाएं खतरनाक हैं!' पण सत्य काय आहे ?

तीन वाजल्यापासून दहा वाजेपर्यंत चालून घरी आल्यावर जे काय सत्य असेल ते जाणून घेण्याचीही हिंमत आणि इच्छा आता राहिलेली नाही. आपल्याच घराची खिडकी उघडतानासुद्धा भीती वाटतेय, एखादा दगड तर नाही यायचा भिरभिरत ? हे सत्य आहे का असत्य कोण जाणे; पण शक्य आहे एवढं मात्र खरं.

शिवाय सत्य म्हणजे एक नंबरची चलाख सुळसुळीत गोष्ट. त्यात त्याला बहुविध पैलू असण्याचा हक्क पण असतो. सत्याचे अपासून ज्ञपर्यंतचे हे सगळे पैलू आता साप्ताहिक, पाक्षिक, मासिकांच्या खास पुरवण्या आणि खळबळजनक स्पेशल रिपोर्टातून बाहेर पडतीलच.

१८-१९ ऑगस्टचा मुंबईतला हलकल्लोळ म्हणजे महाभारत आहे, ज्याच्या घडण्यामागे अनेक कारणं आहेत. माजी मुख्यमंत्र्यांनी पोलिसांच्या दुफळीला लावलेला हातभार. पोलिसदलातली बेदिली. अन्यायग्रस्त पोलीस. शस्त्रागार ताब्यात घेण्याच्या पोलिसांच्या कटाचा सरकारला लागलेला सुगावा ही पार्श्वभूमी. त्यांना धडा शिकवण्यासाठी मागवलेलं सैन्य, सी. आर. पी. एस. आर. पी. ही अधिकाऱ्यांची कृती टेकीला आलेले गिरणीकामगार आणि रिबेरोंच्या कडक कारभारामुळे दबलेले आणि संधीची वाटच पहाणारे गुंड हे कदाचित लक्षात न घेतलेले घटक परिणाम !

पोलिसांना मिळालेला धडा, त्यासाठी नागरिकांनी सोसलेले हाल. आपण लोकशाही राष्ट्रात रहात नसून एखाद्या हुकुमशाही राजवटीत रहातो आहोत असं वाटायला लावणारं भय तणाव. शारीरिक, मानसिक, आर्थिक झीज.

राज्यकर्त्यांनी, अधिकाऱ्यांनी आपले डाव फार काळजीपूर्वक आखले होते म्हणतात. पोलिसांमधल्या बंडाची शक्यता ध्यानात घेऊन त्याचा आधीच बीमोड करण्यासाठी केलेल्या योजना. धो-धो पावसात आसाम गारठलेला. त्यामुळे मोकळं झालेलं सुरक्षादल गणपतीउत्सवाआधीच उपलब्ध होऊ शकणारं आंध्रचं सुरक्षादल या दोन्हीचं पाठबळ पण मुंबईच्या गल्ली-बोळाला परकी असणाऱ्या या दलानी गुंडगिरीवर ताबा मिळवेपर्यंत बरंच काही घडून गेलं होतं. दुसऱ्या दिवशी गोंधळ अपेक्षित असताना या गुंडांना आदल्या दिवशीच प्रतिबंधक उपाय म्हणून पकडलं नाही, कारण त्यामुळे म्हणे पोलीस सावध झाले असते !

राज्यकर्ते असोत, राजकीय पक्ष असोत, शासकीय नोकर, गिरणीकामगार असोत की गुंड असोत, कुणाचीही कुणाशीही मारामारी चालो; बळी पडते ती सामान्य जनता. प्रत्येक वेळी ओलीस धरला जातो तो असल्या घटनांशी काहीही संबंध नसणारा नागरिक. त्याचं जीवित आणि वित्त हे असं का ?

'अशी मुकी बिचारी, कुणीही हाका, असली परिस्थिती नागरिकांवर का आणली जाते ?

दहा-बारा वर्षांपूर्वी 'बंद' इत्यादीचा जमाना ऐन भरात होता, तेव्हाची गोष्ट. 'गंमत-जंमत' मध्ये तेव्हा नेहमी एक गाणं लागत असे—आज हे बंद, उद्या ते बंद आम्ही मुले मुले आमचा काय संबंध ?

सामान्य नागरिकही हाच प्रश्न विचारतो आहे. तसा तो निष्पाप वगैरे मुळीच नाही; पण असल्या भल-भलत्या संदर्भात तो निरपराध आहे, त्याचा त्यांच्याशी काही संबंध नाही हे मात्र नक्की. मग का म्हणून त्याला पटावरच्या प्याद्यासारखं वापरलं जावं ?

हे कदाचित फार अतिरंजित, भावुक वगैरे वाटण्याची शक्यता आहे.

पण १८ ऑगस्टला निमूटपणे चालणारा जनांचा विशाल, तरीही असहाय प्रवाहो ज्यानं पाहिला आहे, अनुभवला आहे, त्याला हे नक्कीच भिडेल

—ललिता बर्वे


मला स्वतःला व्हायोलन्सचा अत्यंत तिटकारा आहे. तुम्हाला सांगितलं तर आश्चर्य वाटेल 'टॉर्चर्स' पाहणं मला असह्य होतं. मी दिग्दर्शित केलेल्या नाटकातले प्रसंग मी विंगेतूनसुद्धा पाहू शकत नाही.

गप्पा

कमलाकर सारंग / सुरेश खरे

माणूस

११ सप्टेंबर अंकात

## परराष्ट्र

# अरब–इस्राइल संघर्ष

## लेबानन युद्धाचे फलित

वा. दा. रानडे

लेबाननमधील पॅलेस्टिनी अरबांना अखेर संपूर्ण स्थलांतर करावे लागले. युद्ध सुरू करण्यामागचा इस्राइलचा मुख्य उद्देश साध्य झाला. पॅलेस्टिनींचा सर्वांत मोठा तळ पश्चिम बेरूटमध्ये होता. इस्राइली फौजांनी त्यांना वेढा दिला होता. पॅलेस्टिनींना लेबानन सोडून दुसरीकडे जाऊ द्यावयाचे की, पश्चिम बेरूटमध्ये त्यांच्यावर मोठा हल्ला करून त्यांचा पूर्ण संहार करावयाचा यावर इस्राइलच्या नेत्यांत दोन तट पडले होते; पण अखेर त्यांना स्थलांतर करू देण्यास इस्राइलने संमती दिली. अमेरिका, फ्रान्स आणि इटली यांच्या आंतरराष्ट्रीय सुरक्षादलाच्या देखरेखीखाली हे स्थलांतर झाले. पॅलेस्टिनी अरब पूर्णपणे निघून गेल्यानंतरच इस्राइलच्या फौजा लेबाननमधून काढून घेण्यास सुरुवात होईल ही इस्राइलची अट पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेस मान्य करावी लागली.

लेबाननमधून इस्राइल हद्दीत होणाऱ्या पॅलेस्टिनी गनिमांच्या हल्ल्यांचा धोका पूर्णपणे नाहीसा करण्यात इस्राइलने यश मिळविले हे खरे; पण त्याचे यापुढे धोरण काय राहील ? तसेच पॅलेस्टिनी अरबांचा प्रतिकार पूर्णपणे मोडला गेला असे म्हणता येईल का? त्यांचे पुढचे पवित्रे काय राहतील ? अरब–इस्राइल संघर्ष मिटण्यास या युद्धाने काही मदत झाली की, संघर्ष अधिक तीव्र होणार आहे ? हे प्रश्न यापुढे महत्त्वाचे आहेत.

इस्राइलने १२ ऑगस्टला बेरूटवर केलेली तुफान बॉंबफेक आवश्यक नव्हती. कारण लेबाननमधून बाहेर पडण्याचे पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेच्या नेत्यांनी त्यापूर्वीच मान्य केले होते. देखरेखीसाठी आंतरराष्ट्रीय सुरक्षादल बेरूटमध्ये प्रथम येऊ द्या, मग आम्ही बाहेर पडतो हा आग्रहही त्यांनी सोडला होता. पॅलेस्टाइन मुक्तिसंघटना आपली ठाणी लेबानी सेनेच्या स्वाधीन करील हेही त्यांनी मान्य केले होते. इस्राइलच्या युद्धात अमेरिकेची त्यास मदत होती; पण बेरूटवरील १२ ऑगस्टच्या बॉंबफेकीनंतर आता आपण इस्राइलला आवरले नाही तर जागतिक लोकमताचा आपल्यावर क्षोभ होईल असे रेगन यांना वाटू लागले आणि युद्ध थांबविण्यासाठी त्यांनी इस्राइलवर दडपण आणले. त्यामुळेच काही मागण्यांबाबतचा आग्रह इस्राइलने सोडला. बेरूट सोडणाऱ्या पॅलेस्टिनी गनिमांची फोटोसह पूर्ण यादी पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेने आपल्याला सादर करावी ही मागणी इस्राइलने सोडली. अर्थात या याद्या इस्राइल मिळविणार नाही असा याचा अर्थ नाही. पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेने लेबानी अधिकाऱ्यांना याद्या द्याव्यात, त्यांच्याकडून त्या ख्रिश्चन मलेशियाच्या हाती पडतील आणि त्यांच्याकडून इस्राइलला त्या मिळतील.

पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेने ७१०० पॅलेस्टिनी अरबांची यादी अमेरिकेचे अध्यक्ष रेगन यांचे दूत फिलिप हबीब यांच्याजवळ दिली होती; पण १९४८साली निर्वासितांच्या पहिल्या लाटेत जे पॅलेस्टिनी लेबाननमध्ये आले त्यांचा यात समावेश आहे का हे स्पष्ट झाले नव्हते. या लोकांनी लेबाननमध्ये राहण्यास लेबाननची हरकत नव्हती. या ७१०० जणांच्या यादीत पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेच्या फताह विभागाच्या नियंत्रणाखालील पथके आहेत, म्हणजेच सीरियातून लेबाननमध्ये आलेली दारमुक ब्रिगेड त्यात आहे, तसेच जॉर्डनमधून आलेल्या बद्र बटालियनचा त्यात समावेश आहे.

लेबाननमधून बाहेर पडलेल्या पॅलेस्टिनी अरबांपैकी निम्मे सीरियात गेले, १२०० जॉर्डनमध्ये व १००० इराकमध्ये गेले. पॅलेस्टाइन मुक्तिसंघटनेचे मुख्य ठाणे ट्युनिशियात ट्युनिसमध्ये हलविण्यात आले असून त्यांचे नेते यासीर अराफत तिकडेच गेले असल्याची बातमी आहे. फताह संघटनेचे एक हजारावर गनिमी सैनिकही प्रथम सीरियात जाऊन नंतर ट्युनिशियालाच जाणार आहेत. त्यांच्यातले अधिक कट्टर गट अल्जीरिया व दक्षिण मेयेनला जातील. एकवीस ऑगस्टच्या मध्यरात्रीपासून सुरू झालेले हे स्थलांतर ४ सप्टेंबरपर्यंत पुरे व्हावयाचे आहे

बेरूटमधील पॅलेस्टिनी अरबांच्या स्थलांतराने लेबाननमध्ये टिकाऊ शांतता प्रस्थापित झाली असे एवढ्यातच म्हणता येणार नाही उत्तरेकडच्या ट्रिपोली शहरात तसेच सीरियाचे नियंत्रणाखालील बेकाखोऱ्याच्या उत्तर भागात तीन हजार ते चार हजार पॅलेस्टिनी गनिमी आहेत. याशिवाय पंचवीस हजार सीरियन सैनिक या टापूत आहेत. लेबाननमधून त्यांचीही हकालपट्टी झाली पाहिजे अशी इस्राइलची मागणी आहे. बेरूटमधील स्थलांतर पूर्ण झाल्यावर इस्राइल त्यासाठी आग्रह धरील आणि जरूर तर हल्ले करून आपली मागणी पदरात पाडून घेईल. लेबानन सरकारच्या विनंतीनुसारच सीरियन सैनिक लेबाननमध्ये गेले होते; पण लेबानन सरकारला आता त्यांची आवश्यकता नाही. लेबाननचे नवे अध्यक्ष गेमायेल पूर्णपणे इस्राइलच्या बाजूचे आहेत. युद्धात उध्वस्त झालेल्या बेरूटची पुनः उभारणी


वैराण मुलखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

मूल्य : रुपये पंधरा

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पुणे ३०

करण्यासाठी इस्राइलने लेबाननला मदत करण्याची तयारी दर्शविली आहे. त्या देशाशी असलेला व्यापारही इस्राइल वाढविणार आहे. लेबाननवर इस्राइलची पकड राहील आणि सीरियापासून इस्राइलला वाटणारा धोकाही नाहीसा होईल.

बेरूटमधून बाहेर पडावे लागले तरी पॅलेस्टाइन मुक्तिसघटना संपली, तिचा प्रतिकार संपला असा त्याचा अर्थ नाही. पॅलेस्टिनीचे स्वतंत्र राज्य स्थापण्यासाठी आमचा लढा चालूच राहील असे संघटनेच्या नेत्यांनी जाहीर केले आहे. संघटनेत कट्टर लढाऊ गटाचा जोर आता वाढेल. गनिमांच्या दहशती हल्ल्यातही वाढ होण्याची शक्यता आहे. आपल्या पराभवाचा धडा घेतला पाहिजे ही भावनाही वाढीस लागेल.

आतापर्यंतच्या सर्व युद्धात इस्राइलमध्ये जी एकजूट दिसून आली होती ती या वेळी दिसली नाही. युद्धाविरुद्ध इस्राइलमध्येच निदर्शने झाली. हे अंतर्गत संघर्ष यापुढे वाढत जाण्याचा संभव आहे. पंतप्रधान बेगिन आणि संरक्षणमंत्री शॅरॉन यांच्यातही संघर्ष असून शॅरॉन यांची पंतप्रधानपद मिळविण्याची आकांक्षा आहे. नेतृत्वातील या संघर्षाशिवाय युरोप–अमेरिकेत जन्मलेले इस्राइली आशिया-आफ्रिकेत जन्मलेले इस्राइली आणि इस्राइलमध्येच जन्मलेले इस्राइली यांच्यातही संघर्ष आहे. त्यांच्या विकासात तफावत व विषमता आहे. युरो–अमेरिकन इस्राइलीपेक्षा सर्व क्षेत्रात आपण मागे आहोत ही भावना आशिया-आफ्रिकेतून आलेल्या इस्राइलींमध्ये आहे. लोकसंख्यावाढीचे प्रमाण त्यांच्यात जास्त असून सत्तेत व विकासात आपणास योग्य वाटा मिळायला हवा अशी त्यांची मागणी आहे. या अंतर्गत संघर्षांना इस्राइलच्या नेत्यांना तोंड द्यावे लागणार आहे.

बेरूटमधून पॅलेस्टिनी अरबांची हकालपट्टी करण्यात इस्राइलने यश मिळविले असले तरी पॅलेस्टिनींचे स्वतंत्र राज्य झाल्याशिवाय हा संघर्ष मिटणार नाही. तो अधूनमधून धुमसतच राहील. □

---

अवती भवती

शरद कृष्णन

# □ काश्मिरमधील सत्तांतराचे राजकारण

जम्मू–काश्मिरचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांनी आपले चिरंजीव डॉ. फारुख अब्दुल्ला यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करताच शेखसाहेबांचे जामात श्री. जी. एम. शहा यांनी चिडून आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा दिला व तो स्वीकारला गेला. काश्मिरमधील सत्तासंघर्षाच्या राजकारणाचा हा पहिला अंक आहे. शेख अब्दुल्ला काही कुणाच्या विरोधाला भीक घालणारे नव्हेत, आपल्या विरोधकांना त्यांनी चारही मुंड्या चीत केले आहे; पण सध्याचे दुखणे हे अवघड जागेचे दुखणे आहे. आपले चिरंजीव डॉ. फरुख यांची आपले वारसदार म्हणून निवड केल्यावर शेखसाहेबांनी आपल्या मुलाची वाट सुलभ करून देण्याच्या दृष्टीने झपाटयाने पावले टाकली. डॉ. फरुख शेख खासदार असल्याने त्यांचे दिल्लीमधील नेत्यांशी चांगले संबंध होतेच. आपला मनोदय शेखसाहेबांनी इंदिराजींजवळ बोलून दाखवला. इंदिराजींनी अथवा त्यांच्या पक्षाने याबाबत तटस्थ प्रेक्षकाची भूमिका घेतली. स्वतःच्या पक्षावर असाधारण हुकमत असल्याने आपला वारसदार आपण निश्चित करू शकू असा शेखसाहेबांना दांडगा विश्वास होता आणि आता त्यांचा स्वतःचाच जावई असा कठोर विरोधात उभा राहिला नसता तर ते केव्हाच शक्यही झाले असते. गेली वर्ष–दोन वर्षे जावयाची समजूत काढायची आणि फरुखला भावी नेता म्हणून प्रोजेक्ट करायचे असे राजकारण चालूच आहे. केवळ शेखसाहेबांनीच नव्हे तर त्यांच्या पत्नीनेही आपल्या जावयाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तथापि आपले न्याय्य स्थान नाकारले जात असून काल–परवा आलेल्या फरुखला आपल्या डोक्यावर बसवले जात आहे हे लक्षात येताच शहा यांनी आपल्या सासरेबुवांच्या विरोधात बंडच पुकारले. काल-परवा फरुख अब्दुल्ला मंत्रिमंडळात दाखल झाले त्या वेळी आपला राजिनामा सादर करून त्यांनी या बंडाला उघड तोंड फोडले.

### डोळ्यांसमोर सत्तांतर

शेख अब्दुल्ला गेली दोन वर्षे सतत अंथरुणालाच खिळून आहेत; परंतु तरीही त्यांची आपल्या पक्षावर जबर पकड आहे. आपला वारसदार म्हणून मुलाची निवड केल्यानंतर आपल्या डोळ्यांदेखत सत्तांतर व्हावे ही त्यांची इच्छा आहे. जम्मू–काश्मिरच्या निवडणुका डोक्यावर आल्या आहेत आणि वेळीच जर हालचाल केली नाही तर हे सत्तांतर आपल्या मनाप्रमाणे होणार नाही अशी त्यांना भीती वाटत असल्याने त्यांनी झपाट्याने हालचाल करून प्रथम मोठ्या थाटामाटात आपल्या चिरंजिवांना पक्षाच्या अध्यक्षपदी विराजमान केले. श्री. शहा यांनी त्या वेळीही आपली नाराजी व्यक्त केली; परंतु विरोधाची धार तशी बोथट होती. जी काही धुसफूस झाली ती तशी घरातल्या घरातच होती; पण आजारी शेखसाहेब आपल्याला मदत व्हावी म्हणून मुलाला जेव्हा मंत्रिमंडळात आणायला निघाले त्या वेळी मात्र जावईबुवा बिथरले. गेली अनेक वर्षे आपण मंत्रिमंडळात असताना आणि निष्ठेने पक्षाचे काम करत असताना ज्या पद्धतीने डॉ. फरुख शेख यांना आत घेतले जात आहे त्याबद्दल शहा विलक्षण चिडून आहेत. डॉ. फरुख यांच्या मंत्रिमंडळामधील आगमनाबरोबरच आपला राजिनामा सादर करून त्यांनी संघर्षाची ठिणगी तर उडवली आहेच; परंतु या बंडाळीची खरी तीव्रता निवडणुकीच्या वेळी उमेदवार ठरवले जातील त्या वेळी दिसून येईल. शेखसाहेबांची प्रकृती तोळामासा आहे आणि ते आगामी निवडणूक लढवणार नाहीत हे स्पष्ट झाले आहे. अंथरुणात लोळा–गोळा होऊन पडले असले तरी शक्तिशाली असल्याने निवडणुकीच्या



श्री. शहा
शेखसाहेबांच्या सावलीत
वाढले म्हणून...



डॉ. फरूख
तुलना संजय गांधींशी होते
पण...

वेळचे राजकारण आणि उमेदवारांची निवड ही आपल्या मुलाला अनुकूल ठरावी अशा प्रकारेच ते हालचाली करतील. शहा त्या वेळी काय भूमिका घेतात हे महत्त्वाचे आहे. तसेच विद्यमान विधानसभेमध्ये श्री. शहा यांचा पाठपुरावा करणारी मंडळी असली तरी त्यांनी उघडपणे पुढे यावे अशी श्री. शहा यांची इच्छा नाही. कारण तसे झाल्यास आगामी निवडणुकीच्या वेळी आपल्या पाठिराख्यांना खड्यासारखे वगळण्यात येईल अशी भीती त्यांना वाटते. आपल्या समर्थकांनी सध्या नरमाईचे धोरण स्वीकारावे अशीच श्री. शहा यांची इच्छा आहे. सध्याच्या मंत्रिमंडळामधील किमान पाच मंत्री आणि सुमारे १५ ते १७ आमदारांचा गट शहा यांच्या पाठीशी उभा आहे. तथापि, या अशा निष्ठा तशा पातळच असतात. व्यक्तीपेक्षा व्यक्तीच्या हाती असलेल्या सत्तेला अधिक मोल असते. शेखसाहेबांचे राजकारण यशस्वी होऊन डॉ. फरुख मुख्यमंत्री होण्याची शक्यता दिसून आली तर शहा यांच्या सध्याच्या समर्थकांपैकी निम्म्याहून जास्त मंडळी त्यांची साथ सोडून देतील.

## शहा यांचे स्थान महत्त्वाचे !

शेखसाहेबांच्या विरोधात असलेल्या नेत्यावर नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांनी प्रहारी हल्ले केले आहेत. जे शेखसाहेबांना विरोध करतात ते काश्मिरचे शत्रू अशी एकांतिक भूमिका घेऊन त्यांच्या विरोधकांना झोडपून काढण्यात आले आहे. तथापि शहा हे शेखसाहेबांचे अत्यंत जवळचे आहेत. पक्षाचे एक प्रमुख नेते, मंत्रिमंडळातील काल-परवापर्यंतचे ज्येष्ठ सहकारी असल्याने त्यांनी राजिनामा दिला असला तरी त्यांच्याविरुद्ध अजून तरी आघाडी उघडण्यात आलेली नाही आणि शहा यांनीही मंत्रिमंडळ सोडले असले तरी अद्यापी पक्ष सोडलेला नाही. त्यांच्या संबंधात बोलताना डॉ. फरुख शेख म्हणाले की, श्री. शहा हे पक्षाचे एक प्रमुख नेते असून त्यांची पक्षाला नितांत गरज आहे. डॉ. फरुख, स्वतः शेख, त्यांचे कुटुंबीय यांना शहांबरोबर संघर्ष नको आहे. त्यांनी डॉ. फरुख शेख यांचे स्थान मान्य करून दोन नंबरची जागा स्वीकारावी अशी शेखसाहेबांची अपेक्षा आहे. या अपेक्षेला तडा गेला असला तरी आपल्या या जावयाला अजूनही आंजारून-गोंजारून परत आणता येईल असे शेखसाहेबांना वाटते. ते जमले नाही तर मात्र नॅशनल कॉन्फरन्समध्ये फूट पडणे अटळ आहे. तशी फूट पडली तर शहा आपल्याभोवती कितपत सामर्थ्य जमा करू शकतात यावर पुढील गोष्टी अवलंबून आहेत.

डॉ. फरुख आणि शेखसाहेबांचे हे जामात यांच्याबद्दल थोडे खोलात जाऊन पाहिले तर असे दिसते की, फरुख अब्दुल्ला यांचा स्वभाव जास्त मनमिळाऊ आहे. कार्यकर्त्यांशी ते मिळूनमिसळून वागतात. दुय्यम पातळीवरील कार्यकर्त्यांबरोबरही चर्चा करतात. मतभेद झाले तर आपली भूमिका त्यांना समजावून देण्याचा प्रयत्न करतात. परदेशात दीर्घकाळ राहून त्यांनी वैद्यकीय शास्त्रामधील पदवी संपादन केली आहे. या परदेशवास्तव्याने त्यांच्यावर अनेक चांगले संस्कार केले आहेत. नॅशनल कॉन्फरन्स व जम्मू-काश्मिर यापलीकडील जग त्यांना चांगले माहीत आहे. आता जम्मू-काश्मिरच्या मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेटस्तरीय मंत्री म्हणून त्यांचा समावेश होत असल्याने त्यांना खासदारकी सोडावी लागेल; परंतु ही खासदारकी सांभाळत असताना त्यांनी दिल्लीमधील राजकारण बऱ्यापैकी समजावून घेतले आहे. इंदिरा काँग्रेसचे प्रमुख नेते आणि अन्य विरोधी पक्षाचे नेते यांच्याशी त्यांचा संपर्क आहे. याउलट श्री. शहा यांचे व्यक्तिमत्त्व खुरटलेले असून शेखसाहेबांच्या सावलीत राजकीय वाटचाल करावी लागल्याने त्यांना स्वतःसाठी स्थान निर्माण करता आलेले नाही. शेखसाहेबांचे जवळचे आप्त असल्याने डॉ. फरुख यांचे राजकारणात आगमन होईपर्यंत शहा हेच शेखसाहेबांचे वारसदार म्हणून ओळखले जात असत. काश्मिरचे मुख्यमंत्रीपद आपल्याकडे आपसूक चालत येईल अशीच त्यांची समजूत होती आणि डॉ. फरुख यांचे आगमन होईपर्यंत शेखसाहेबांनीही आपल्या जावयाच्या या गोड समजुतीला कधी धक्का लावला नव्हता. डॉ. फरुख हे राजकारणात येण्यास

फारसे उत्सुक नव्हते. वैद्यकीय व्यवसायामध्ये त्यांना अधिक रुची होती; परंतु एकदा राजकारणात यायचे ठरवल्यावर त्यांनी पूर्ण सामर्थ्य पणास लावले आहे. धसमुसळेपणा आणि आपलीच मते रेटण्याबाबतचे त्याचे धोरण पाहून त्यांची तुलना काही वेळा कै. संजय गांधी यांच्याशी केली जात; परंतु ते तितकेसे बरोबर वाटत नाही. डॉ. फारुख अब्दुल्ला यांच्या राजकीय हालचालींमध्ये आक्रमकता असली तरी त्यामागे विवेक आणि परिपक्व विचार यांची बैठक आहे. कै. संजय इतका उथळपणा त्यांच्याजवळ नाही. संजयच्या बौद्धिक वकुबाबद्दलही अनेकांना शंका होत्या. मोटारविषयक तंत्रज्ञान घेत असताना त्याचे कसे हसे झाले याचा पुरेपूर तपशील जनतेसमोर आला आहेच. डॉ. फारुख यांचे तसे नाही. सतत प्रथम श्रेणी संभाळून त्यांनी एम. डी. ची पदवी संपादन केली आहे. डॉक्टरीचा व्यवसाय त्यांनी काही काळच केला; परंतु या अल्पकाळात त्यांनी चांगल्यापैकी नाव मिळवले होते. आपण राजकारणात आलो. अगदी मुख्यमंत्रीपदी विराजमान झालो, तरी त्यामागे आपल्या कर्तृत्वापेक्षा आपल्या पिताजींची पुण्याई उभी आहे याची त्यांना पुरेपूर जाणीव आहे. एका मुलाखतीमध्ये त्यांनी असे स्पष्टपणे म्हटले होते की, 'शेखसाहेबांच्या आशीर्वादाने मी मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊ शकेनही; परंतु त्यानंतरही माझी वाटचाल ही माझी मलाच करायची आहे याची मला पुरेपूर जाणीव आहे.' इंदिराजी प्रथम पंतप्रधान झाल्या त्या वेळी कोण होत्या ? किंबहुना त्या वेळी त्यांची निवड का झाली तर त्या कै. जवाहरलाल नेहरू यांची कन्या म्हणून ! सत्ता संपादन केल्यानंतरच त्यांनी सत्ता टिकवताना आणि राबवताना आपले सारे सामर्थ्य दाखवून दिले. विद्याचरण शुक्ला व शामचरण शुक्ला यांना आज जे स्थान आहे त्यामागे त्यांच्या वडलांची—कै. रविशंकर शुक्ला यांची—पुण्याई आहे. उ. प्रदेशच्या राजकारणात आपल्या मुलाला उभा करण्यात कमलापती त्रिपाठी यांचा मोठा वाटा आहे आणि आता इंदिराजी राजीवसाठी हेच करत आहेत. त्यामुळेच शेखसाहेबांनी आपल्या चिरंजिवांना वाट मोकळी करून दिली तर ते या संदर्भामधील भारतीय परंपरेला धरूनच झाले असे म्हणावे लागेल

## □ पैशाच्या लोभाने नवविवाहित महिलांचे बळी

हुंडाबंदी कायद्याने लागू असली तरी साजऱ्या होणाऱ्या विवाह-समारंभामध्ये या ना त्या रूपाने हुंडा आदा केला जातोच. आपली मुलगी देणारा बाप यथाशक्ती सारे काही करत असतोच; परंतु तेवढ्याने जावईबापूंचे अथवा त्याच्या घरामधील अन्य मंडळींचे समाधान झाले नाही की, नवविवाहितेची जबर छळणूक सुरू होते. सुंदर संसाराची तिची स्वप्ने मातीमोल होऊन जातात आणि अगदी अति झाल्याखेरीज माहेरी बोलणे योग्य वाटत नसल्याने तोंड दाबूनच बुक्क्यांचा मार सहन करण्याची पाळी तिच्यावर येते. छळणूक फारच झाली तर तिला आत्महत्येचा राजमार्ग खुला असतो अथवा भरपूर मारपीट व अन्य मानसिक छळणूक करूनही नवविवाहिता माहेराहून अपेक्षित पैसा आणत नाही हे लक्षात आले तर हे ओझे संभाळायचे कशाला असे वाटून तिच्या सासरची मंडळीच तिला पेटवून देतात आणि बहुसंख्य प्रकरणांमध्ये आत्महत्येच्या नावाखाली हे सरळसरळ खुनाचे प्रकरण दाबले जाते. खरे वाटणार नाही इतक्या झपाट्याने या प्रकारात वाढ झाली असून याबाबतची थोडीफार आकडेवारी देण्यासारखी आहे १९८१ मध्ये केवळ दिल्लीमध्ये भाजल्यामुळे मृत्यू पावलेल्या नवविवाहितांची संख्या ८२ आहे. एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांत अशा प्रकारे ज्यांचे बळी घेतले गेले, त्यांची नावनिशीवार यादी इंडियन एक्सप्रेसने प्रसिद्ध केली आहे.

एप्रिल २२ रामा महेश्वरी (वय २२) भाजून मृत्यू.
एप्रिल २७ शशी बल्ला (वय २१) भाजून मृत्यू.
एप्रिल ३० कान्ता कुमारी (वय १८) भाजून मृत्यू.
मे ३० प्रेम लता (वय २२) भाजून मृत्यू.
मे ३० विजया सैगल (वय २५) भाजून मृत्यू.
जून ७ गीता मलिक (वय २८) भाजून मृत्यू.
जून ८ भारती निरुला (वय २०) भाजून मृत्यू.
जून ८ उषा रॉय (वय २०) भाजून मृत्यू.

वर उल्लेखलेल्या बहुसंख्य महिला या नवविवाहिता असून सासरी विलक्षण जाच झाल्याने एक तर त्यांनी खरोखरच आत्महत्या केली अथवा त्यांना त्यांच्याच घरवाल्यांनी जाळून मारले. या संदर्भात न्यायालयात दाखल झालेल्या एका खटल्यावर टीका—टिप्पणी करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणतात की, अशा प्रकारे स्वयंपाकघरात काम करत असताना भाजून मृत्यूमुखी पडलेल्या महिलांचा तपशील तपासून पाहिला तर असे दिसून येते की, अशा प्रकारे मृत्युमुखी पडलेल्या महिला या नवविवाहिताच असतात. तरुण कुमारी अथवा प्रौढ विवाहिता यांना अशा प्रकारे मृत्यू आल्याचे फारसे आढळून येत नाही. या नवविवाहित महिला बहुसंख्य प्रकरणात संशयास्पद स्थितीमध्ये मरण पावलेल्या असल्याचेच दिसून येते. म्हणूनच अशा प्रत्येक प्रकरणाची कसून चौकशी झाली पाहिजे !

हुंडाबंदीचा कायदा कागदावरच राहतो आणि प्रत्यक्षात चांगल्या सुसंपन्न कुटुंबामधील उच्च विद्याविभूषित नवरदेवही टी.व्ही., फ्रीज, स्कूटर, मोटार यासारख्या वस्तू भेटीदाखल मागतात. काही वेळा थोडीफार तडजोड करून विवाह करतात आणि मग नवविवाहितेला त्रास देतात आणि अखेरीस तिचा बळी घेतात ! सधन कुटुंबामधील या वाढत्या प्रकारामुळे महिलासंघटना जागरूक झाल्या असून अलीकडेच दिल्लीमध्ये एक मोठा मोर्चा काढून त्यांनी आपला निषेध नोंदवला. पैशाच्या लोभाने नवविवाहितांचे बळी घेण्याचे प्रकार वाढल्याचे केंद्रीय कायदेमंत्र्यांनी मान्य केले असून अशा प्रकरणी कायदा जेवढे करू शकेल त्यापेक्षा शिक्षण व सुसंस्कार बरेच काही करू शकेल असे मत नोंदवले आहे. अशा स्वरूपाचा त्रास ज्या महिलांना आहे त्यांनी आपली नावे नोंदवावीत असे आवाहन दिल्लीमध्ये एका महिला मंडळाने करून कचेरी उघडताच ४७ नवविवाहितांनी केवळ एक महिन्याच्या काळात नावे नोंदवली खरी; परंतु त्याबरोबरच आपली नावे जाहीर करू नयेत अशी विनंती केली. कारण संस्कारांचे दडपण आणि सासरच्या मंडळींची दहशत ! कायदा, शिक्षण, सुसंस्कार हे सारे बोलायला ठीक असले तरी आता या प्रकरणी महिलांनीच पुढाकार घेण्याची वेळ आली आहे. □

'सूर्य–विक्री' कथा
भाग चौथा
लेखक : डॉ. जे. के. जैन
भाषांतर : विनया खडपेकर

# मनेकाच्या आईने डॉ. जैन यांना काय सांगितले ?

संकटात 'सूर्य' परत खरेदी करण्याचे ठामपणे ठरवून तशा गंभीर प्रयत्नात मनेका गांधी गुंतली असताना त्याच वेळी एका बाजूस बऱ्याच घटना घडत होत्या. 'सूर्य विक्री 'ही विश्वासघाताची करणी आहे आणि नवे मालक जातीय, प्रतिगामी वगैरे आहेत अशी दूषणे देणारे निवेदन (issued press statement) जे के. जैन, उषा मल्होत्रा यांच्यासकट सर्व कॉंग्रेस खासदारांनी वृत्तपत्राकडे पाठविले. आमची चाललेली बोलणी कोणा तरी पत्रकारामध्ये फुटली आणि मी अगदी जलद पैसा करतो आहे, रु. ६० लाख तर मला दिले गेलेलेच आहेत असे मुंबईच्या Free Press Journal ने पहिल्याच पानावर प्रसिद्ध केले.

आमच्या बैठकी चालू असताना मी मनेकाला म्हटले, 'खासदारांनी असे विधान करणे आणि अशा प्रकारच्या बातम्या देणे ही काही चांगली अभिरुची नाही.' 'सूर्य' परत मिळविण्याचे तिचे कार्य यशस्वी व्हावे अशी पंतप्रधानांच्या घरातील काही घटकांची इच्छा नाही, हे तिने स्पष्ट केले. तिच्या मताप्रमाणे तिच्या 'पुनर्वसनाची' लहानशी शक्यतासुद्धा या घटकाना नाहीशी करून टाकायची होती. खासदारांच्या विधानाबद्दल तिला खंत होती; पण ती म्हणाली की, मी अगतिक आहे.

या काळात मनेकाला पंतप्रधानांकडून वागणूक कडकच harsh treatment मिळत होती. फक्त मनेकालाच नाही तर तिच्या कर्मचाऱ्यांनासुद्धा. तिचा आणि संजयचा विश्वासू ड्रायव्हर राम चंदर याला नोकरीतून कमी केले गेले. संजय आणि मनेका यांच्याशी नेहमी निष्ठावंत असलेला सुरक्षाअधिकारी छत्तरसिंग याला घरातून बाहेर काढले गेले. जेवणाच्या टेबलावर सगळ्या कुटुंबाबरोबर जेवण घेण्याऐवजी मनेकाने आपल्या खोलीतच जेवावे असा सल्ला दिला गेला. तिची आया कॅथेराइन हिला स्वयंपाकगृहात प्रवेश न करण्याची सूचना दिली गेली. मनेकाने याबद्दल आचाऱ्याकडे निषेध व्यक्त करताच पंतप्रधानांनीच कॅथेराइनबद्दल तशी सूचना दिली असतिला सांगितले गेले. संजयचे कुत्रे शिबा आणि ब्रुनो याची देखभाल करणारा कनहाईसुद्धा मनेकापुढे येऊन रडत सांगू लागला की, आर. के. धवन यांनी त्याला घरात येऊ नको म्हणून सांगितले आहे.

मनेकाने स्वतःहून काही ही सगळी माहिती दिली नाही; पण एक गोष्ट स्पष्ट होती, पंतप्रधानांच्या घरातील दुपारची आणि रात्रीची भोजने, ज्यास कुटुंबातील मंडळी साधारणपणे उपस्थित असत ती, ती (मनेका) टाळू लागली. माझी बडीबहू (राजीवची पत्नी) किती चांगली आहे; पण मनेकाला संजयची पत्नी म्हणून आणण्याने मात्र मी बदनशीब ठरले आहे असे पाहुण्यांच्या समोर बोलण्यास पंतप्रधान कमी करत नसत. पाहुण्यांसमोर अपमान आणि कान–उघाडणी ही काही क्वचित घडणारी गोष्ट नव्हती.

पंतप्रधानांच्या कुटुंबाला जी निमंत्रणे येत त्यात आता मनेकाचे नाव नसे. एकदा बसुने मनेकाला विचारले, British High Commissioner ने आमंत्रित केलेल्या मेजवानी आणि 'शोसाठी' (Show) तू जाणार आहेस का? मनेकाने हसून उत्तर दिले, कुटुंबातील बाकी सगळेजण त्या दिवशी जाणार असले तरी तिला निमंत्रण नव्हते. तथापि, सचिवाचे कर्मचारी (Secretarial staff) आणि मुलांसाठी जो पुनःश्च कार्यक्रम (show) होणार होता त्यासाठी तिला निमंत्रण पाठविले होते.

मी मनेकाला म्हटले, सर थॉमसन (ब्रिटिशदूत) यांना मी चांगले ओळखतो आणि बऱ्याच वेळा भेटलोही आहे. त्यांच्या मनमोकळ्या निराभिमानी वागणुकीमुळे मी नेहमीच प्रभावित झालो आहे आणि ते तिच्याविरुद्ध अशा प्रकारची वागणूक देतील असे मला वाटत नाही. तिने स्पष्ट केले, हा यजमानाचा दोष नाही-पंतप्रधानांच्या घरातील कोणा अधिकाऱ्याने British High Commission ला अशी कृती करण्यास सांगितले असले पाहिजे !

११ मार्च १९८२ या दिवशी बसुच्या घरी दुपारी भोजनाला आम्ही भेटलो तेव्हा मनेका विनोदाने म्हणाली, 'मी तीव्र मानसिक अस्वास्थ्याच्या झटक्यात आहे असे समजले जात आहे.' कॉंग्रेस (I) चे खासदार असलेल्या संजयच्या काही जुन्या मित्रांनी तिच्या प्रकृतीची टेलिफोनवर चौकशी केली होती. अशा प्रकारच्या टेलिफोनचा वर्षाव होण्याचे कारणही तिला सापडले. पंतप्रधानांचे दोन विश्वासू लेफ्टनंट सीताराम केसरी आणि कल्पनाथ राय यांनी दिवसेंदिवस मनेकाचे मानसिक अस्वास्थ्य अत्यंत वाढते आहे अशा अफवा कॉंग्रेस (I) च्या खासदारामध्ये पसरवून द्यायला सुरुवात केली होती. आम्ही कोणीच या घटनेचा जास्त विचार केला नाही.

थोड्या दिवसानी Indian Express चे 'Executive Editor श्री. अरुण शौरी यांनी संध्याकाळी खूप उशीरा फोन करून मला सांगितले की, त्यांच्या प्रकृतीविषयी काही बोलण्यासाठी ते मला भेटायला येत आहेत. अरुणने जे मला सांगितले ते चांगलेच मनो॰

रंजन करणारे होते. हिंदी 'सूर्य'चे संपादक माधवकांत मिश्रा यांनी अरुण शौरी यांना आपल्या कचेरीत बोलाविले आणि मनेकाचे प्राण धोक्यात आहेत व तिचा खून होण्याची शक्यता आहे अशी बातमी प्रसिद्ध करण्याची त्यांना विनती केली. मिश्रांना आपल्या बातमीच्या खरेपणाबद्दल इतकी खात्री होती की, ते ती लेखी द्यायलाही तयार होते. शौरींनी मिश्रांना आरोपाचे गांभीर्य समजावून सांगितले आणि वस्तुस्थिती पुनश्च तपासण्यास आणि नीट शाबीत करण्यास त्यांना परत पाठवले.

## जबरदस्त धक्का !

दुसऱ्या दिवशी मी मिश्रांना या आख्यायिकेबद्दल विचारले. माझे मित्र श्री. सत्यदेव त्रिपाठी (State Minister of home affairs in U. P.) यांच्याकडून मला कळले, असे ते म्हणाले. मिश्रांनी असाही दावा केला की, कॉंग्रेसच्या पुढाऱ्यामध्ये हे सगळ्यानाच ठाऊक आहे. अशा प्रकारची बेजबाबदार विधाने करण्याच्या बाबतीत मी मिश्रांना नाउमेद (discouraged) केले. त्यांच्याचसमोर श्री. अरुण शौरींना फोन केला की, त्याचा या बातमीशी काही संबंध नाही.

दुसऱ्या दिवशी श्रीमती आमटेश्वर आनंद जैन मेडिकल सेंटरमध्ये आल्या. त्या चिंतातुर दिसत होत्या. त्या मला म्हणाल्या, 'मला माहिती आहे डॉक्टर, तुमचा ज्योतिषावर विश्वास नाही; पण माझा आहे. काल संध्याकाळी एक जुने स्नेही आमच्याकडे आले आणि म्हणाले बाबाजी (Babaji) म्हणून एक चांगला ज्योतिषी त्यांच्या माहितीत आहे आणि त्याने वर्तविलेली भविष्ये नेहमी खरी होतात. मग आपल्या स्नेह्याबरोबर श्रीमती आनंद त्या ज्योतिष्याला भेटण्यासाठी गेल्या. ज्योतिषी खरे तर 'बाबा' नाही; परंतु तो बाबाजी (Babaji) नावाचे ज्योतिषविषयक नियतकालिक काढतो. त्याचे नाव मदन. तो 'राजौरी गार्डन'मध्ये राहतो. त्या म्हणाल्या.

मी त्यांचे बोलणे अडविले नाही.

'मी जेव्हा ज्योतिषाला भेटले तेव्हा तो म्हणाला, 'माझा चेहरा सांगतो की मी कोणत्या तरी राजघराण्यातील आहे ! त्याने मला माझे नाव विचारले आणि मी त्याला सांगितले 'मी श्रीमती चढ्ढा.

मदनने काही क्षण डोळे मिटले आणि मला सांगितले की, मी माझ्या मुलांच्या विशेषतः सगळ्यात मोठ्या मुलाच्या चिंतेत आहे. डोळे मिटून मदन जेव्हा माझ्या ग्रहांचा एकाग्रतेने विचार करीत होता तेव्हा मी खोलीत भोवताली पाहिले. त्याच्या डेस्कवर Sunday या नियत कालिकाची प्रत पडली होती. मुखपृष्ठावर मनेका आणि पंतप्रधानांबरोबर माझे छायाचित्र होते. आणि Gandhi Versus Gandhi असा मथळा होता. म्हणजे मदन ध्यान करण्याचे ढोंगच करीत होता. मग मी त्याला सरळ सांगितले मी श्रीमती चढ्ढा नाही. मी श्रीमती आनंद आहे आणि त्याचे भविष्य बरोबर आहे. मी मनेकाच्या चिंतेत आहे.

'मदनने मला सांगितले की, त्याने मनेकाच्या कुंडलीचा बारकाईने अभ्यास केला आहे. पंतप्रधानांच्या घरातील प्रत्येकाची कुंडली त्याच्याकडे होती हे पाहून मला आश्चर्य वाटले. मदन म्हणाला, मनेकाचे भविष्य उज्ज्वल आहे पण चालू महिना तिच्यासाठी अत्यंत वाईट आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, त्याच्या मतानुसार या महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात ती बहुतेक आत्महत्या करेल !

साहजिकच श्रीमती आनंद यांना या भविष्यामुळे धक्का बसला, पण त्यांनी मदनला सांगितले की, मनेका ही असले काही करणारी मुलगी नाही. ती धीट आहे आणि तिच्यात झगडण्याची पुरेशी हिंमत आहे.'

'पण डॉक्टर' श्रीमती आनंद मला म्हणाल्या, मदनला स्वतः वर्तविलेल्या भविष्याबद्दल इतकी खात्री आहे की, तो ही गोष्ट लेखी द्यायला तयार आहे.'

'तुम्ही हे लेखी घेतलेत का ?' मी विचारले.

'नाही. मी नाही घेतले; पण तो म्हणाला, 'बाबाजी'च्या पुढच्या अंकात हे भविष्य तो प्रसिद्ध करणार आहे.

मला वाटले, श्रीमती आनंद नसत्या गोष्टींचा उगीचच बाऊ करीत आहेत. मी त्यांना सांगितले, 'श्री मदन यांना मी ओळखतो.

मला माझे वाक्य पुरे करू देण्याआधीच त्यांनी मला विचारले, 'तो चांगला ज्योतिषी आहे असे तुम्हाला वाटते का ?'

'तो चांगला ज्योतिषी आहे की नाही हे मला माहीत नाही; पण मला एक गोष्ट निश्चित माहिती आहे की, स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारीशी त्यांचा काही तरी दुवा (link) आहे'

श्रीमती आनंद अधिकच चिंतातुर दिसल्या. 'तुम्हाला हे कसे काय माहिती ?'

'सूर्य' खरेदी करण्याची स्वामीची offer त्यांनी माझ्याकडे आणली होती.

'असं असेल तर हे सगळं फारच महत्त्वाचं आहे डॉक्टर!' श्रीमती आनंद यांनी शेरा दिला.

'कसं ?' मी चौकशी केली.

## टोकाची कल्पना ?

'मी 'सूर्य' तुम्हाला विकल्यामुळं मनेका तीव्र मानसिक अस्वास्थ्याच्या झटक्यात आहे अशा अफवा पसरविण्यात सीताराम केसरी आणि कल्पनाथ राय हे दोघेही आधीच गुतले आहेत. मदनचे फल-ज्योतिषाच्या आधारे वर्तविलेले भविष्य अशा वेळी छापून येईल की मनेका तेव्हा कोणीच नसेल, हा दुसरा पुरावा. ते हे प्रकरण असे भासवतील की मनेकाने आत्महत्या केली.

श्रीमती आनंदकडून अशा प्रकारचे विधान झाले यावर माझा विश्वासच बसत नव्हता. मी त्यांना म्हटले, 'तुम्ही हे कार्य भलतेच बोलता ? हे अशक्य आहे.'

परंतु त्यांनी बोलणे सुरूच ठेवले. 'ते माझे लेकरू (child) मारून टाकतील. डॉक्टर, तुम्हाला त्यांची माहिती नाही. तुम्हाला हे कधी कळणार नाही. मला माहिती आहे. कारण मला त्यांचे मानसशास्त्र कळते आणि, ते काय करण्यास समर्थ आहेत तेही मला माहिती आहे. मी त्यांच्याबरोबर काम केले आहे. मी त्यांची मने जाणते.' अस्वस्थ मनानेच त्या जाण्यासाठी उठल्या आणि नंतर म्हणाल्या, 'डॉक्टर, तुम्हाला आमचा काही विचार करायचा असेल तर कृपया 'सूर्य' परत करा !'

'मी कधीच नाही म्हटलेले नाही.' मी उत्तर दिले.

'पण तुम्ही अशी अट घातली आहे की, जी कधीच स्वीकारली जाणार नाही.'

दुसऱ्या दिवशी मी मनेकाला भेटलो. त्या वेळी श्रीमती आनंद

यांची भीती तिला कळली होती. ती या सगळ्या गोष्टीला हसली. मी तिला विचारले, 'तुमच्या खुनाच्या संभाव्यतेवर तुमचा विश्वास आहे का? श्रीमती आनंद अगदी चिंतेत आहेत.'

मनेका म्हणाली, 'श्रीमती आनंदबद्दल विसरून जा. मला तुम्हाला एक गोष्ट सांगायची आहे डॉक्टर. ती तुम्ही पूर्ण आणि स्पष्टपणे समजून घेतलीच पाहिजे मी कोणत्याच बाबतीत आईच्या मतांकडे कधी लक्ष देत नाही. संजय किंवा मी आईच्या मार्गदर्शनाने वागत होतो किंवा तिच्या प्रभावाखाली होतो अशी एक मोठीच बोलवा भोवतालच्या बाजारात आहे. मला तुमचे मत पाहिजे आहे. एकंदर गोष्टींबद्दल तुम्हाला काय वाटते?'

मी मनेकाला म्हटले, 'माझा यावर विश्वास नाही. ही अगदी टोकाची कल्पना आहे.' मनेकाने संमतिदर्शक मान हालवली.

मी बोलणे पुढे सुरू केले, 'पण माझ्या मतात एक मूलभूत उणीव आहे. कोणत्या प्रकारच्या माणसांशी तुम्ही व्यवहार करता आहात त्यावर हे सर्व अवलंबून आहे. मी त्यांच्याबरोबर कधीच काम केले नाही. अमुक एका परिस्थितीत त्यांची प्रतिक्रिया कशी असेल याचा मला निश्चित असा अंदाज येणार नाही.'

ती म्हणाली, 'या दृष्टीने म्हणाल, तर मी तुम्हाला सांगू शकते की, हे लोक काहीही करायला समर्थ आहेत.'

'खूनसुद्धा?' मी चौकशी केली.

'तो म्हणजे त्यांच्यासाठी काहीच नाही.' मनेकाचे क्षणात (instant) उत्तर.

'असं जर असेल तर एकंदर गोष्टींचा आपण अधिक गंभीरपणे विचार केला पाहिजे; पण तुम्हाला खरंच असं वाटतं का?' मी तिला पुन्हा विचारले.

'होय. डॉक्टर, तुम्हाला काही गोष्टी माहिती नाहीत. या विशिष्ट परिस्थितीत ज्या लोकांशी तुम्ही व्यवहार करता आहात त्या लोकांना आपल्या सिद्धीच्या (goal) मार्गात एक किंवा दोन माणसांचा काटा काढणे (elimination) म्हणजे काहीच नाही.'

## 'कागदपत्रांवर सही करा!'

मनेकाने मला हेही सांगितले की, वृंदावनला जाताना आनंदमयी श्री माँ दिल्लीत काही तास थांबल्या होत्या. पंतप्रधानांनी साधारण एक तास त्यांच्याबरोबर घालविला. मनेका स्वतःही श्री माँची खूप भक्त आहे. 'माँ'ची पंतप्रधानांबरोबर जो बैठक झाली त्यातून काही तरी चांगले निष्पन्न होईल अशी मनेकाची अपेक्षा होती.

नंतर एक किंवा दोन दिवसांनी मला वसुकडून कळले की, मनेका आनंद माँ यांना भेटण्यासाठी वृंदावनला गेली होती. तिकडून परत आल्यावर मनेकाने माझ्याशी एक बैठक ठरविली. आता तिला ठामपणे वाटत होते, अधिक उशीर न करता 'सूर्य' परत केलेच पाहिजे. माझी अट मी सोडून द्यावी आणि प्रकाशन परत करावे अशी तिने हुक्काने मागणी (demanded) केली.

'तुम्हाला हे दळभद्रे नियतकालिक (wretched magazine) पाहिजे आहे की, मला जगलेले पहायचे आहे?' तिने रागाने मला विचारले.

मी तिला म्हटले मी सरदार आंग्रे यांचा सल्ला घेईन आणि तुम्हाला कळवीन.

◻

दुसरा दिवस रविवार — ७ मार्च. सकाळीच मी काही पेशन्ट्स बघण्यासाठी गेलो आणि रागिणी (पत्नी) जैन मेडिकल सेंटरच्या कामात होती. मी दुपारी दीड वाजता परत आल्यावर माझा मुलगा अंकूर याने सांगितले की, पंतप्रधानांच्या घरून टेलिफोन होता. 'श्रीमती मनेका गांधींना तुमच्याशी बोलायचे आहे.'

अशा प्रकारे मनेकाचा यापूर्वी कधीच निरोप आला नव्हता. मला आश्चर्य वाटले. माझ्याशी बोलावे म्हणून मनेकाने मला किती तरी वेळा फोन केला हे सांगण्यासाठी वसु नेमकी याच वेळी माझ्या घरी आली. वसुला पार्श्वभूमी माहिती नव्हती; पण तिला वाटले मी मनेकाशी तावडतोब बोलावे. मनेकाने दिलेला टेलिफोननंबर पाहून घेऊन वसुने खात्री दिली हा टेलिफोननंबर तिचा वैयक्तिक फोनचा नव्हता, तर पंतप्रधानांच्या स्वागत-कक्षचा होता. याचा अर्थ जे काही तिला बोलायचे होते ते तिला इतरांपासून लपवायचे नव्हते.

मनेकाला तेव्हा फोन करावा की, संध्याकाळी करावा याची मी आणि वसु चर्चा करीत होतो. एवढ्यात पुन्हा फोन वाजला. मी तो घेतला. 'डॉ. जैन बोलतो आहे.'

'आपण डॉ. जे. के. जैन बोलता आहात का सर?' लाइनवर पुरुषाचा आवाज होता.

'होय.'

'मी पंतप्रधानांच्या घरातून बोलतो आहे. कृपया मनेका गांधींशी बोला.'

मनेका माझ्याशी अशा तऱ्हेने बोलली की जशी काही ती कोणा अपरिचित व्यक्तीशी बोलत होती.

'डॉक्टर, आपण आपल्या घरीच आहात का?'—मनेका

'Yes Madam' मी उत्तर दिले.

"Mr. Mittal is coming to you with the dough. ते ठेवून घ्या आणि कागदपत्रांवर सह्या करा!" मनेका धंद्यासंबंधी बोलावे त्या तऱ्हेने बोलली.

"कोणती कागदपत्रे?" मी विचारले.

"'सूर्य'ची मालकी बदलण्याची कागदपत्रे." तिने उत्तर दिले.

खरे सांगायचे म्हणजे dough या शब्दाच्या एका विशिष्ट अर्थाशिवाय दुसऱ्या अर्थाशी माझा परिचय नव्हता. फोनच्या तोंडावर हात ठेवून मी वसुला विचारले, 'dough या शब्दाचा अर्थ काय?'

'त्याचा अर्थ पैसा का, काय प्रकरण आहे?' तिने विचारले.

मी मनेकाला सांगितले 'केवळ माझ्या सह्यांनी भागणार नाही. सरदार आंग्रे यांनाही कागदपत्रांवर सह्या कराव्या लागतील. शिवाय मला काही स्पष्टीकरणे पाहिजे आहेत. मी तुम्हाला प्रत्यक्ष भेटलेलं बरं पडेल.'

'ठीक आहे.' बैठकीची वेळ किंवा जागा न ठरवताच तिने फोन बंद केला.

## आनंदमयी माँ

संध्याकाळी मला श्रीमती आनंदकडून फोन आला आणि त्यांना भेटण्यासाठी मी जोरबाघ येथे गेलो. 'मनेका अगदी अस्वस्थ होती' त्या म्हणाल्या, 'मेनुला वाटते, 'सूर्य' परत करण्याच्या तुमच्या offer बद्दल तुम्ही प्रामाणिक नाही.'

'तिला ते का परत पाहिजे आहे?' मी चौकशी केली.

'माँ (आनंदमयी माँ) यानी तिला ते परत घेण्यास सांगितले आहे. 'माँ'चा शब्द आम्ही सगळेजणच अखेरचा शब्द मानतो. आपण सर्वजण जे पाहू शकत नाही असे पुढचे त्या पाहू शकतात.'

मला पटले नाही. श्रीमती आनंद यानी सुचविले की, 'माँ'ना भेटण्यासाठी मी त्यांच्याबरोबर वृंदावनला जावे. मी शेवटी दुसरे दिवशी सकाळी वृंदावनला जाण्याचे कबूल केले.

¤

तो ८ मार्च सोमवारचा दिवस होता. आम्ही अगदी सकाळी वृंदावनला जाण्यासाठी निघणार होतो; पण मला दोन शस्त्रक्रिया करायच्या होत्या. त्या पुढे ढकलण्याजोग्या नव्हत्या. मी श्रीमती आनंदना सांगितले, त्यांनी ठरल्याप्रमाणे सकाळीच वृंदावनला जावे, मी वृंदावनला दुपारपर्यंत पोहोचतो. मी माझ्या शस्त्रक्रिया आटोपल्या आणि दुपारी १ वाजता दिल्ली सोडली. माझ्या ड्रायव्हर बाळकृष्णने अगदी वेगात गाडी चालविली आणि आम्ही वृंदावन येथे आनंदमयी 'माँ'च्या आश्रमात दुपारी तीन वाजता पोहोचलो.

वातावरणातला बदल स्वागतार्ह वाटला. आश्रमाच्या भोवताली सर्वत्र शांततेचे राज्य होते तेथे पावित्र्य होते. मांगल्य आणि शांतता सगळीकडे भरून राहिली होती. श्रीमती आनंद झाडाखाली सिमेंटच्या ओटयावर बसल्या होत्या. 'माँ'च्या एक मुख्य शिष्या करतारजी यांनी अगदी प्रेमाने माझे स्वागत केले आणि मला प्रसाद—सुग्रास भोजन करण्यास सांगितले. मला भूक लागली होती. मी आनंदाने तो प्रसाद घेतला. भक्तासाठी असलेला रामलीला हा कार्यक्रम बघितला. भयानक गर्दी. राजधानीतले ते आजारी, जखमी जग यापासून खूप दूर आल्यासारखे मला वाटले.

'माँ'च्या दर्शनाची वेळ झालेली नव्हती; परंतु करतारजीनी 'माँ'बरोबर माझी भेट ठरविली. 'माँ' घराच्या पहिल्या मजल्यावर विश्रांती घेत होत्या. आवारात मध्यभागी ज्या इमारती होत्या त्यात ते होते. ती साधी पण भक्कम बाधणीची इमारत होती. एखाद्या दैवी व्यक्तीचे (spiritual leader) मी या वेळी प्रथमच दर्शन घेत होतो. 'माँ' त्या दिवशी बऱ्या दिसत नव्हत्या. करतारजी आणि दुसरा भक्त माझ्या बाजूला उभे राहिले. श्रीमती आनंद जरा मागे उभ्या होत्या. करतारजीनी 'माँ'ना माझ्याबद्दल सांगितले. माँ हिंदीत बोलल्या.

'तुम वापस करो। 'सूर्य' वापस करो।' माँ आपल्या क्षीण (feeble) पण हुकुमतीच्या आवाजात म्हणाल्या.

मी म्हटले, 'आम्ही ते परत द्यायला तयार आहोत; परंतु परत घेण्यासाठी ते गंभीर नाहीत.

'ते काहीही करू देत; पण तुम्ही 'सूर्य' परत द्या!' आपल्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर असमाधान दाखवीत माँ बोलल्या.

'आम्ही असे का करावे?" मी 'माँ'ना विचारले.

'लडकीकी सुरक्षाके लिये वापस दे दो' 'माँ'नी उत्तर दिले.

'माँ, मी आश्वासन देतो की आमच्या बाजूने मुलीला कोणताही धोका नाही.'

माझ्या उत्तराने माँ त्रासलेल्या दिसल्या; परंतु म्हणाल्या, 'शांती के लिये दे दो।'

'यह शांती सुलाहकी शांती होनी चाहिये या शमशान की?' (ही शांती सलोख्याची बोलणी करून केलेली शांती असावी की ती स्मशानातल्यासारखी शांती असावी?)

## ते डाव टाकत आहेत

'माँनी उत्तर दिले नाही आणि तोंड फिरवले. जवळ उभ्या असलेल्या भक्ताने माझ्या हातात दोन संत्री दिली. ही मला जाण्याची सूचना होती. 'माँच्या बरोबर वाद घातल्याबद्दल करतारजीनी माझी कानउघाडणी केली. 'माँ'च्या निर्णयावर कोणी प्रश्न विचारीत नाही. 'माँ'नी दिलेल्या सूचनेचं तुम्ही फक्त पालन करायचं.'

करतारजी मला बाजूला घेऊन गेल्या आणि आम्ही इमारतीच्या जिन्यात जमिनीवर बसलो. त्यांनी मला 'माँ'च्या दैवी व्यक्तिमत्त्वाची माहिती दिली. त्या संभाषणात मला कळले करतारजी 'माँ'च्या भोपाळ येथील आश्रमाच्या प्रमुख आहेत आणि त्या श्रीमती आनंद यांची थोरली बहीण. 'माँ'च्या दैवी चळवळीचा (spiritual movement) त्या बरेच वर्ष भाग आहेत.

'माँ'च्या भेटीत माझी वागणूक आणि त्या भेटीतून झालेले निष्पन्न याबद्दल श्रीमती आनंद नाराज होत्या. श्रीमती आनंद आणि कर्तारजी यांना मी सांगितले, त्यानी यात काही वाईट मानू नये. मला जे वाटले ते मी त्यांना सांगितले. माँ माझ्याशी बरोबर वागल्या नाहीत. माझी बाजू त्यांच्यापुढे मांडण्याची त्यांनी मला संधीच दिली नाही. त्यानी मुळी त्याचे मत आधीच ठरविले होते. दिल्लीच्या तासाभराच्या बैठकीत पंतप्रधानानी जे त्याना सांगितलेच असणार त्या आधाराने त्यांनी आपला निर्णय दिला.

'माँ'मध्ये दैवी शक्ती आहे आणि मर्त्य मानवाचे काही ऐकण्याची त्याना आवश्यकता नाही असे करतारजी विवरण करू इच्छित होत्या; परंतु श्रीमती आनदना माझ्या निषेधात काही अर्थ वाटला. मी माझी बाजू स्वामीजीपुढे मांडावी असे ठरले. त्याच इमारतीत स्वामीजी तळमजल्यावर राहात होते. या संघटनेत 'माँ'च्या खालोखाल त्यांचे स्थान असावे असे मला वाटले.

स्वामीजी बुटके आणि जाडधाजुडया शरीराचे होते. त्यांच्याभोवती शांततेचे वलय होते. श्रीमती आनंद आमच्यापासून थोडया दूर बसल्या. आमच्या चर्चेनंतर स्वामीजीना वाटले, माझी बाजू अगदी बरोबर आहे मी शेवटी स्वामीजीना सांगितले की, बरीच तंत्रे वापरून झाल्यानंतर, आता आम्ही जर नियतकालिक परत केले नाही तर संजयच्या पत्नीला धोका आहे असे सागून ते डाव टाकत आहेत. मी स्वामीजीना आश्वासन दिले, 'आमच्या बाजूने मनेका गांधीना काहीही धोका नाही; परंतु संजयच्या मृत्यूनंतर, संजयच्या पत्नीचे रक्षण करण्याचे कर्तव्य आणि जबाबदारी ज्यांची आहे त्यांच्याकडूनच तिला धोका संभवत असेल तर त्याबद्दल आम्हाला दोष देण्यात काय अर्थ?' स्वामीजीनी त्यांचा निर्णय दिला. ते माझ्या दृष्टिकोनाशी सहमत आहेत.

'आम्ही अधर्माचरण करीत नाही, आपले आशीर्वाद आमचे रक्षण करतील आणि अन्यायाविरुद्ध झुंज देण्यास आम्हाला शक्ती आणि ताकद देतील या समाधानात आम्ही येथून जावे का?' मी स्वामीजींना विचारले. त्यांनी जराही न घुटमळता माझ्या मस्तकावर हात ठेवला.

मी श्रीमती आनंद यांच्याकडे पाहिले. निर्णयाचा माझ्यापेक्षा त्यांच्याशी जास्त संबंध होता.

श्रीमती आनंद माझ्या कारने दिल्लीला येण्यास तयार झाल्या.

यामुळे विश्वासाने बोलण्याची आम्हाला संधी मिळाली. शिवाय आम्ही दावचिक विश्रांतीगृहात कॉफी घेण्यास थांबलो.

त्यांनी मला विचारले, 'मनेकाच्या जिवाला भय आहे यावर तुम्ही अजूनही विश्वास ठेवत नाही का ?'

'भय कुठून आहे ?' मी विचारले.

'तुम्हाला ही गुंतागुंत कधीच कळायची नाही. मी तुमच्यापुढे सर्व गोष्टी मांडते म्हणजे तुम्हाला ते स्वच्छ दिसेल.' त्यानी जोरातच सांगितले.

'हं ! सांगा बरं !' मी विनंती केली.

### त्यांचे पृथक्करण (Her analysis)

१. तुम्ही 'सूय' परत केले नाही तर मनेकाच्या जिवाला धोका आहे असे पंतप्रधानांच्या घरात बोलण्यात स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारींनी तुम्हाला स्पष्ट शब्दात सांगितले नाही का ?

२. भविष्यातल्या घटना जाणण्याची निश्चितपणे अंगी शक्ति असलेल्या 'माँ'नीसुद्धा मुलीच्या सुरक्षिततेसाठी 'सूर्य' परत करा असे म्हटले आहे.

३. कमलनाथ राय आणि सीताराम केसरी हे कॉंग्रेस (I) च्या खासदारांमध्ये आधीच सांगत सुटले होते की, मनेकाला मानसिक अस्वास्थ्याचा झटका आला आहे आणि ती एखादे वेळी आत्महत्या करेल.

४. ब्रह्मचारींचा माणूस श्री. मदन या सर्व प्रकरणाला विधिलिखित घटना (predestined event) असा रंग देण्याची पार्श्वभूमी तयार करीत आहे.

५ मनेकाचे विश्वासू सहाय्यक आणि सुरक्षाअधिकारी रामचंदर छत्तरसिंग याना आधीच काढले गेले आहे.

६. मनेकाच्या स्वयंपाकावर लक्ष ठेवणारी तिची आया कॅथेराइन हिला केव्हाच स्वयंपाकगृहात येण्यास मज्जाव केला गेला आहे.

मी श्रीमती आनंदना मधेच अडविले, 'मिनिटभर आपण असे गृहीत धरू या की, तुमचे बरोबर आहे; पण ही भयंकर कृती कोठे आणि कशा प्रकारे घडू शकेल ?'

'हं ! आम्ही त्यावरही थोडा विचार केला आहे. ही गोष्ट घरातही घडू शकते. (It is likely to happen in the PM's house itself!)'

त्यांनी जे गृहीत धरले होते त्याबद्दल प्रश्न विचारल्याशिवाय मला राहवेना; पण त्यांनी बोलणे पुढे सुरू ठेवले. 'भारत महोत्सवासाठी पंतप्रधान दूर लंडनमध्ये असतील. मुळात सगळ्या कुटुंबाने जायचे असा कार्यक्रम ठरला होता; परंतु पंतप्रधानानी मेनूला आधीच सांगितले आहे की, त्या तिला आपल्याबरोबर नेणार नाहीत.'

'पंतप्रधानांच्या सुनेला कोण मारू शकेल आणि तेसुद्धा प्रत्यक्ष पंतप्रधानांच्याच घरात ? पूर्ण घर सुरक्षाअधिकारी, (intelligence officer) आणि पोलीस यांनी वेढलेले आहे.'

'पोलीस, intelligence, सुरक्षाची सगळी माणसे घराच्या भोवताली आहेत. घराच्या आत नाहीत. काही व्यक्तींचा मात्र आत मुक्त संचार (free access) आहे. त्यांना प्रश्न विचारायला कोणी धजावत नाही.' श्रीमती आनंद अशा तऱ्हेने बोलत होत्या की, त्यांनी या सगळ्या शक्यतांचा आधीच अभ्यास केला होता.

'पण मनेकाच्या मृत्यूने वृत्तपत्रजगात (Press) आणि लोकसभेत (Parliament) आणि इतरही सर्वत्र जबरदस्त खळबळ माजेल असे तुम्हाला वाटत नाही का ? शवविच्छेदनाची मागणी होईल आणि ते करावे लागेल !' मी म्हणालो.

'Postmortem ?' त्या हसल्या. 'ते कोण करील ? ते करण्यासाठी स्वर्गातून देवदूत येणार नाहीत. नगरवालाचे शवविच्छेदनसुद्धा करण्यात आले होते. त्याचा काय निर्णय लागला ? नैसर्गिक हृदयविकाराने त्याला मृत्यू आला !'

'वर्तमानपत्रं आणि लोकसभेचं काय ? तुम्हाला असे वाटते की, मनेकाच्या मृत्यूबद्दल कोणी प्रश्न विचारणार नाही ?' मी विचारले,

'त्याच्याकडे कोण लक्ष देतो ? एल्. एन्. मिश्राचा खून झाला त्या वेळी वर्तमानपत्रे आणि लोकसभा काय करू शकली ? जनतेची स्मरणशक्ती फार कमी काळाची असते. मनेका मृत्यू पावताक्षणीच ते तिला मोठा हुतात्मा बनवतील! पंतप्रधान लंडनहून घाईने परत येतील. जगातले नेते शोकसंदेश पाठविण्यास सुरुवात करतील. विरोधी पक्षांचे पुढारी पंतप्रधानाना सांत्वन आणि सहानुभूती प्रदर्शित करण्यासाठी रांगा लावतील. कोणी शंका घेणारा आवाज उठविलाच तर तो आवाज, शोकगीते आणि कॅबिनेटमंत्री, राज्यपाल, अनेक मुख्यमंत्री यांनी मनेकाच्या स्तुतिपर केलेल्या भाषणात बुडून जाईल. राज्यनियंत्रित आकाशवाणी, दूरदर्शन आणि मित्र-वृत्तपत्रे यांच्याकडून ही भाषणे पुनःपुन्हा वदविली जातील. (These statements will be blared repeatedly by the state controlled radio, television and the friendly press) एका गरीब बिचाऱ्या आईचं आणि तुमच्यासारख्या नगण्य माणसाच (insignificant person) कोण ऐकणार आहे ?'

### राजीव की मनेका ?

त्या सांगतच होत्या आणि मी ऐकत होतो.

'डॉक्टर, तुम्हाला सत्याची (realities) जवळजवळ कल्पनाच नाही. तुमचे आजचे राज्यकर्ते फार निर्दय (ruthless) लोक आहेत. त्याना जे काही मिळवायचे असेल ते मिळविण्यासाठी ते वाट्टेल ते करू शकतात. मी त्यांना ओळखते. तुम्ही ओळखत नाही. मी त्यांच्याबरोबर काम केले आहे. (I have worked with them)'

यावर श्रीमती आनंदबरोबर मी अधिक प्रतिवाद करू शकलो नाही. मी त्यांना एवढे मात्र विचारले, 'सूर्य-विक्री' हा एवढा मोठा गुन्हा आहे का ?'

'नाही. सूर्य-विक्री हा गुन्हा नाही; परंतु राजीव गांधीना सत्ता मिळण्याच्या मार्गात मनेका बंडाळी करून उभी रहाण्याची शक्यता, ही भीती पंतप्रधानांच्या आणि राजीव गांधीभोवतालच्या हितसंबंधियांच्या मनात लपलेली आहे. आज मनेका कोणी नाही. ती सार्वजनिक व्यक्ती (public figure) नाही किंवा राजकारणातही नाही. बऱ्याच राज्यातील पुष्कळ खासदारांची आणि MLAs ची नावेसुद्धा राजीवला माहिती नाहीत. त्यातले बरेचजण संजयचा उजवा हात होते. त्यामुळे त्यातल्या बऱ्याच जणांची राजीवपेक्षा मनेकाला जास्त चांगली माहिती आहे. या दृष्टिकोनातून, ह्यात मनेका आणि राजी

वऱ्या विरुद्ध ती उभी रहाण्याच्या शक्यतेची सतत भीती ' यापेक्षा नसलेली मनेका आणि लोकसभेत, वृत्तपत्रजगात थोडी आरडाओरड हे त्यांना खूपच बरे आहे. (From this point of view, a dead Maneka and some uproar in Press and Parliament is a much better proposition for them than a living Maneka and constant threat of a possibility of her standing up against Rajiv).'

मधे आम्ही दुसऱ्यांदा कॉफी मागविली आणि दिल्लीच्या प्रवासासाठी उठलो.

¤


दुसऱ्या दिवशी अरुण शौरीबरोबर या कथेची चर्चा करण्याची संधी मला मिळाली. त्याने मला सांगितले, वसुराजेसुद्धा त्याला भेटली आणि सर्व प्रकरण (whole matter) जवळजवळ याच प्रकारे तिने चर्चिले. Indian Express चे Editor–in-chief. एस्. मुळगावकर यांच्या घरी अरुण वसुला घेऊन गेला होता. अरुणने मला असेही सांगितले की, या प्रकरणाबद्दल (issue) आणि संभाव्यतेबद्दल त्याने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांबरोबर दोन बैठकीत चर्चाही केली आहे. जरी प्रत्येकाला ही अगदी टोकाची कल्पना वाटत होती, तरी ते म्हणाले, मनेकाला जर ही शक्यता आहे असे वाटत असेल तर रक्षणासाठी तयार रहाण्याचा तिला हक्क आहे.'

दुसऱ्या दिवशी सकाळी मुळगावकर जैन मेडिकल सेंटरमध्ये आले. त्यांना प्रकृतिसंबंधात काही नित्याची दुखणी आहेत आणि ते नेहमीच माझ्या दवाखान्यात येतात. ते म्हणाले, 'डॉक्टर, मनेका–खुनाची संभाव्यता या विषयावर मी अरुण शौरी आणि वसुंधराराजे सिंग यांच्याबरोबर चर्चा केली. बचावाबाबत मला काही सूचना करावयाच्या आहेत; पण काही सांगण्यापूर्वी मला तुम्हाला तुमचे मत विचारायचे आहे. या प्रकारे हे असं घडू शकेल असं तुम्हाला वाटतं का?'

मी उत्तर दिले : 'काय घडू शकेल याचा अंदाज करणं काही फार कठीण नाही. माझ्या मते मनेकाला अपघाताने, आत्महत्येने किंवा खुनाने मृत्यू आला तर काहीही होणार नाही. ती सरळ साधे आयुष्य जगणार असेल तरीही जास्त काही होणार नाही असे मला वाटते; परंतु ज्यांच्याबरोबर आपण रहातो त्यांचा आपल्याला केवळ राजकीयदृष्ट्याच नाही तर शरीरानेही खतम करण्याचा विचार आहे असे जर तिच्या मनात असेल तर मात्र त्यामुळे खचितच महत्त्वाच्या घटना घडू शकतील. (But with Maneka believing that there is a plan to finish her, not only politically but even physically, by those with whom she lives, it will certainly lead to important happenings.) आपण काय काय होते ते पाहू या.

**(ऑगस्ट ८२ 'सूर्य इंडिया' अंकावरून साभार)**



# महात्मा आणि माणूस

पाच मार्च १९३१ ला गांधी आणि लॉर्ड आयर्विन यांनी प्रत्यक्ष करारावर सह्या केल्या. हा करार म्हणजे भारतीय क्रांतीला आणि ब्रिटिश साम्राज्याच्या वहिवाटीला मिळालेलं वेगळं वळण होतं. गांधींनी फार काही मिळवलं होतं अशातला प्रकार नाही. मी तर गांधींनी केलेल्या तडजोडी पाहून आश्चर्यचकित झालो होतो. नेहरूही कडवटपणे बोलत. जवळजवळ प्रत्येक प्रश्नावर गांधींनी माघार घेतली होती. करारानंतर काही दिवस आम्ही बराच वेळ या प्रश्नावर बोललो. आपण काय मिळवलं हे सांगायचा गांधींनी प्रयत्न केला; पण त्यांची माघार ही शरणागती नव्हती, हे काही ते आपल्या अमोघ वक्तृत्वानं मला पटवू शकले नव्हते.

पण गांधींनी खरोखरच खूप काही मिळवलं होतं हे कळायला काही दिवस जावे लागले. इतिहासाचा प्रवाह ओळखण्याइतके ते धूर्त होते. भारतावर राज्य करायला लागल्यापासून पहिल्यांदाच ब्रिटिशांना एका भारतीय नेत्याशी समान पातळीवरून वाटाघाटी कराव्या लागल्या होत्या. खुद्द चर्चिललाही हे मान्य नव्हतं तो याविषयी कटुतेने आणि तक्रारीच्या सुरात बोले. गांधी तमाम भारतीयांच्या आकांक्षांचं प्रतिनिधित्व करतात आणि यापुढं त्यांच्याशी, त्यांच्या काँग्रेसशी गंभीरपणे व्यवहार करायला हवा हे ब्रिटिशांनी प्रथमच मान्य केलं होतं.

याचा अर्थ सगळं आलबेल होतं, ब्रिटिश यापुढं काँग्रेसला कधीच धुडकावणार नव्हते असा नाही; पण फार काळ ते ही दडपशाही चालवू शकणार नव्हते. आता भारताला स्वातंत्र्य द्यायचो ब्रिटिशांची इच्छा आहे की नाही हा प्रश्न नव्हता, तर ते कसं आणि कधी देणार एवढाच मुद्दा होता.

त्या वेळी हे फक्त गांधींनाच स्पष्टपणे कळलं होतं. आमच्या गप्पांच्या वेळी त्यांनी मला बरंच सांगायचा प्रयत्न केला; पण माझा आकलनाचा वेग फार संथ होता हे कबूल केलं पाहिजे. मीच कशाला, गांधींच्या भोवतालचे इतर नेतेही कमालीचे निराश झाले होते. जाहीररीत्या ते वाटाघाटीत 'विजय' मिळवल्याबद्दल गांधींची स्तुती करत. त्याशिवाय त्यांना पर्याय नव्हता; पण खाजगीत ते गांधींच्या 'शरणागती'बद्दल बोलत. काही वेळा माझ्याशी बोलतानाही ते याचा उल्लेख करत.

करारानुसार गांधींनी असहकाराची चळवळ मागं घ्यायचं मान्य केलं होतं. ब्रिटिश मालावरचा बहिष्कार ते शिथिल करणार होते

## पूर्वसूत्र

तीस-एकतीस सालच्या फेब्रुवारी महिन्यातली गोष्ट. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाची वार्तापत्रं लिहायला ' शिकागो ट्रिब्यून 'चे प्रतिनिधी म्हणून शिरर भारतात दाखल झाले. गांधी-आयर्विन बोलणी सतत ' चालू होती; पण तडजोडीच्या अटी नक्की होत नव्हत्या. त्या गडबडीत गांधींनी शिरर भेट नक्की केली. गांधी त्या वेळी एकसष्ट वर्षांचे होते. वार्तापत्रं लिहिण्याच्या निमित्तानं शिरर गांधींना भेटत, तेव्हा त्यांना जाणवला त्यांच्या कामाचा झपाटा, उत्साह आणि प्रसन्नता. नेहरू, महादेवभाई, सरोजिनी नायडू यांच्या परिचयातून गांधींची अधिक ओळख होत होती.

३ मार्चला व्हाइसरिगल पॅलेसमध्ये मध्यरात्रीपर्यंत वाटाघाटींचं सत्र चाललं होतं. त्याच दिवशी रात्री गांधी शिररना म्हणाले, ' अजून तडजोड झालेली नाही. '

दुसऱ्याच दिवशी सकाळी गांधी-आयर्विननं तडजोडीच्या मसुद्यावर सह्या केल्या. घटना महत्त्वाची होती !

# ' गांधी—अ—मेमॉर '

या विल्यम शिरर लिखित पुस्तकाचा परिचयात्मक संक्षेप व स्वैर रूपांतर : भाग : तिसरा

## निखिल वागळे

आणि पोलीस–अत्याचाराच्या चौकशीची मागणीही त्यांनी सोडून दिली होती. लंडनला होणाऱ्या गोलमेज परिषदेत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून सहभागी व्हायला ते तयार झाले होते. तिथेच नव्या घटनेची चर्चा होणार होती. त्या बदल्यात सर्व राजकीय कैद्यांची सुटका करायचं, त्यांच्यावरचे खटले मागे घ्यायचं आणि जप्त केलेली जी मालमत्ता अजून सरकारजवळ आहे ती परत करायचं ब्रिटिशांनी कबूल केलं होतं. शिवाय किनाऱ्यावरच्या लोकांना मीठ तयार करून विकायची परवानगी देण्यात आली होती. इतर भागातलं मिठाच्या कायद्याचं बंधन त्यांच्यावर नव्हतं.

नव्या घटनेची चर्चा गोलमेज परिषदेत करण्याची ब्रिटिशांची अट गांधींनी मान्य केली म्हणून त्यांचे सहकारी सगळ्यात नाराज झाले होते. ' हा आमच्या दृष्टीने मोठा धक्का आहे ' नेहरू मला म्हणाले. करारातली ' संरक्षक तत्त्वं ' नेहरूंना चिंताजनक वाटत होती. त्यामुळं ' घटनात्मक ' सरकारची सूत्रं ब्रिटिशांच्याच हातात रहाणार होती. काँग्रेसच्या स्वराज्याच्या मागणीचा करारात साधा उल्लेखही नव्हता.

त्या वेळी मला नेहरूंबद्दल सहानुभूती वाटली हे निश्चित.

पण गांधींनी आम्हा सुमारे अर्धा डझन पत्रकारांना संध्याकाळी प्रार्थनेआधी गप्पांसाठी बोलावलं, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर निराशेचा लवलेशही नव्हता. इतिहासातला तो पहिला अहिंसक लढा मागे घेतल्यानं त्यांना नुसतं सुटल्यासारखं वाटत नव्हतं तर भावी शांततेच्या आशेनं ते खुषीतही होते.

' अखेर मी शांतताप्रिय माणूस आहे. ' त्यांनी सुरुवात केली.

' शांतता ? कोणतीही किंमत देऊन ? ' आमच्यापैकी कुणी तरी विचारलं.

' होय. करारानं फक्त शांतताच स्थापन होऊ शकते. कराराचं भवितव्य मात्र ब्रिटिशांनी स्वराज्याची मागणी मान्य करण्यावर अवलंबून आहे. '

' मला तर करारात तसं कुठं म्हटल्याचं दिसत नाही. ' मी त्यांना टोकलं.

गांधींना आता माझी सवय झाली होती. त्यांनी फक्त रोखून पाहिलं. नुकतीच मिस स्लेडनी त्यांच्या जेवणाची थाळी बाजूला आणून ठेवली होती. खजूर, संत्री आणि शेळीचं दूध. गांधींनी जेवायला सुरुवात केली होती. क्षणभर ते थांबले. तोंडातला घास त्यांनी संयमपणे चावला. दुधाचा एक घुटका घेतला आणि म्हणाले, 'लंडनच्या पहिल्या गोलमेज परिषदेच्या वेळी ब्रिटिशांकडून मिळवल्यासारखं वाटतंय ते अर्धअधिकही नाही हे मला मान्य करायला हवं. पुढच्या परिषदेच्या वेळी काँग्रेस आपलं म्हणणं पटवून देऊ शकली तर मात्र पूर्ण स्वराज्य हेच त्याचं फळ असेल असं मी निश्चितपणे म्हणीन. '

माझ्या दृष्टीनं हे थक्क करणारं होतं. करारातल्या ज्या तरतुदींचा नेहरूंना एवढा त्रास झाला होता त्याचाच गांधी असा अर्थ लावत होते !

' पूर्ण स्वराज्य हेच काँग्रेसचं ध्येय आहे. ' गांधी ठासून म्हणाले, ' भारताचा हा जन्मसिद्ध हक्क आहे. दुसऱ्या कशानंही भारतीयांचं समाधान होणार नाही ! '

सगळं खरं. भारतीयांचा हा हक्क कोण नाकारू शकणार होतं ? पण करारात त्याची नोंद करून घेण्यात गांधी यशस्वी झाले नव्हते. भारतीयांना स्वराज्य देण्याच्या ब्रिटिशांच्या हेतूविषयी त्यात एक ओळही नव्हती.

मी त्यांना त्यातल्या ' संरक्षक तत्त्वांविषयी ' विचारलं. ' भारताच्या हितासाठी ' असं त्याबद्दल करारात म्हटलं होतं !

ही ' संरक्षक तत्त्वं ' फसवी आहेत, त्यामुळं या देशाच्या गळ्याला

फास लागणार आहे, त्याचे हात पाय बांधले जाणाराहेत असंच ना?' त्यांनी विचारलं.

'तुमचे काही सहकारीच तसं म्हणतात.' मी स्पष्ट केलं.

'पण ही तत्त्वं भारतासारख्या, सरकार चालवण्याबाबत अननुभवी असलेल्या देशाच्या दृष्टीनं उपयोगीही ठरू शकतील' गांधी म्हणाले. आपल्या सहकाऱ्यांच्या अगदी विरोधी मत ते व्यक्त करत होते. माझ्या मते त्यांनी आम्हा पत्रकारासमोर हा विरोधाभास व्यक्त करायला नको होता.

'मला माझी भूमिका स्पष्ट करायला हवी.' संत्र्याचा तुकडा तोडत, दुधाचा घुटका घेत ते पुढे म्हणाले, 'भारत हे काही काँग्रेसच्या मते आजारी मूल नव्हे की, त्याला परदेशी मदत लागेल. संपूर्ण स्वातंत्र्याचा काँग्रेसचा अधिकार कोणी नाकारू शकत नाही हाच आम्हाला सरकारकडून मिळालेल्या गोलमेज परिषदेच्या निमंत्रणाचा अर्थ आहे.'

नंतर बराच वेळ ते काहीसं धार्मिक बोलत होते. 'ईश्वरेच्छेनेच' ही शांतता स्थापन झाली आहे वगैरे. असं ते बऱ्याचदा करत. राजकारणावर बोलता बोलता अचानक देवाधर्मावर घसरत. त्यांची गाडी रुळावर आणायला मी विचारलं, 'काही दिवसांपूर्वी अमृतसरच्या हत्याकांडानंतर ब्रिटिशांवर आपला विश्वास राहिलेला नाही असं तुम्ही म्हणाला होता. मग आता करारातल्या अटी ते काटेकोरपणे पाळतील असं तुम्हाला वाटतं का ?'

करारातल्या शेवटच्या वाक्याकडे मी त्यांचं लक्ष वेधलं–'करारातल्या अटी पाळण्यात काँग्रेसला अपयश आलं तर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीनं आवश्यक ती सर्व पावलं सरकार उचलेल !'

अटी पाळण्यात सरकार अपयशी ठरलं तर काय याविषयी त्यात काहीच म्हटलं नव्हतं आणि नंतर खरोखरच करारावरच्या सह्यांची शाई वाळण्याआधीच सरकारनं कराराच्या अटी मोडल्या म्हणून गांधींना वारंवार खेटे घालावे लागले. त्या वेळचं त्यांचं उत्तर मात्र आशावादी होतं !

'वाटाघाटींनी भारताला स्वातंत्र्य मिळवायचं असेल तर ब्रिटिशांच्या सदिच्छेची आणि प्रत्यक्ष मदतीची गरज आहे.' ते म्हणाले,

'या करारामुळं एक खेळी तुम्ही जिंकलात असं तुम्हाला वाटतं का ?' एका पत्रकारानं विचारलं.

गांधी अर्थातच अशा प्रश्नाला तयार होते.

'करारात कुठच्या बाजूचा विजय झाला हे सांगणं शक्य नाही. ते शहाणपणाचंही होणार नाही. 'विजय' झालाच असेल तर तो दोन्ही बाजूचा असं म्हणावं लागेल. असल्या 'विजया' साठी काँग्रेसचा लढा नाही. आमचं ध्येय एकच–पूर्ण स्वराज्य ! ते साध्य होईपर्यंत विजयाचा प्रश्नच नाही.' ते म्हणाले.

आणखी बरंच काही त्या मुलाखतीतून आम्हाला मिळालं. जवळजवळ दोन तास गांधी बोलत होते. बऱ्याच विषयांना त्यांनी स्पर्श केला.

देशातल्या संस्थानाविषयी, तिथल्या मुजोर राजाविषयी आणि ब्रिटिशांच्या मदतीनं चाललेल्या त्यांच्या जुलमी कारभाराविषयी ते पहिल्यांदाच बोलले.

अशी ५६२ संस्थानं त्या वेळी देशात होती. चाळीसएक मोठी सोडली तर बाकी सगळी लहान लहान. त्यातले अनेक राजे भ्रष्ट, क्रूर होते आणि आपल्या प्रजेला मुक्या-बहिऱ्यांसारखे वागवत असं सर आल्बिअन बॅनर्जी या त्या वेळच्या प्रतिष्ठित नागरिकानं म्हटलं होतं. सगळ्यात कहर केला होता पतियाळाच्या महाराजाने. त्याच्यावर बलात्कारापासून खुनापर्यंत सगळे आरोप होते. लॉर्ड आयर्विननं त्याच्या चौकशीचाही आदेश दिला होता. पण चौकशी-अधिकारी निवडला महाराजानंच. साहजिकच तो निर्दोष सुटला. या चौकशीनंतर लवकरच महाराजानं स्वराज्याच्या मागणीला असलेला आपला पाठिंबा काढून घेतला. ब्रिटिशांनी या त्याच्या 'सेवे' मुळं त्याला राजाच्या सैन्यात 'लेफ्टनंट जनरल' म्हणून बढती दिली !

ब्रिटिशांच्या आधिपत्याखालच्या भारतातल्या सर्व राज्यांत काँग्रेसची संघटना मजबूत होती. संस्थानात मात्र काँग्रेसनं तसा प्रयत्न केला नव्हता. तिथल्या आपल्या संघटकांना तुरुंगात टाकण्यापासून त्यांचा खून करेपर्यंत काहीही होऊ शकेल अशी भीती त्यांना वाटत होती. गांधींनी एकदा मला याचं कारण सांगितलं होतं. त्यांना लढ्याचा रोख ब्रिटिशांविरुद्धच ठेवायचा होता. एकदा स्वातंत्र्य मिळालं की या संस्थानांना सरळ करता येईल असं त्यांना वाटत होतं. कारण आता त्यांना ब्रिटिशांचंच संरक्षण होतं आणि त्याच बळावर ते मुजोर झाले होते. या संस्थानात लोकशाहीसाठी चाललेल्या चळवळीला मात्र काँग्रेसचा पाठिंबा होता. गोलमेज परिषदेच्या वेळी या महाराजांना नबाबांना ब्रिटिश आपल्याविरुद्ध फिरवायचा प्रयत्न करतील हे गांधी ओळखून होते. 'फोडा आणि राज्य करा' या अनेक व्हाईसरॉयनी वापरलेल्या तंत्रामुळेच हे राजे-महाराजे आजवर भारतीयांविरुद्ध वागले होते.

स्वतंत्र भारतात लोकशाही असेल हे सांगताना गांधी म्हणाले, 'हे राजे कितीही परोपकारी असोत पण त्यांची हुकूमशाही आणि लोकशाही एकत्र नांदू शकणार नाहीत. या संस्थानातल्या धडामोडीत हस्तक्षेप करायचं काँग्रेसनं आजवर मोठ्या संयमानं टाळलं आहे; पण हे संस्थानिक आता तरी आपल्या नागरिकांचं मागणं ऐकतील अशी मी आशा करतो.''

गांधींच्या दृष्टीनं त्या कराराबरोबरच स्वातंत्र्यासाठी चाललेल्या लढ्याचा शेवटचा टप्पा सुरू झाला होता. अनेकदा मला हे सांगायचा त्यांनी प्रयत्न केला. पण ब्रिटिशांच्या सामर्थ्याची एवढी छाप माझ्यावर होती की, मी त्यांच्यावर पूर्णपणे विश्वास ठेवू शकलो नाही.

दुसऱ्या दिवशी, सहा मार्चला, माझं गांधींबरोबर खूप बोलणं झालं. येतानाच मी थोडक्यात नेमके प्रश्न तयार करून आलो होतो. त्यांना थोडक्यात उत्तरं मिळाली तर बरं, असं मी सुरुवातीलाच गांधींना सांगितलं.

'कराराबद्दल आता माझा विचार बदलू लागला आहे.' असं ते म्हणाले. तिथूनच चर्चेला सुरुवात होणं स्वाभाविक होतं. आदल्या दिवशीच शांतता स्थापन करणारा करार म्हणून त्यांनी त्याची स्तुती केली होती आणि आज त्यांना तो 'चलाऊ', 'कामापुरता' वाटत होता. त्यामुळे भारताला त्वरित स्वातंत्र्य मिळालं नाही तर तो मोडेल असं ते म्हणाले.

मी त्यांच्या त्या मताचा आदल्या दिवशीच्या बोलण्याशी असलेला

विरोधाभास दाखवून द्यायचा प्रयत्न केला; पण असा काही विरोधा-भास असल्याचंच त्यांनी नाकारलं.

'ब्रिटिश आम्हाला बरोबरीची वागणूक देणार असतील तर काही काळ त्यांच्या साम्राज्याचा भाग म्हणून रहायला माझी तयारी आहे; पण आमची इच्छा असेल तेव्हा आणि तसं स्वातंत्र्य द्यायची त्यांनी तयारी दाखवली पाहिजे' ते म्हणाले.

गांधीनी या मुद्द्यावर बराच विचार केला असावा. बराच वेळ ते स्पष्टोकरण देत होते. लंडनला होणाऱ्या गोलमेज परिषदेत आपण पूर्ण स्वराज्याचा आग्रह धरू, पण अर्थातच काही 'संरक्षक तत्त्व' स्वीकारून असं ते म्हणाले.

'ही सरंक्षक तत्त्वं' कोणती ?' मी फारच आग्रह धरला. 'करा-रांत काही तत्त्वं तुम्ही मान्य केली आहेतच...'

'उदाहरणार्थ अल्पसंख्याकाचे हक्क किंवा आर्थिक प्रश्नावर' ते म्हणाले.

राष्ट्राच्या आर्थिक समस्यांवर बोलताना त्याना पहाणं ही काहीशी अनपेक्षित गोष्ट होती. मुंबई विद्यापीठाचे प्रा. के. टी. शहा त्याचे याबाबतचे एक सल्लागार होते. गाधीची या प्रश्नांबाबतची समज थक्क करणारी आहे असं मला त्यानी सागितलं होतं.

'देशावरच्या कर्जाचा भार स्वीकारायचं तुम्ही नाकाराल का ?' मी विचारलं. काही ब्रिटिश वृत्तपत्रांनी तसा प्रचार चालवला होता.

'एक नवा पैसाही नाकारणार नाही. कांग्रेसनं राष्ट्रीय कर्जाचा भार स्वीकारणार नाही असं कधी म्हटलेल नाही. आम्ही फक्त येणाऱ्या नव्या सरकारवर न्याय्य ऋण लादलं जावं असं म्हटलंय.'

नंतर बराच वेळ ते बोलत होते. युद्ध लढण्यासाठी ब्रिटननं काढ-लेल्या कर्जाचा भार स्वीकारायला त्यांचा विरोध होता. कारण या युद्धांशी भारताचा काहीही संबंध नव्हता असं त्यांचं म्हणणं. भार-तीयांची दडपशाही करण्यासाठी ठेवलेल्या पोलिसांवर केलेल्या खर्चाचा भार उचलायलाही त्यांचा सक्त विरोध दिसला.

"सैन्याच काय ?" मी विचारलं. "देशाच्या संरक्षणासाठी काही सैन्य लागणारच. करारातल्या संरक्षक तत्त्वानुसार ते ब्रिटिशांच्याच हातात रहाणार आहे."

"ज्या ब्रिटिश अधिकारी आणि जवानाच्या सेवेची भारताला गरज असेल त्याचा पगार आणि इतर अटी पूर्ण करण्याच्या हमीपेक्षा कोणतंही संरक्षक तत्त्व याबाबत स्वीकारायचा विचारही मी करू शकत नाही." ते म्हणाले.

नेहरू यालाही कसेबसेच तयार झाले होते. ब्रिटिश जवानांची पेन्शन स्वतंत्र भारताला द्यावी लागेल हे त्यांना सुरुवातीला पटत नव्हतं. स्वातंत्र्य मिळाल्यावर या सगळया जवानांची त्यांच्या माय-देशी रवानगी करायची, यावर मात्र ते ठाम होते.

नंतर मी गांधीना ब्रिटिश मालावरच्या बहिष्काराबद्दल विचारलं. राजकीय हत्यार म्हणून वापरण्यात येणारा हा बहिष्कार मागं घेतला जाईल असं करारात म्हटलं होतं; पण नंतर एका पत्रकाद्वारे हा बहिष्कार'मागे घेण्यात येणार नाही असं नेहरूंनी कांग्रेसचे अध्यक्ष म्हणून जाहीर केलं होतं. सरकारनं यामुळं गांधीवर विश्वासघाताचा आरोप केला होता.

**गांधींनी या मुद्द्यावर बराच विचार केला असावा. बराच वेळ ते स्पष्टीकरण देत होते. लंडनला होणाऱ्या गोलमेज परिषदेत आपण पूर्ण स्वराज्याचा आग्रह धरू पण अर्थातच काही 'संरक्षक तत्त्व' स्वीकारून, असं ते म्हणाले.**

"बहिष्काराबद्दल एवढा गैरसमज का व्हावा हेच मला कळत नाही." गांधी हसतहसत म्हणाले, "बहिष्कार मागं घेतला जाणार नाही. कारण ते फक्त राजकीय हत्यार नाही. आमच्या अस्तित्वा-साठीच तो अपरिहार्य आहे !"

हिंदू-मुस्लिम तणावाबद्दल भारतातच नव्हे तर परदेशातही चिंता व्यक्त केली जात होती. स्वतंत्र भारतात ते कसे एकत्र राहू शकतील याविषयी अनेकांच्या मनात शंका होती.

"पुढच्या गोलमेज परिषदेपूर्वी तुम्ही हा प्रश्न सोडवू शकाल यसं तुम्हाला खरोखरच वाटतं का ? " मी विचारलं, "मला माहितीय तुम्ही यासाठी बरीच वर्षं प्रयत्न करताहात. काही वेळा तुम्हाला यश मिळालं; पण अंतिम तडजोड मात्र कधीच दृष्टिपथात आलेली नाही. मग या वेळी ... ?"

"मला तसं वाटतं." ते म्हणाले, "आम्ही जर हा प्रश्न सोडवण्यास यशस्वी झालो नाही तर गोलमेज परिषदेलाच काही अर्थ रहाणार नाही !"

थोडा वेळ ते विचारात गढल्यासारखे थांबले आणि माझ्याकडे एकटक बघत म्हणाले, "सामान्य हिंदू-मुस्लिमात शत्रुत्व नाही हे तुम्ही पाहिलंच असेल. देशातल्या बहुतेक भागात ते शांततेने, बंधुतेने रहाताहेत. खरं तर त्यांच्यातली भांडणं ही खरी समस्याच नाही. भांडण आहेत ती त्यांच्या नेतृत्वात. तेच उपद्रवाला चिथावणी देतात. त्या निमित्तानं ते ब्रिटिशाच्या हातातली खेळणी बनतात; पण मी निराश झालेलो नाही. परिषदेआधीचा माझा बहुतेक वेळ आणि शक्ती याच प्रश्नासाठी मी देणार आहे. कुठे तरी यावर उपाय निघा-लाच पाहिजे !"

गाधी आपल्या उक्तीशी प्रामाणिक होते. लंडनला जाण्यापूर्वी काही तरी तडजोड निघावी म्हणून आठाठ दिवस मुस्लिम नेत्यांबरो-बर चर्चा करताना मी त्याना नतर पाहिलं. कित्येकदा ते यशाच्या अगदी जवळ आल्यासारख वाटे आणि पहाता पहाता यश निसटून जात असे !

त्या क्षणी मला तो इतिहासातल्या गहन प्रश्नापैकी एक वाटला. त्यावर कधी उत्तर निघू शकेल असं मला भारतात असेपर्यंत वाटलं नाही.

— आणि भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी याचं उत्तर मिळालं तेव्हा ते स्वीकारायचं गांधीनी नाकारलं. ते त्यांना हृदयविदारक वाटलं !

संध्याकाळी उशीरा गांधींनी मला बोलावलं. त्यांचं जेवण, प्रार्थना आटोपली होती. आपल्या देशबांधवांना आणि कदाचित जगाला, उद्देशून त्यांना एक पत्रक काढायचं होतं. माझ्या टाइपरायटरवर मी

ते उतरवून घेऊ शकेन का, असं त्यांनी मला विचारलं. त्यांच्या मते कराराबद्दल बरेच गैरसमज पसरले होते आणि ते दूर करणं भाग होते.

"मला जे काही सांगायचंय ते तुझ्यासारख्या अमेरिकन पत्रकाराच्या फारसं उपयोगाच नाही; पण तुला वाटल तर जरूर तू त्याचा वापर बातमीसाठी करू शकतोस." ते म्हणाले.

मला थोडं आश्चर्य वाटलं, आनंदही झाला. त्यांच्या घरात एखादा टाइपरायटर निश्चितच असावा.मी आजवर पाहिला नव्हता हे खरं; पण तसं मला वाटत होतं. गांधींनी याआधी एवढी मदत मला केली होती की, त्याची ही छोटीशी विनंती मान्य करणं हे काही फार मोठसं नव्हतं. शिवाय त्यांच्या सहवासातला प्रत्येक क्षण माझ्या दृष्टीनं मोलाचा होता.

पत्रकाचा मजकूर सांगताना गांधींचा आवाज मला अधिकच गोड वाटला. ते हळुवारपणे, संथ गतीनं बोलत होते; पण त्यामुळंच त्यांच्या आवाजाला कवितेची लय प्राप्त झाली होती.

आपल्या देशबांधवांना उद्देशून ते म्हणाले, "अनेकजण या करारामुळं निराश झाले आहेत, हे मला माहीत आहे यातना सहन करणं हे त्यांच्या दृष्टीनं वीरत्वाचं लक्षण आहे, ते त्याना श्वासोच्छ्वासाइतक सहजसाध्य वाटतंय... पण यातनानाही एक लक्ष्मणरेषा असते. या मर्यादेनंतर यातना सहन करणं नुसतं वेडेपणाचं नाही तर महामूर्खपणाचं ठरतं. म्हणूनच करार झाल्याबद्दल मी सर्वशक्तिमान ईश्वराचे आभार मानतो ! "

नंतर त्यांनी पूर्ण स्वराज्य हेच कॉंग्रेसचं ध्येय असल्याचं भारतीयांना पुन्हा एकदा आश्वासन दिलं.

देशातल्या दहशतवाद्याच्या छोट्या गटाला आवाहन करताना ते म्हणाले, 'मला माझ्या अहिंसक मार्गानं ही क्रांती पूर्ण करण्याची संधी द्या !'

गांधीना दहशतवाद्याबद्दल फारसं बोलायला आवडत नाही असं माझं मत झालं होतं; पण आता त्यांनीच तो विषय काढला. ते सांगू लागले, 'दहशतवाद्यांचा हा गट लहान असला तरी सुसंघटित आणि क्रियाशील आहे. हिंसेच्या मार्गानंच देश स्वतंत्र होऊ शकेल असं त्याना वाटतं. त्यांनी निदान अनुभवानं तरी शहाणं व्हायला हवं. आज देशात दिसणारी प्रचंड जागृती ही अहिंसक मार्गाचीच परिणती आहे हे तेही नाकारू शकणार नाहीत !'

'शिवाय मिठाच्या सत्याग्रहानंतर थोडेच महिने उलटले आहेत. काळाच्या प्रवाहात तर हे काही सेकंदच. या दहशतवाद्यांनी आणखी काही काळ वाट पहायला हवी. आपली अमूल्य आयुष्यं त्यांनी मातृभूमीच्या भावी सेवेकरता जपली पाहिजेत. ज्यांना हिंसेच्या आरोपावरून किंवा अगदी खुनाच्या आरोपावरूनही अटक झाली आहे, त्या सर्व राजकीय कैद्यांच्या सुटकेचा प्रयत्न करण्याची संधी त्यांनी कॉंग्रेसला दिली पाहिजे. अर्थात मला कोणतीही खोटी आशा दाखवायची नाही, हेही तितकच खरं !'

**" मला जे काही सांगायचं ते तुझ्यासारख्या अमेरिकन पत्रकाराच्या फारसं उपयोगाचं नाही; पण तुला वाटलं तर त्याचा वापर बातमीसाठी करू शकतोस " ते म्हणाले.**

**पत्रकाचा मजकूर सांगताना गांधींचा आवाज मला अधिकच गोड वाटला.**

**त्यांच्या आवाजात कवितेची लय होती.**

हे शेवटचं त्यांनी भगतसिंग आणि त्याच्या दोन सहकाऱ्याना उद्देशून म्हटलं होतं. लाहोरमध्ये एका ब्रिटिश अधिकाऱ्याचा खून केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता आणि अत्यंत जुजबी पुराव्याच्या आधारावर त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. एका ब्रिटिश पोलिसाचा किंवा अधिकाऱ्याचा खून करणं म्हणजे तीन-चार भारतीयांनी आपला जीव गमावणं हे गांधी ओळखून होते. मीही याचा अनुभव घेतला होता. ब्रिटिशाची सूडाची ती पद्धत होती; पण भगतसिंगाच्या खटल्यात पुरावा एवढा वरवरचा होता की, त्याला शिक्षा झाली तेव्हा देशात सर्वत्र संतापाचं वातावरण पसरलं होतं. त्यामुळं शांततेच्या दृष्टीनं व्हाइसरॉय या तिघा तरुणांची शिक्षा कमी करेल आणि गोलमेज परिषदेच्या दृष्टीनं देशात अनुकूल वातावरण निर्माण होईल अस गांधीना वाटत होतं.

गांधीनी व्हाइसरॉयला नंतर तशी विनंतीही केली; पण उपयोग झाला नाही. एकोणीस मार्चला व्हाइसरॉयनं त्या तरुणांचा, गांधीचा आणि इतर नेत्यांचा शिक्षा कमी करण्याचा अर्ज फेटाळून लावला ! लगेच पुढच्याच आठवड्यात फाशी देण्याचही जाहीर केलं. चोवीस मार्चला तुरुंगातच अत्यंत गुप्ततेनं त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आणि त्यांची रक्षा सतलज नदीत टाकली गेली. एरवी फाशी दिलेल्यांची शवं त्यांच्या नातेवाइकाकडे सोपवली जातात; पण भगतसिंग आणि त्याच्या सहकाऱ्यांवर असे जाहीर अंत्यसंस्कार झाले तर जमाव हाताबाहेर जाईल असं,ब्रिटिश अधिकाऱ्यांना वाटलं.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सारा देश शोकमग्न झाला. उत्स्फूर्त हरताळ पाळण्यात आला. राष्ट्रीय चळवळीचे तिरंगी झेंडे सर्वत्र अर्ध्यावर उतरले. ब्रिटिश पोलीस आणि सैन्याची गस्त रस्त्यारस्त्यावर चालू झाली. ते कुठेही मोठा जमाव जमू देत नसत.

मी त्या वेळी कॉंग्रेसच्या पचेचाळिसाव्या वार्षिक अधिवेशनासाठी कराचीला गेलो होतो. तिथे तर एवढा प्रचंड असतोष होता की, कॉंग्रेस हा गांधी-आर्यविन करार धुडकावून लावेल असं वाटत होतं.

सांगता सांगता विचाराची साखळी जुळवायला गांधी थांबले. थोड्या वेळाने म्हणाले, 'आता देशातल्या तरुणांसाठी चार शब्द. मग संपलं !'

'तरुण मित्रांनो, हा करार म्हणजे काही शांततेचा अंतिम मसुदा नव्हे हे तुम्ही समजून घेतलं पाहिजे. ही तात्पुरती तडजोड आहे. अशा वेळी तुम्ही सदसद्विवेकानं,सहनशीलतेनं वागाल अशी मी आशा करतो. मी एकसष्ट वर्षांचा तरुण आहे असं म्हटलं जातं; पण 'म्हातारडा' असा माझ्यावर शिक्का मारला गेला असता तरीसुद्धा तुमच्या चांगुलपणाला आवाहन करायचा हक्क मला आहे. याचा अर्थ म्हाताऱ्या माणसांनी सांगितलेलं सगळंच मान्य करा असं मी म्हणत नाही. तुम्ही विचार करा आणि त्याची योग्यायोग्यता ठरवा. आमचं चुकल आहे असं तुम्हाला वाटलं तर आम्हाला झुगारून द्या आणि सगळी सूत्रं तुमच्या हाती घ्या !'

नंतर आपल्या आवडत्या विषयानं गांधींनी ते पत्रक संपवलं शिस्तीचं महत्त्व आणि देवाची इच्छा वगैरे नेहमीचंच.

त्याच्या शब्दांनी आणि साध्या सरळ सांगण्यानं मी इतका भारावून गेलो होतो की, कित्येकदा टाइप करतानाही थबकत असे. वाचण्यापेक्षा ऐकण्यात खरी मजा होती. सगळ्या भारतीयांना ते ऐकायला मिळाले असते तर...मी विचार करू लागलो.

टाइपरायटरवरचे कागद मी काढले आणि गांधींकडे दिले. महादेवभाई देसाईंच्या मदतीने त्यांनी ते व्यवस्थित लावले. एक प्रत माझ्याकडे देत म्हणाले, 'कदाचित तुम्ही यातलं काही वापरू शकाल'

जाताना त्यांनी माझे पुन्हा पुन्हा आभार मानले.

¤

गांधी–आर्यविन वाटाघाटीची दुसरीही एक बाजू होती. माझ्या किंवा गांधींच्या दृष्टीनं तो भारतीय क्रांतीतला महत्त्वाचा टप्पा असला तरी ब्रिटिशांना तसं वाटत नव्हतं. त्यांच्या दृष्टीनं एक तात्पुरता उपद्रव मिटला होता इतकंच. भारतीय राष्ट्रवादाच्या प्रखरतेची त्यांना किंचितही जाणीव नव्हती.

तिथं हिमालयापलीकडच्या चीनमध्ये असाच एक राष्ट्रवाद पेटू पहात होता. परकीय सत्तेचं उच्चाटन करायचे प्रयत्न तिथेही वेग घेत होते. हन्स कोहन या अमेरिकन इतिहासकारानं म्हटल्याप्रमाणे हे 'आशियाचं बंड' च होतं.

एकतीस सालच्या सुरुवातीपर्यंत भारताला स्वातंत्र्य द्यायचा ब्रिटिशांचा किंचितही उद्देश नव्हता. तशी गरजही त्यांना दिसत नव्हती. भारतीयांना एकमेकांविरुद्ध झुजत ठेवून आपण इथे अनंतापर्यंत राज्य करू आणि इथल्या फायद्याच्या जोरावर ब्रिटिश अर्थव्यवस्थेला लागलेली उतरती कळा सावरू शकू, अशा भ्रमात ते होते. दिल्लीत मी व्हाइसरॉय आणि त्यांच्या अधिकाऱ्यांशी बोललो; पण काळ आणि इतिहासाचा प्रवाह आपल्याविरुद्ध जातोय याचा त्यांना थांगपत्ताही असल्याचं दिसलं नाही.

गांधी याविषयी निश्चित होते. काळ आणि इतिहासाचा प्रवाह आपल्याबरोबर आहे असं ते अनेकदा मला सांगत. महायुद्धात ब्रिटन जेत्यांच्या बाजूला असलं तरी एवढी वित्तहानी–प्राणहानी झाली होती की, त्यामुळं राष्ट्राच्या सामर्थ्यावरच आघात झाला होता हे गांधींनी ओळखलं होतं. अशा परिस्थितीत भारतीयांच्या इच्छेविरुद्ध ब्रिटिश राज्यकर्ते फार काळ जाऊ शकणार नव्हते. गांधी इतिहासाचे अभ्यासक नव्हते; पण त्यांना इतिहासाची एक उपजतच जाण होती. व्हाइसरॉय आणि त्याचे अधिकारी पार्ट्या-मेजवान्या झोडण्यात मग्न होते. पोलो खेळण्यात किंवा थंड हवेच्या ठिकाणी शेकोटीची ऊब खाण्यात त्यांचा बहुतेक वेळ जायचा. देशातल्या जनतेपासून ते हजारो कोस दूर होते. गांधींना याची पूर्ण जाणीव होती; पण लंडनचे राज्यकर्ते यापेक्षा अधिक जाण दाखवतील अशीही त्यांची अपेक्षा नव्हती. अठराव्या शतकात अमेरिकन क्रांतीच्या वेळेलाही ब्रिटिशांनी तो मुत्सद्दीपणा दाखवला नव्हता. जे टाळणं शक्य नाही ते सोडावं, बखेडा टाळावा अशी जणू त्यांची वृत्तीच नव्हती. अमेरिकेतला लढा रक्तरंजित होता. गांधींच्या चळवळीत रक्तपात होणार नव्हता; पण तिची तीव्रता तेवढीच होती.

आपल्या आयुष्यात आपण हा लढा जिंकू याविषयी गांधींना शंका

'परमेश्वराच्या इच्छेनं आणखी काही वर्षं माझ्या नशिबी आहेत' ते हसत म्हणाले.
मी त्यांच्या आत्मविश्वासानं चक्रावून जात असे.
मग ते मला चिडवत.
'मिस्टर शिरर, माझ्या प्रिय मित्रा' ते म्हणत.
'आम्हाला स्वातंत्र्य मिळणारच–हो, आणि मी जिवंत असेपर्यंत! पहाशीलच तू!'

नव्हती. एकदा मी त्यांच्या वयाची आठवण दिली. ते बासष्ट वर्षांचे होते आणि फार काळ हाती आहे असं वाटत नव्हतं.

'परमेश्वराच्या इच्छेनं आणखी काही वर्षं माझ्या नशिबी आहेत.' ते हसत म्हणाले.

मी त्यांच्या या आत्मविश्वासानं चक्रावून जात असे. मग ते मला चिडवत.

'मिस्टर शिरर, माझ्या प्रिय मित्रा,' ते म्हणत, 'आम्हाला स्वातंत्र्य मिळणारच–हो, अगदी मी जिवंत असेपर्यंत! पहाशीलच तू!'

'पण ब्रिटिशांकडे बंदुका आहेत.' मी त्यांना अडवत असे.

'होय, पण आमच्याकडे बंदुकीपेक्षा महत्त्वाचं असं काही तरी आहे–सत्य आणि न्याय! शिवाय काळ आमच्याबरोबर आहेच.' ते गंभीर होऊन सांगत, 'स्वातंत्र्याची दुर्दम्य आशा बाळगणाऱ्या पस्तीस कोटी लोकांना कुणी फार काळ त्यापासून परावृत्त करू शकत नाही. दिसेलच ते तुम्हाला!'

एकदा दिल्लीत फिरणं संपता संपता ते मला विनोदानं म्हणाले, 'मी पैजा लावणाऱ्यांपैकी असतो तर ही पैज नक्कीच लावली असती!'

'मी सुद्धा!' मी हसतच उत्तर दिलं, 'पण ही पैज हरणंच मला आवडेल!'

'माझ्या मित्रा, फक्त माझे शब्द ध्यानात ठेव! तुझा माझ्यावर विश्वास नाही हे मला माहीत आहे; पण विश्वास ठेव...भारत स्वतंत्र झालेला मी पहाणार आहे आणि तोही माझ्या मृत्यूपूर्वी!!' त्यांचं म्हणणं कायम होतं.

आणि तो विषय तिथेच संपला होता.

¤

पत्रकाचा मजकूर सांगून झाल्यावर मी टाइपरायटर बंद करून निघण्याच्या बेतात असताना गांधी म्हणाले, 'तुम्ही माझ्याबरोबर सकाळी फिरायला कधी येणार आहात?'

'तुम्ही बोलवाल तेव्हा!' मी मिष्किलपणे उत्तर दिलं.

'सकाळी पाचला उठून यायचं म्हणजे तुमच्या दृष्टीनं कठीणच आहे नाही?' ते चिडवण्याच्या सुरात म्हणाले.

'अजिबात कठीण नाही. उलट थोडं उशीराच आहे ते!' मी त्यांना सांगितलं दिल्ली आणि शिकागोतल्या वेळेच्या अंतरामुळं अनेकदा मी पहाटे दोन–तीनपर्यंत बातमीपत्र लिहीत बसलेला असे. सहाजिकच त्यानंतर पाचपर्यंत जागं रहाणं माझ्या दृष्टीनं सोइस्कर होतं.

राजकारणाशिवाय आणखी एका गोष्टीची मला गांधींबरोबर चर्चा करायची होती. दोन-तीनदा आमच्या गप्पांच्या ओघात ते धर्मशास्त्राच्या तौलनिक अभ्यासाबद्दल बोलले होते. मी त्यावर विचार करावा असंही त्यांनी मला सुचवलं होतं. कदाचित ख्रिश्चन धर्माबद्दल माझ्या मनात असलेल्या शंकांची त्यांना जाणीव झाली असावी. या धर्मातल्या काही गोष्टींनी आपल्याला स्फूर्ती मिळाल्याचं ते मला म्हणाले होते. 'मी हिंदू असलो तरी माझा धर्म हिंदू धर्मातल्या आणि इतरत्रच्या चांगल्या गोष्टी घेऊन मी बनवला आहे' असं ते म्हणायचे. मुस्लीम धर्मातली बंधुत्वाची भावना, बुद्धाचं शहाणपण किंवा बायबलचा न्यू टेस्टामेन्टचा भाग त्यांना मोलाचा वाटायचा. वेळ मिळाल्यावर आपण यावर अधिक बोलू असं त्यांनी मला सांगितलं होतं.

त्यानंतर दोनेक आठवड्यांनी, एकवीस मार्चला, मी गांधींबरोबर पहिल्यांदा फिरायला गेलो.

दरम्यानच्या काळात त्यांच्याबरोबर अहमदाबादला जाऊन आलो होतो. त्यांच्या विनंतीवरून मी तिथे आडवाटेवरच्या काही गावांनाही भेटी दिल्या होत्या. परदेशी लोकांचं तर सोडाच; पण शहरात रहाणाऱ्या भारतीयांनीही हे जग फार क्वचितच पाहिलं असेल.

'तुम्ही दिल्ली, मुंबई किंवा इतर दोन-चार मोठी शहरं सोडून बाहेर पडला नाहीत तर तुम्हाला खरा भारत कळणारच नाही!' गांधी म्हणाले होते. 'या शहराबाहेर गावकुसावर अर्धपोटी जगणारी, दिवसरात्र दोन वेळच्या भाकरीसाठी राबणारी लाखो माणसं रहा-तात. तोच खरा भारत आहे!'

□

भारतातले ते दिवस मला अजूनही आठवतात.

त्या दिवसांत मी गांधींच्या अधिक जवळ आलो. त्यांचं व्यक्तिमत्त्व, त्यांची विचारपद्धती, त्यांची असाधारण बुद्धिमत्ता मला पूर्णपणे अनुभवायला मिळाली. भारतीय लोकांवरचा त्यांचा प्रभाव मी पाहिला. आजही हा प्रभाव मला गूढरम्य वाटतो.

या हजारो अशिक्षित, दरिद्री माणसांशी गांधींचा चाललेला सहजसंवाद मी पहिल्यांदा पाहिला तेव्हा विलक्षण हेलावलो होतो. फक्त महात्माच अशा तऱ्हेचा संवाद घडवू शकतो! पुन्हा दोन्ही बाजू त्यात सहभागी होत्या. गांधी लोकांकडे जात, लोकांना तर त्यांच्यापासून स्फूर्ती मिळेच; पण गांधींनाही आपला आत्मविश्वास, निर्धार वाढवणारी प्रेरणा लोकांकडून मिळत असे. या लोकांचं गांधींवरचं प्रेम, त्यांचा गांधींवर असलेला विश्वास केवळ उत्स्फूर्त होता गांधींना फक्त पहायला ते हजारोंच्या संख्येनं जमत म्हणजे बघत.

नंतर नाझी युद्धाच्या वेळी मी असा जमाव जर्मनीत पाहिला. हिटलरच्या न्यूरेम्बर्गच्या सभेला जवळजवळ दोन लाख जर्मन जमले होते! अर्थात ती सभा पूर्वनियोजित होती आणि भारतातली उत्स्फूर्तता त्यात नव्हती. हिटलरच्या अमोघ वक्तृत्वाचा प्रभाव जर्मनांवर असल्याचं त्या वेळी मी पाहिलं; पण गांधींकडे वक्तृत्वही नव्हतं., भाषण करताना ते क्वचितच आवाज चढवत. हावभावही फारसे नसत. कित्येकदा गांधींचे शब्द जमलेल्या लोकांच्या कानावरूनच नुसते जाताहेत अशी मला शंका येत असे. गांधींच्या दर्शनानेच या लोकांची सार्थकता झालेली असे. सुरुवातीला हे पाहून मी गोंधळात पडलो. आजही मला अनेकदा अचंबा वाटतो, या प्रकारामागची तर्कसंगता लागलीय असं म्हणता येत नाही.

आठ मार्चला सध्याकाळी गांधी अहमदाबादला जाण्यासाठी दिल्ली स्टेशनवर आले. जवळजवळ दहा हजारांचा जमाव तिथे जमला होता. गर्दीचा जो वेढा त्यांना तिथे पडला तो अगदी थेट अहमदाबादपर्यंत. चोवीस तासांच्या त्या प्रवासात त्यांना एक क्षणही झोप मिळाली नाही. प्रत्येक स्टेशनवर खेड्यापाड्यांतून आलेले लोक त्यांची वाट पहात होते. रेल्वेमार्गातून ही गर्दी दूर करण्यासाठी रेल्वेअधिकारी आणि पोलिसांना भयंकर कष्ट पडत होते या महात्म्याबरोबर एक स्टेशन तरी प्रवास करण्याचं भाग्य लाभावं म्हणून अनेकजण त्यांच्या डब्याला लोंबकळत होते. रात्री एका ठिकाणी तर दाढ्या वाढवलेल्या राजपुतांचा एक गट गाडीत शिरला. गांधी कुठे बसलेत हे कळेपर्यंत ते दांडगट कंदिलाच्या प्रकाशात गाडी धुडाळत होते. एकदा खेचाखेचीत कंदील आपटून भडकाच उडाला. गाडी पेटणार की काय असं वाटलं.

शिवाय हे खेडूत काही रिकाम्या हातानी आले नव्हते. फळं, भाज्या, कपडे, कातलेलं सूत आणि अगदी नाणीसुद्धा त्यांनी गांधींना भेट द्यायला आणली होती. शेवटी सामानाचा डबाही एवढा खच्चून भरला की, या भेटी ठेवायलाही जागाच उरली नाही!

मध्यरात्री गांधींचं मौन सुरू झालं; पण लोकांना त्याची पर्वा नव्हती. गांधींचं बोलणं ऐकायला ते आले नव्हतेच आणि दर्शनाचा कार्यक्रम मौनातही निर्वेधपणे पार पडू शकत होता!

एका स्टेशनवर एक प्राध्यापक आमच्या डब्यात आला. तो अहमदाबादला कसल्या तरी परिषदेसाठी चालला होता. गर्दीतून मार्ग काढण्यासाठी तो अगदी पिंजून गेल्यासारखा दिसत होता.

'या गर्दीबद्दल तुम्हाला काय वाटतं?' मी त्याला विचारलं.

'ही गर्दी अत्यंत स्वाभाविक आहे.' तो म्हणाला, 'लोकांना गांधींमध्ये आशेचा किरण दिसतोय. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आपण ज्या राजपुतान्यातून प्रवास करतो आहोत ते एक संस्थान आहे इथल्या राजे-महाराजांच्या जुलमी राजवटीतून गांधीच आपली सुटका करू शकतील असं इथल्या लोकांना वाटतंय. ते अशिक्षित असतील; पण मूर्ख नक्कीच नाहीत! एकदा ब्रिटिशांची सत्ता गेली की, आपल्या मुजोर राजांना कुणाचं संरक्षण रहाणार नाही हे ते ओळखून आहेत.'

पालनपूरला गाडी थांबली तेव्हा तिथला नवाब आमच्या गाडीत आला. गांधींबरोबर प्रवास करण्याची आपली इच्छा त्यानं आधीच तारेने कळवली होती. नेहमी अलिशान सूटमधून प्रवास करण्याची सवय असलेला तो मुस्लिम राजा तिसऱ्या वर्गाच्या घाणेरड्या डब्यात गांधींबरोबर तासभर बोलत बसला होता. त्या चर्चेत हिंदू-मुस्लिम प्रश्नासाठी आपलं वजन खर्च करायच आणि गोलमेज परिषदेत भारताची बाजू एकमुखानं मांडायचं त्यानं कबूल केल्याचं मला गांधींनी नंतर सांगितलं. बदलत्या काळाची पावलं ओळखलेल्या मोजक्या संस्थानिकांपैकी तो होता.

अनेक तासांच्या उशीरानंतर मध्यरात्रीच्या सुमाराला गाडी अहमदाबादला पोचली. इथूनच वर्षापूर्वी गांधींनी आपल्या दांडी-यात्रेला सुरुवात केली होती.

अहमदाबादमध्ये आपलं एवढं प्रचंड स्वागत होईल अशी गांधी-नाही अपेक्षा नसावी. गाडी अहमदाबादला पोचण्याआधी जवळच्या एका स्टेशनवर काँग्रेसचे काही स्थानिक-नेते गांधींना भेटायला आले. गांधींनी तिथेच उतरावं असं त्याचं म्हणणं होतं एक लाखाहून अधिक लोकांनी अहमदाबादला मुख्य स्टेशनापासून मिरवणूक काढ-ल्याचं त्यांनी सांगितलं. जमाव काबूत राहील अशी परिस्थिती नव्हती. चेंगराचेंगरीत अनेकजण जखमी झाले होते.

पण गांधी कशालाही घाबरतील असे गृहस्थ नव्हते. मृत्यूही त्यांना भीती घालू शकत नसे. त्यांनी आधी उतरायचं नाकारलं. ' लोक माझं स्वागत करायला आलेत, त्यांना निराश करणं बरोबर नाही ' असं त्यांनी या नेतेमंडळींना सांगितलं.

स्टेशनवरची गर्दी पाहून मीही घाबरलोच. यातून गांधी कसे सुट-तील असं मला वाटलं; पण काँग्रेस स्वयंसेवकाच्या मदतीनं त्यांनी त्यातून मार्ग काढला.

पुढे सगळा आठवडा गांधींना स्वागताचा हाच अनुभव येत होता. अनेकजण जखमी झाले. सर्वत्र जमाव हाताबाहेर जात होता. धक्का-बुक्कीत एकदा गांधीही पडले ! त्यांना थोडंसं लागलं. अतिश्रमानं बरंही वाटेनासं झालं. अर्थात तरीही त्यांचे सगळे व्यवहार नेहमी-सारखे चालू होते !

अहमदाबाद हे त्या वेळी कापडउद्योगाचं मोठं केंद्र होतं. इथले अनेक गिरणीमालक गांधींच्या चळवळीला आर्थिक मदत करत. त्यांच्याशी, कापडकामगारांशी किंवा देशातल्या विविध भागातून तिथे आलेल्या काँग्रेसनेत्यांशी बोलताना गांधींना नुकत्याच झालेल्या कराराविषयी असलेली त्यांची नाराजी जाणवली. लंडनच्या गोलमेज परिषदेत स्वातंत्र्याचं नेमकं आश्वासन मिळवण्यात गांधी अयशस्वी झाले तर लोक त्यांचं नेतृत्व झुगारतील असंही काहीजणांनी त्यांना बजावलं.

गांधीही लोकांना स्वातंत्र्याचं ठोस आश्वासन मिळालं नाही तर आपण पुन्हा चळवळ सुरू करू असं सांगत होते. त्या आठवड्यात त्यांनी याबद्दलच्या भावी योजनांची चर्चाही काँग्रेसनेत्यांबरोबर केली.

अहमदाबादला पोचल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी साबरमतीच्या तीरावर गांधींची प्रचंड सभा झाली. दीड लाख लोक त्याचं भाषण ऐकायला तिथे जमले होते. भाषण चालू असतानाही व्यासपीठाजवळ यायला लोकांची अखंड रेटारेटी चालू होती. शेवटी गांधींनी भाषण लवकर संपवलं आणि काँग्रेस स्वयंसेवकांच्या कड्यातून ते जाऊ लागले; पण लोकांनी स्वयंसेवकांना बाजूला सारलं. गर्दीत गांधींचा उजवा पाय दुखावला. डॉक्टरांनी त्यांना पुढच्या सर्व सभा रद्द कर-ण्याचा सल्ला दिला.

पण दुसऱ्या दिवशीची महिलांची सभा गांधींच्या दृष्टीनं महत्त्वाची होती. त्या निमित्तानं त्यांना देशभरच्या महिलांबद्दल कृत-ज्ञता व्यक्त करता येणार होती. कायदेभंगाच्या चळवळीत दहा हजारांवर महिलांनी भाग घेतला होता. स्वातंत्र्यलढ्यातली महत्त्वाची जबाबदारी आता या महिलांवर होती.

शहरातल्या बाजारातली ही सभाही प्रचंड झाली. रेटारेटीत आपण पुरुषांपेक्षा तसूभरही कमी नाही हेच तिथल्या बायकांनी सिद्ध केले. पन्नासेक हजारांची खचाखच गर्दी ! श्वास घ्यायलाही जागा नाही. असलं दृश्य मी पूर्वी कधीच पाहिलं नव्हतं. गांधींनी जमा-वाला शांत करायचे निकराचे प्रयत्न केले; पण अखेर त्यांनाही हताश व्हावं लागलं. गोंधळात त्यांचं भाषण कुणालाच ऐकू जाईना.

सर्किटहाउसमध्ये मी परतलो तेव्हा संध्याकाळी ते आश्चर्यकारक दृश्य माझ्या डोळ्यांसमोर तरळत होतं.

मी विचार करू लागलो...याच सर्किटहाउसमध्ये नऊ वर्षांपूर्वी मार्च १९२२ मध्ये, गांधींवरचा खटला चालवण्यात आला होता. गांधींनी त्या वेळी केलेलं भाषण बचावाचं नव्हतं, तर भारतीयांचा स्वातंत्र्याचा हक्क ठासून सांगणारं ते आव्हान होतं ! इथंच त्यांना सहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा देण्यात आली होती आणि त्या-मुळंच स्वातंत्र्याच्या लढ्याला क्रांतिकारी वळण मिळालं होतं...

(क्रमशः)

---

## महात्मा आणि माणूस : भाग चौथा

# दांडीयात्रेचा वाढदिवस

पुढील अंकात....

अहमदाबादमधल्या आमच्या वास्तव्यात गांधींनी मला ब्रिटिश-आधिपत्याखालच्या अमेरिकेची आठवण दिली. अमेरिकन स्वातंत्र्यलढ्यातल्या जगप्रसिद्ध ' बोस्टन टी पार्टी 'चं मिठाच्या सत्याग्रहाशी असलेलं साधर्म्य त्यांनी मला समजावून सांगितलं. नुकतंच दिल्लीमध्ये व्हाइसरॉयलाही त्यांनी हेच सांगितलं होतं. एकदा व्हाइसरिगल पॅलेसमध्ये चहा घेताना त्यांनी अचानक आपला जुना-पुराणा बटवा उघडला. त्यातून चिमूटभर मीठ काढलं आणि ते चहाच्या कपात टाकलं.

" तुम्हाला बोस्टन टी पार्टी आठवतेय ?" त्यांनी आश्चर्यचकित झालेल्या लॉर्ड आर्यविनला विचारलं....

पुस्तके

## अमर्याद सत्ता लाभूनही तो भ्रष्ट झाला नाही !

# कानिटकरांचा ' चर्चिल '

विन्स्टन चर्चिल या झंझावती व्यक्तिमत्त्वाचं समग्र राजकीय चरित्र चालू वर्षाच्या सुरुवातीला, जानेवारी ८२ मध्ये प्रसिद्ध झालं. दोन भागांत लिहिलेल्या ४५८ पानांच्या या विस्तृत ग्रंथाचे लेखक आहेत 'नाझी' कार श्री. वि. ग. कानिटकर.

पुस्तकाची सुरुवात होते विन्स्टनच्या पहिल्या जाहीर भाषणाच्या तयारीपासून, जेव्हा एक विशीतला भारलेला तरुण होता. 'कंट्री कौन्सिल'च्या कार्यकर्त्या मिसेस चँटबाईंनी शहरातल्या तरुणांमध्ये वाढणारं मद्यासेवन आणि बेशिस्ती याविरुद्ध प्रत्यक्ष चळवळ सुरू केली होती. एम्पायर थिएटर-मध्ये दंगामस्ती करणाऱ्या मुलात 'सँढर्स्ट' या लष्करी शाळेत दाखल झालेला विन्स्टनही होता. पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्याच्या ब्रिटनच्या परंपरागत भूमिकेशी विसंगत अशी ही चँटबाईंची चळवळ त्या वेळी या तरुण मुलांना वाटली. चँटबाईंच्या विरुद्ध 'दि एन्टरन्टेमेंटस प्रोटेक्शन लीग'या संस्थेच्या शाखा शहरात ठिक ठिकाणी स्थापन करण्याबाबतची जाहिरात 'डेली टेलिग्राफ'मध्ये दाखल झाली. कार्यकारिणीच्या पहिल्या सभेसाठी विन्स्टनने तीन दिवस खपून भाषणाची कसून तयारी केली. चमकदार वाक्यांची एकच गर्दी त्याच्या मनात उसळली. आयत्या वेळेला प्रचंड गर्दीसमोर फसगत होऊ नये म्हणून विन्स्टनने भाषण तोंडपाठ केलं. आता फक्त सभेचीच कमी होती. प्रत्यक्ष सभेच्या दिवशी मात्र सभास्थानी 'लिसेस्टर स्क्वेअर' या हॉटेलात संस्थेच्या संस्थापकांशिवाय कोणीच दिसत नाही. पुस्तकात विन्स्टनची पहिली ओळख अशी घडते. वक्तृत्वाची त्याची अतोनात हौस, त्यासाठी पूर्ण तयारी आणि छोटी छोटी परिणामकारक वाक्ये लिहून भाषण पूर्णपणे मुखोद्गत करण्याची त्याची पद्धत इथून सुरू होते. त्या वेळची मन:स्थिती सांगताना विन्स्टनने त्याच्या आठवणीत लिहिले आहे, 'लोकमताला योग्य दिशेने वळवणे मला वाटते तितके काही सोपे नव्हते. लोकशाहीने निर्माण केलेली ही पिढी, जर आपल्या स्वातंत्र्याकडे इतक्या उथळपणे पहाणार असेल, तर इतक्या शतकांच्या प्रयत्नाने प्राप्त झालेले भूभाग आणि राज्ये ही माणसं कशी काय सांभाळणार आहेत ?' लोकशाही आणि स्वातंत्र्य याबद्दल विन्स्टनची वयाच्या विसाव्या वर्षीदेखील काही ठाम निश्चित भूमिका होती, जी हे पुस्तक वाचताना पानापानावर स्पष्ट होत जाते.

पुस्तकातला यानंतरचा भाग म्हणजे चरित्राची खरी सुरुवात आहे. विन्स्टनचा जन्म, पाच वर्षांचा होताच छोटचा विनीची शिक्षणाला सुरुवात. अस्कॉट इथल्या बोर्डिंग शाळेत त्याची केलेली पाठवणी, तिथल्या कडक शिस्तीचा विन्स्टनवर झालेला गंभीर परिणाम म्हणून ब्रायटनच्या शाळेत प्रवेश, नंतर तेथून हॅरो विद्यालयात प्रवेश, तिथला 'निष्क्रिय आणि असमाधानकारक' कालखंड आणि त्याच वेळी हॅरोच्या सैनिकी शिक्षणाच्या वर्गात प्रवेश आणि शेवटी सँढर्स्टच्या रॉयल मिलिटरी कॉलेजातले विन्स्टनचे उत्साही व आनंदमय दिवस. विन्स्टनचा शिक्षणाचा बाजा वाजला तो असा. वडिलांची त्यानं बॅरिस्टर व्हावं ही इच्छा पूर्ण करणं विन्स्टनला जमलं नाही; पण १८९३ मध्ये विन्स्टन २१ वर्षांचा असताना त्याची ब्रिटिश सैन्यात घोडदळाचा कॅडेट अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर सुरू झाली त्याची शिपाईगिरी. या वेळेपर्यंत आपले बौद्धिक शिक्षण झाले नाही ही खंत विन्स्टनला सतत त्रास देत होती. इथे विन्स्टनच्या स्वभावातली महत्त्वाकांक्षा स्पष्ट होते. ही 'बौद्धिक खंत' दूर करण्यासाठी त्याने गिलन, मेकॉले, प्लेटो, शोपेनशवर, माल्थस, डार्विन यांचे इतिहास, तत्त्वज्ञान, धर्म आणि अर्थशास्त्रावरचे उत्तमोत्तम ग्रंथ वाचून काढले. चर्चिलच्या अमोघ, चपळ वक्तृत्वाची बीजे त्याना तरुणपणी केलेल्या अफाट वाचनात आहेत.

शिपाईगिरी करताना विन्स्टनची लिखाणाची हौस त्याला स्वस्थ बसू देईना. मालकंद खिंडीतल्या किरकोळ युद्धाची युद्धवार्तापत्रे डेलिग्राफिक पत्रात 'ए यंग ऑफिसर' या नावानं प्रसिद्ध होऊ लागली. आपण जे लिहितो, ते आकर्षक असून लोकांना ते वाचायला आवडतं याचा शोध याच वेळी विन्स्टनला लागला. लिखाणातून अर्थप्राप्तीही होते हे लक्षात आल्यावर विन्स्टनने लिखाणाचा धडाका लावला तो शेवटपर्यंत !

विल्सनच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळा रंग चढला तो त्याच्या राजकारणातल्या सहभागामुळे. बोअरयुद्ध संपल्यानंतर पंतप्रधान लॉर्ड सॅलिसबरी यांनी निवडणुका घोषित केल्या. विल्सन यांना हुजूर पक्षाचं तिकिट मिळालं आणि चर्चिल पार्लमेंटचे सन्मान्य सभासद झाले. पार्लमेंटच्या सभासदांच्या डोळ्यांत भरण्यासाठी विन्स्टननी त्यांचं स्वत:च लोकप्रिय तंत्र वापरलं—आपल्या पक्षाच्या एखाद्या मंत्र्याचं समर्थन न करता येणाऱ्या वृत्तीचं समर्थन करायचं किंवा स्वपक्षीयांवरच जोराचा हल्ला चढवायचा. अखंड पन्नास वर्षं, पार्लमेंटचे सन्मान्य सभासद असेपर्यंत विन्स्टन यांनी हे तंत्र कायम ठेवलं आणि ते वादग्रस्त तरीही लोकप्रिय राजकारणी ठरले.

### जाणकार 'युद्धखोर !'

विन्स्टन चर्चिलच्या थरारक आयुष्याचे कानिटकरांनी पहिल्या महायुद्धापर्यंत आणि दुसरे महायुद्ध आणि त्यानंतर असे दोन खंडात योग्य विभाजन केले आहे. विन्स्टन यांना तरुण वयापासूनच युद्धाचं जबरदस्त आकर्षण होतं; पण युद्धाचं आकर्षण ही त्यांची विकृती नव्हती. कानिटकर म्हणतात, 'विध्वंसक, मानवी जीवनातील अध:पतन स्पष्ट करणारे आणि मरण स्वस्त करणारे युद्ध वा महायुद्ध, हे विसाव्या शतकातील सर्वांत निर्णायक साधन आहे ही गोष्ट विन्स्टन यांनी हेरली होती.' कानिटकरांच्या या निष्कर्षाला चरित्रात जबरदस्त आधार आहे. ३ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीला अधिकृत युद्ध जाहीर केल्याचा निर्वाणीचा खलिता धाडण्यात आला. तेव्हा युद्धाचा पूर्ण अनुभव असलेले, युद्धाची भयानकता आणि बलस्थाने ओळखणारे, युद्धनियोजन करू शकणारे, पार्लमेंटमधले विन्स्टन हे एकमेव सभासद होते. दुसरं महायुद्ध जाहीर झाल्यावर First Lord of the Admirality हे नाविकदलाचे खाते अपरिहार्यपणे त्यांच्याकडे गेले. इथे चरित्राचा दुसरा खंड सुरू होतो.

'विन्स्टननी नाविकदलाच्या बाबतीत

गंभीरपणे युद्धप्रयत्नांची पराकाष्ठा आरंभली, तरी सर्व मंत्रिमंडळावर प्रभाव पडावा असे त्यांचे स्थान ना मंत्रिमंडळात होते ना सभागृहात होते' अशा स्वरूपाचा निष्कर्ष दुसऱ्या खंडाच्या सुरुवातीला (पृष्ठ २८०) आढळतो. विन्स्टन याची जनमानसात त्या वेळी कोणती प्रतिमा होती? विचाराने प्रतिगामी, साम्राज्यवादी आणि सोयीप्रमाणे पक्ष सोडून जाणारा बेभरवशाचा पक्षसदस्य येवढी अपकीर्ती त्यांच्या गाठीला होती. टोरी पक्षावर वेळीअवेळी टीका करण्यामुळे तो पक्ष त्यांना शत्रू समजत होता, तर सार्वत्रिक संपाच्या वेळी संप मोडून काढण्याकरता जे उपाय विन्स्टन यानी योजले त्याबद्दल पक्षाने त्यांना कधीही क्षमा केली नाही. तरीही हिटलरचा आक्रमणाचा जोर वाढल्यावर चेंबरलेन यांच्या हिटलर–अनुनयाला सतत विरोध करणारा आणि युद्धाच्या भयानकतेचं सतत भान ठेवून शस्त्रास्त्रेसज्जतेच्या तयारीला लागा म्हणून सांगणाऱ्या विन्स्टन यानाच इंग्लिश जनतेनं एकमुखानं 'युद्धनेता' म्हणून स्वीकारलं. विन्स्टन यांना पंतप्रधानपद मिळालं तेही पूर्ण प्रतिकूल परिस्थितीत. भोवती फक्त अंधारच दिसत असताना आणि युद्धकाळात पंतप्रधानपदाची जोखीम कोणाला नको होती म्हणून! नाझी आक्रमणाचा जोर वाढत होता. हिटलर एकामागोमाग एक देश घशात घालत होता. पराभव समोर दिसत असताना विन्स्टन यानी फक्त आपल्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर इंग्लिश जनतेचा युद्धनिर्धार जागवला, सतत वाढवला. पूर्ण प्रतिकूल परिस्थितीत विन्स्टन यानी आपल्या अमोघ वक्तृत्वानं इंग्लिश जनतेला प्राणपणानं झुजवलं. हिटलरच्या आव्हानाला प्रतिआव्हान दिलं विन्स्टन यांनी युद्धनेतृत्व केलं ते शब्दांच्या बेभरवशी माध्यमातून. ब्रेव्हर्ली निकोल्स विन्स्टनबद्दल म्हणतात, 'He harnessed English language.' चर्चिल नसते तर दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास आणि नंतरचा भविष्य काळ बदललाच असता. कानिटकर म्हणतात त्याप्रमाणे विन्स्टन 'दुसऱ्या महायुद्धाचे महान शिल्पकार' होते. दुसऱ्या महायुद्धाच्या विजयाचं श्रेय जितकं रशिया, अमेरिकेला आणि इंग्लिश जनतेला आहे तितकंच ते विन्स्टन यांच्याकडे जातं हे कोणीही नाकबूल करणार नाही.

विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञानाच्या बांधिलकीच्या अभावामुळं चर्चिल इतिहासात एक वादग्रस्त, तरीही लोकप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून ख्यातनाम झाले. विन्स्टन याना जेवढे हितचिंतक होते त्याहीपेक्षा कित्येक पटीनी जास्त हितशत्रू होते. चरित्र वाचून संपल्यावर वाटतं की, येवढ्या परस्परविरोधी वातावरणातदेखील विन्स्टन रुजले कसे? हेन्री फेअरली यानी 'दि मेल'मध्ये त्यांचं राजकीय मोठेपण सांगताना लिहिलं आहे.

'Perhaps the greatest thing was that the power he had did not Corrupt him.' अमर्याद सत्तेमुळं अमर्याद भ्रष्ट होण्याचे मोह जागोजागी विखुरलेले असताना विन्स्टनचं हे नैतिक पावित्र्य त्याना सर्वसामान्यांच्या हृदयापर्यंत नेतं. पार्लमेंट सभागृह हे त्यांचं एकमेव श्रद्धास्थाव होतं.

या द्विखंडात्मक चरित्रात फक्त विन्स्टन यांचं 'समग्र राजकीय जीवन' नाही हेच या चरित्राचं महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे एखाद्या लोकप्रिय, चतुरस्र व्यक्तिमत्त्वाचं चरित्रात्मक चित्रण करताना लेखकाच्या मनावर येणारं दडपण आपण त्या व्यक्तीला पूर्ण न्याय देऊ शकू की नाही याबद्दलची अस्वस्थता आणि चरित्र 'समग्र' व्हावं म्हणून मिळतील ते प्रसंग घुसडण्याची घिसाडघाई, चरित्रविषय झालेल्या व्यक्तीबद्दल चुकीचे पूर्वग्रह असल्यामुळं एकांगी चित्रणाची भीती यासारखे दोष या ग्रंथात जाणवत नाहीत. कानिटकरानी प्रयत्नपूर्वक एक 'analytical' दृष्टिकोन सतत कायम ठेवला आहे. विन्स्टन यांची साम्राज्यवादी भूमिका, भारताला स्वातंत्र्य देण्याबाबतची कमालीची विरोधी भूमिका, राजकीय तत्त्वज्ञानाचा अभाव आणि एखादी गोष्ट एकदा पटली की, अविचारीपणे त्याचा पाठपुरावा करण्याची त्याची पद्धत, या विन्स्टन यांच्या स्वभावदोषांची देखील कानिटकरानी चिकित्सा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. ही चिकित्सा कोणाला पटेल अगर न पटेल; पण ती एक चांगलीच चर्चा आहे हे निर्विवाद चर्चिलच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कानिटकरांनी काढलेले निष्कर्ष नाकारावासे वाटतील असेही प्रसंग लेखकाने मोकळेपणे दिले आहेत. उदा. गांधीच्या असहकाराबद्दलची त्यांची मते. कानिटकरांच्या लिखाणाचं एक वैशिष्ट्य या पुस्तकात सतत जाणवतं, ते म्हणजे कोणताही विचार वाचकावर न लादण्याची संयमी हातोटी.

### सुखद सहवास

पुस्तकाच्या समारोपात 'या लेखनामागची प्रेरणा कोणती असेल? हा वाचकाच्या मनातला प्रश्न ओळखून कानिटकरांनी लिहिलं आहे. १९७७ मधली आणीबाणी आणि स्वातंत्र्याची आणि लोकशाहीची झालेली घुसमट आणि सोविएत पुस्तक प्रदर्शनात 'प्रोग्रेस पब्लिशर्स मॉस्को'नं प्रकाशित केलेलं विन्स्टन चर्चिलचं एकांगी चरित्र! कानिटकर म्हणाले, 'नाझी' लिहित असतानाच चर्चिलचं अनेकांगांनी दर्शन झालं. लोकशाही आणि व्यक्तिस्वातंत्र्याला dignity मिळवून देणारा एक बहुढंगी नेता म्हणून चर्चिल माझ्या मनात होताच.'

'विन्स्टन चर्चिल' वाचून संपल्यावर मनात रहातो तो चर्चिल एक सुसंस्कृत, बहुश्रुत लेखक, एक कुटुंबवत्सल सच्छील कुटुंबप्रमुख! म्हणूनच त्यानी काय केलं नाही? शिपाईगिरी केली, तडाखेबंद युद्धवार्तापत्रे लिहिली, अफाट वाचन केले, झंझावाती वेगाने ग्रंथ लिहिले, उत्तमोत्तम चित्रे काढली, घराच्या भिंती स्वतः बांधण्याचा खटाटोप केला, उत्तम मद्य आणि चिरूट याच्यावर त्यानं त्याच्या बायकोइतकंच प्रेम केलं आणि ९० वर्षे आरोग्यसपन्न, निष्कपट, यथार्थ जीवन जगून इतिहास मागे ठेवला! कानिटकरांचा हा ग्रंथ कुठेही कंटाळवाणा होत नाही याचं श्रेय जितकं कानिटकराच्या प्रसन्न, ओघवत्या तरीही आकर्षक शैलीला आहे, त्याहीपेक्षा अधिक चर्चिल यांच्या नाट्यपूर्ण, बहुढंगी विसंगत व्यक्तिमत्त्वाला आहे हे ते स्वतः मान्य करतील. चर्चिलच्या निळ्या मिस्किल डोळ्यांत एक उनाड, वात्रट मूल होतं. लेडी अॅस्टर आणि विन्स्टन याचा खटका तर प्रसिद्धच आहे.

विन्स्टनवर रागावलेल्या अॅस्टरबाई म्हणतात, "मि. चर्चिल, तुम्ही दारू प्यायल्यासारखे बोलता आहात." यावर चर्चिल यानी उत्तर दिलं, 'बाईसाहेब, मी ठीक होईन, पण तुम्ही तर कुरूप आहात,' तसंच एका तरुण चित्रकारानं विन्स्टनचं एक पोर्ट्रेट त्याना भेट दिलं तेव्हा चर्चिल म्हणाले, "मॉडर्न आर्टचा हा उत्तम नमुना आहे." हे नव्वद वर्षांचं खोडकर मूल ब्रिटिश मंडळींच्या प्रेमाचा, आदराचा विषय होतं. चर्चिलची ओळख कानिटकरानी इतक्या ललितरम्य पद्धतीनं करून दिली आहे की, 'त्याच्या नेमक्या कोणत्या गुणांवर प्रेम करावं? हा त्यांना पडलेला प्रश्न आपल्यालाही गोंधळून टाकतो.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धकालीन राजकीय, सामाजिक, प्रादेशिक ताण–तणावाची विस्तृत चर्चा या ग्रंथात आहे. या चर्चेमध्ये लेखकानं या ग्रंथलिखाणासाठी केलेले परिश्रम आणि त्याचं जागृत, संयत मन पानापानावर दिसून येतं. संपूर्ण चरित्रात कुठेही अकारण हळवेपणा किंवा भाबडेपणा नाही.

पुस्तकाच्या शेवटी कानिटकर म्हणतात, 'पुस्तक लिहून सपले आणि विन्स्टन यांचा सुखद सहवास संपला!'

पुस्तक वाचून सपल्यावर विन्स्टन यांचा हा 'सुखद सहवास' म्हणूनच संग्रही असावा असं मनापासून वाटतं.

—मेधा देशपांडे

विन्स्टन चर्चिल
ले. वि ग. कानिटकर
प्र. अनिरुद्ध साहित्य, पुणे
पृष्ठे : ४५७, मूल्य : ९६ रु.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

# युरी गिलरला जमालगोटा मिळतो त्याची गोष्ट....

युरि गिलरने जगभर नुसती ध-धमाल उडवून दिली. केडगावचे महापुरुष आणि श्रीसत्यसाईबाबा यांना फुटकळ प्रमाणात जमलेला धंदा त्याने घाऊक प्रमाणावर अगदी यशस्वीरीतीने केला. याला मुळी नुसते पाहताच भल्याभल्या शास्त्रज्ञांची बोबडी वळली. मी मी म्हणवणाऱ्या विचारवंतांनी याला चक्क दंडवत घातले. बुद्धिवादी म्हणावणाऱ्या साप्ताहिकांनी आपले कान धरून उठाबशा काढत त्याच्यावर चक्क विशेषांक काढले. त्याचा धंदा भलताच तेजीत आला.

कोठेही जा, पळसाला पाने शेवटी तीनच असतात. घरोघरी मातीच्याच चुली असतात. जगभरची माणसे कातडीचा रंग बदलला तरी शेवटी एकाच मातीची बनलेली असतात. ' दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये ' हे सूत्र पक्के माहीत असलेले काही बेरके लोक जगात कोठेही, केव्हाही जाम हलचल मचवू शकतात काही जण उपजत बुद्धिमान असतात. काहींची स्मरणशक्ती तीक्ष्ण असते. काहीजण आपल्याच तंद्रीत मग्न असलेले कवी म्हणून जन्माला येतात. पण हे लोक काही औरच असतात. हे लोक सरळ महापुरुष म्हणूनच जन्माला येतात. आपल्या भारताचे राहू द्या, सत्यसाईबाबांचे जादूचे प्रयोग वा हटयोगी रावांचे पाण्यावरून चालणे येथे तसे नेहेमीच चालू असते, पण जगभर कोठेही जा. बुद्धिवादी म्हणवणाऱ्या माणसाला युरी गिलर म्हटल की बोलायची सोय उरली नाही. विज्ञानाचे सारे नियम खुंटीला टांगून हा माणूस हिंडत होता. विज्ञानाचे जुने नियम मोडीत काढणे पण तसे वाईट नाही. प्रत्येक नवा शास्त्रज्ञ मुळी थोड्याफार प्रमाणात हेच करत असतो; पण शास्त्रज्ञ हे शास्त्रीय पद्धतीने करतो. आपण हे का व कसे करतो आहोत हे आपणास तपासावयास सांगतो; पण युरि गिलर मात्र न्युटनपासून आइनस्टाइनपर्यंतच्या साऱ्या शास्त्रज्ञांना आणि त्यांच्या नियमांना कनवटीला बांधून शीळ घालत मजेत हिंडत होता.



युरी गिलर
२३ नोव्हेंबर ७३ हा त्याच्या आयुष्यात सोन्याचा दिवस ठरला.

## सोन्याचा दिवस

युरी गिलर इस्रायलमध्ये जन्मला. लहानपणापासूनच त्याच्या अंगात असलेल्या विलक्षण शक्तीची भोवतालच्या लोकांना प्रचीती येऊ लागली. त्याने शिक्षण वगैरे फारसे घेतले नाही पण हिब्रू भाषेवर आणि त्या भाषेतील काही प्राचीन अनाकलनीय मंत्रांच्यावर त्याने प्रभुत्व मिळवले. किंबहुना हे ज्ञान पण तो जन्मण्यापूर्वीच बरोबर घेऊन आला. पण त्याच्या आयुष्यातील-खरे बोलायचे तर ब्रिटनमधील अनेक लोकांच्या आयुष्यातील सोन्याचा दिवस शुक्रवार तारीख २३ नोव्हेंबर १९७३ ला उगवला. ब्रिटनच्या दूरदर्शनवरचा डिंबलीबायचा गप्पाटप्पा हा कार्यक्रम (Dimbleby Talk in Programme) फार लोकप्रिय होता. त्या कार्यक्रमात त्या वेळी युरि गिलरला बोलावले होते. दूरदर्शनाच्या सभागृहात खास आमंत्रित लोक होते. डिंबलीबाय आपल्याबरोबर अनेक गोष्टी घेऊन आला होता. सभागृहात आमंत्रित केलेल्या लोकांनी पण आपल्याजवळच्या वस्तू दिल्या. त्यात काटे-चमचे होते, फाउंटनपेन्स होती. बंद पडलेली आणि चालू असलेली घड्याळे होती. समोरच्या ढिगातील एक चमचा डिंबलबायने आपल्या हातात पकडला. युरी गिलरने त्या चमच्याला टिचक्या मारल्या आणि काही सेकंदात तो चमचा मोडून पडला. त्यानंतर प्रयोगाचा उत्तरार्ध सुरू झाला. डिंबल-बायने हातात धरलेल्या चमच्याकडे युरी गिलरने काही मिनिटे एकाग्र नजरेने पाहिले आणि तो चमचा उसाचे कांडके तुटावे तसा मोडून पडला. त्यानंतर सभागृहातील एका लहान मुलाने काढलेले चित्र फक्त दूर अंतराळात नजर रोखून आणि काही मंत्र पुटपुटत त्याने हुबेहुब काढून दाखवले.


त्यानंतर युरीने शेवटचा प्रयोग केला. बंद पडलेली घड्याळे त्याने आपली नजर रोखून सुरू केली आणि दूरदर्शनाच्या सभागृहातील सुरू असलेले घड्याळ आपल्या नजरेचा हुकुम सोडून त्याने बंद पाडले. कार्यक्रम सपला त्या वेळी सारे सभागृह अवाक झाले होते. काहीजणांच्या मते तर साऱ्या सभागृहातच काही अद्भुत लहरी भरून राहिल्या होत्या. लोक बंद पडलेली घड्याळे आणि मोडलेले चमचे पहावयास धावले तुमच्या माझ्यासारख्या सभागृहातील काही लोकांनी हे साधे जादूचे प्रयोग आहेत असे म्हणावयासही कमी केले नाही; पण बहुतेक सर्व सभागृह युरी गिलरला अवलिया समजून त्याच्या पायाला हात लावावयास पुढे गेले होते. त्यानंतर काही क्षणातच आणखी एक लोकविलक्षण गोष्ट घडली. युरि गिलरला मामुली मदारी म्हणणाऱ्यांची भलतीच पंचाईत झाली. दूरदर्शन-केंद्रावर लागोपाठ टेलिफोन्स येऊ लागले. साऱ्या ग्रेट ब्रिटनमध्ये धमाल उडाली होती. कार्यक्रम पाहणाऱ्या अनेकांच्या घरातील बंद पडलेली घड्याळे युरी गिलरच्या नजरेने सुरू झाली होती युरि गिलर चमचा मोडत असताना छोटा भूकंप व्हावा तसे काहींच्या घरातील सामान घडवंचीवरून खाली पडले होते. युरीच्या नुसत्या नजरेने दूरदर्शन पाहणाऱ्या अनेकांना हरवलेले मानसिक समाधान परत मिळाले होते. दूरदर्शनवरील दूरध्वनीची घंटा दिवसभर खण-खणतच राहिली. कोणाला काही, कोणाला काही, काही तरी सांगा-बयाचे होते. त्यानंतर दूरदर्शनवर जवळजवळ एक आठवडाभर पत्रांचा अक्षरशः पाऊस पडला. हजारो पत्रे आली. प्रत्येक पत्र युरी-गिलरचे मुक्त कंठाने प्रशंसा करणारे होते.

## युरीची देणगी

ज्ञात-अज्ञाताच्या सीमारेषेवर आपणा सर्वांची मने नेहेमीच घोटाळत असतात. मानवी बुद्धीला न समजलेले तसे काही अनुभव असतात. पाश्चात्य जगाला त्या वेळेपर्यंत अशा दोन गोष्टी माहीत होत्या. दूर अंतरावरच्या आपल्या जिवलग माणसाच्या मनातील विचार आपणाला त्याच क्षणी अचूक समजणे (Telepathy) याचा तेथील लोकांना परिचय होता. त्यावर संशोधन सुरू होते. आजही आहे. काहीजणांनी न पाहिलेल्या गोष्टीचे अचूक वर्णन करणे वा त्याचे चित्र काढणे पण अपरिचित नव्हते. काही माणसांना अन्तरज्ञान (Clairvoyance) असते हे अनुभवास आले होते. त्यावर पण संशोधन सुरू होते; पण माणसाचे मन हे जड वस्तूंवर प्रभाव पाडू शकते हे युरीने दाखवले या मनाच्या अद्भुत शक्तीचा (Psychokinesis) पाश्चात्य जगाला प्रथमच परिचय झाला. माणसाचे मन हे सुप्त शक्तींचा एक खजिना आहे हे मानस-शास्त्राला माहीत होतेच; पण हे मन योग्य प्रकारे एकाग्र केले तर या यौगिक सामर्थ्याने जड वस्तू हलवता वा वाकवता येतात, यावर भरपूर चर्चा झाली. जणू एक वादळ झाले. युरी गिलरबरोबर त्या दिव्य क्षणी उपस्थित असलेल्या प्रत्येकाने आपले अनुभव प्रसिद्ध केले. डिबलीबायच्या तर एकापाठोपाठ एक अशा चार मुलाखती चार दर्जेदार दैनिकात प्रसिद्ध झाल्या. गिलरने मारलेल्या टिचक्यात काही शारीरिक शक्ती नव्हती; पण काही वेळा आपल्या शरीरातून काही अनोख्या लहरी सरळत आहेत असा आपणाला भास झाला. म्हणून त्याने सांगितले. मोडून पडण्याच्या काही काळ आधी हळूहळू चमचा रबराचा झाला आहे असे वाटले आणि शेवटच्या क्षणी तर मोडून पडणारा भाग वितळलेल्या प्लॅस्टिकसारखा भासला म्हणून त्याने नमूद केले. समोर ठेवलेल्या असंख्य चमच्यामधून हे चमचे डिबली-बायने स्वत: निवडले होते. युरीची खरी प्रसिद्धी झाली ती पोलाद वाकवणाऱ्या मनाचा माणूस म्हणून कोणत्याही धातूने बनलेली कोण-तीही गोष्ट त्याने कोठेही आणि कोणाही समोर वाकवून दाखवली आणि त्यात फक्त चमचेच नव्हते, चाकू आणि कात्र्याही होत्या. मोठ-मोठ्या लोकांच्या खिशातील चाव्या होत्या. लोकांच्या खिशातील किल्ली मोडून दाखवल्यामुळे युरी शेवटच्या क्षणी मूळ वस्तू बदलून नवी वस्तू तेथे ठेवून दाखवतो असे म्हणणे शक्य नव्हते किल्लीवर स्वत:चे क्रमांक असतात, काही खुणा असतात आणि त्या शेकडो लोकांच्यासमोर कोलमडून मोडत होत्या. दूरदर्शनच्या कार्यक्रमाचा आणखी एक फायदा असतो धिम्या गतीने वा स्थिर चित्रात संपूर्ण कार्यक्रम दाखवता येतो. तो कार्यक्रम तसा दाखवला गेला. कोठेही काहीही हातचलाखी नव्हती. झाले येवढेच की, युरीचा एकाग्र चेहरा अनेक भाविकांना अनेक वेळा मुक्तपणे पहावयास मिळाला. या प्रत्येक वेळी त्याचा चेहरा पाहून आपली अर्धशिशी बरी झाली म्हणून सांग-णारे लोक निघाले !

## गुरु आणि चेला

युरिचा चेहरा पाहून भाविकांची डोकेदुखी थांबली, शास्त्रज्ञांची सुरू झाली. युरी जे करतो ते प्रयोगशाळेत तपासून त्यावर काही भाष्य करणे आवश्यक होते. 'स्टॅंडफोर्ड रिसर्च इन्स्टिटयूट' मधील काही प्रयोगवीरांनी हे काम अंगावर घेतले. गिलर जे करतो ते सध्याच्या शास्त्रीय ज्ञानाच्या आवाक्याबाहेरचे असले तर गिलर परि-णाम (the Giller effect) म्हणून त्याची नोंद करून, त्यावर अधिक अभ्यास करण्याचे त्यांनी ठरवले. कोणताही पूर्वग्रह न बाळ-गता. कोणताही जातिवंत शास्त्रज्ञ कोणत्याही नव्या प्रयोगांना, अनु-मानांना वा विचारांना नेहमीच बालसुलभ कुतूहलाने पुढे जातो. गिलरच्या प्रयोगात शास्त्रीय पद्धतीने दोन गोष्टींचा अभ्यास करणे जरुरीचे होते. गिलरचे मन वा मेंदू; जेथून काही लहरी बाहेर पड-तात तो काम करताना तपासावयास हवा होता. ज्या जडवस्तूवर या लहरींचा परिणाम होतो ती जडवस्तू असा परिणाम घडताना शास्त्रीय पद्धतीने अभ्यासावयास हवी होती. यातील पहिली गोष्ट फार कठिण होती. मानवी मेंदूबद्दल माणसाला आजही फार–थोडे माहीत आहे मानवी मेंदूवर काम करणाऱ्या एका फार मोठ्या शास्त्रज्ञाने म्हटलंय की, 'ज्या मेंदूने शेवटी आपण विचार करतो तोच वापरून मेंदू समजावून घेणे हो खरे पाहता विचित्र गोष्ट आहे.' त्यातून प्रयोग करताना युरीच्या डोक्यावर आणि कपाळावर विद्युतपट्टया (electrodes) बसविणे जरुरीचे होते. युरी या साऱ्या प्रकाराला नाखूष होता. त्यामुळे गिलर ज्या वस्तूवर आघात करतो त्याचा त्या वेळी अभ्यास करणे येवढेच शक्य होते. एखाद्या वस्तूवर गिलर टिचकी मारत असताना त्या टिचकीतून खरा किती जोर त्या वस्तू-वर पडला व ती वस्तू वाकवण्यासाठी खरा किती जोर लागतो हे नोंदवण्यात आले; पण या प्रयोगातही एक गल्लत झाली. टिचकीतून पडणारा जोर हा वस्तू वाकवावयास जेवढा जोर लागतो तेवढाच



**जॉन टेलर :**
**युरीच्या भगतगणात सामील झालेला एक शास्त्रज्ञ.**
**याचे सुपरमाइंडस् ( Super Minds )**
**हे पुस्तक बरेच गाजले.**

होता. मात्र टिचकीतून मिळणारा जोर हा फक्त त्या आघातातूनच निर्माण झाला आहे की, युरीच्या नजरेने त्या जोरात भर पडली आहे हे नक्की ठरवता आले नाही. युरीने नुसत्या नजरेने वस्तू वाकवली असती, तर ही कुस्ती युरीच्या बाजूने निकालात निघाली असती. ज्ञात ज्ञानाला ते आव्हान ठरले असते; पण काही अध्यात्मिक कारणासाठी स्टँडफोर्ड इन्स्टिटयूटच्या प्रयोगशाळेत युरीने हे करावयाचे नाकारले.

याच वेळी लंडनच्या 'किंग्ज कॉलेज' मधील जॉन टेलर हा गणिताचा एक ख्यातनाम प्रोफेसर पुढे आला. त्याने किंग्ज कॉलेजच्या प्रयोगशाळेत आपल्या सहकाऱ्यांच्या समोर युरीला दूरदर्शनवर केलेले सारे प्रयोग करावयास सांगितले. गिलरला मोडावयास दिलेले धातूचे तुकडे त्यांनी कॉलेजातील धातुशास्त्र (metallurgical) विभागातील प्राध्यापकांकडून घेतले. युरी काही हातचलाखी करत नाही हे पहावयास त्याने ते तुकडे प्लॅस्टिकच्या एका बंद नळीत ठेवले, सर्वांनी युरिच्या नजरेनी हे तुकडे वाकताना पाहिले त्यानंतर कॉलेजच्या प्राचार्यांनी स्वतःच्या खोलीत बसून काढलेले चित्र युरीने सर्वांसमोर काढून दाखवले: युरीच्या मेंदूतील किरणोत्सर्ग (Radioactivity) तपासण्यासाठी भौतिक शास्त्र विभागातील गिलरचे उपकरण (Geiler Counter) वापरण्यात आले. हे उपकरण जेव्हा गिलरच्या समोर ठेवले त्या वेळी उपकरणातील काटा तबकडीतील शून्यावर होता. अंतराळातून येणाऱ्या किरणोत्सर्गामुळे (Cosmic rays) तो काटा जास्तीत जास्त दोनपर्यंत जाऊ शकला असता. त्यानंतर ते उपकरण युरीने आपल्या हातात धरले. काटा अजूनही शून्यावरच होता. त्यानंतर युरीने आपली नजर त्या काटयावर रोखली. काही क्षण असेच गेले. साऱ्या प्रयोगशाळेत एक सन्नाटा पसरला होता. प्रत्येकजण नजर रोखून बघत होता. गिलरचे डोळे आग ओकत त्या काटयाकडे बघताहेत असे अनेकांना वाटले. त्या यंत्रावरची गिलरची पकड घट्ट झाली आहे हे त्याच्या ताणलेल्या स्नायूंवरून आणि नाडीच्या ठोक्यांवरून समजत होते. त्यानंतर काटा झपाटयाने पुढे जात पन्नास या आकडयावर गेला. प्रतिसेकंदाला पन्नास या आकडयावर जवळजवळ दोन सेकंद काटा थांबला. या प्रयोगाला परिणामकता यावी म्हणून उपकरणाला एक ध्वनिप्रक्षेपक (loud speaker) लावलेला होता. प्रत्येक आकडयाला एक छोटी शिटी वाजत होती. आवाजाची तीव्रता अचानक वाढली. विव्हळणे किंवा किंकाळणे ऐकत आहोत असे अनेकांना वाटले. काटा प्रतिसेकंदाला शंभर या आकडयावर पोचला. होणारा आवाज आणि हलणारा काटा, तुमच्याजवळ ज्यापासून धोका आहे असा किरणोत्सर्ग होतो आहे हे सांगत होते. काही मिनिटे विश्रांती घेत, डोळे मिटून घेऊन हा प्रयोग ताजातवाना होऊन युरीने दोन–तीन वेळा केला. शेवटी तर प्रतिसेकंदाला एक हजार या आकडयावर तो संपूर्ण दोन सेकंद

---

## सत्याच्या शोधात शास्त्रज्ञ . . .

शास्त्रज्ञ हा नेहमीच सत्याच्या शोधात नम्रपणे वाटचाल करीत असतो. या वाटचालीत आपले प्रयोग आणि आपल्या उपजत प्रेरणा त्याच्याबरोबर असतात. दुसऱ्या शास्त्रज्ञांचे प्रयोग आणि उपजत प्रेरणा यांचा आदर करावा हे त्याला माहीत असते. आइनस्टाइन आणि बोहर यांच्यात झालेल्या 'शिखरपरिषदेत' वादविवादाच्या अनेक फेरी झडल्या. आइनस्टाइन तर्कशास्त्रदृष्टया बोहरशी सहमत होता; पण त्याला बोहरचा दृष्टिकोन समजू शकला नाही आणि तो या अडचणीतून बाहेर पडण्यास नवेनवे मार्ग शोधत राहिला. दोघांनाही बौद्धिक खाद्य पुरवील, असा एखादा तर्कसंगत मुद्दा आइनस्टाइन पुढे मांडत असे. तो प्रश्न अर्थातच बोहरच्या सिद्धांतातील कमकुवतपणा दाखवून देई. बोहर थोडासा भांबावून जाई; पण दुसऱ्याच दिवशी त्या प्रश्नाचे त्याचे उत्तर तयार असे. आइनस्टाइनचे शंकानिवारण झाले तरी तो असमाधानी राही. तो पुन्हा एखादा प्रश्न पुढे मांडे. बोहर लवकरच त्या प्रश्नाचा पण फडशा पाडत असे. तर्कशास्त्रीय विश्लेषणावर दोघेही नेहेमीच सहमत होत; पण आइनस्टाइनचे समाधान मात्र कधीच झाले नाही. अनेक वेळा वादविवाद केल्यावर बोहरच्या भूमिकेबाबत आइनस्टाइन म्हणतो, 'तर्कदृष्टया विचार केला तर त्याचे म्हणणे निःसंशय बरोबर आहे; पण असे असूनही माझ्या उपजत प्रेरणांच्या ते इतके विरुद्ध आहे की, पूर्णत्वासाठी चाललेली माझी धडपड मी थांबवू शकत नाही.'

**('लावण्यक्षितिजे' मधून)**

थांबला. त्यानंतर मात्र युरी खरेच दमला होता. जवळजवळ अर्धा तास त्याने विश्रांती घेतली. त्यानंतर काटा मात्र प्रतिसेकंदाला दोनशे या आकड्यापर्यंतच चढू शकला. मात्र या वेळी तब्बल पाच सेकंद काटा त्या आकड्यावर स्थिर राहिला.

युरी हातातून उपकरणावर जोर देऊन काटा हलवतो का हे पहावयास उपकरण हातात घेऊन अनेकांनी त्यावर अनेक प्रकारे जोर दिला; पण काटा अजिबात हलला नाही.

या प्रयोगानंतर जॉन टेलर युरीच्या भगतगणातच सामील झाला. आपल्या प्रयोगावर त्याने सुपर माइंड्स (superminds) हे पुस्तक प्रसिद्ध केले. व्हायकिंग प्रेसने प्रसिद्ध केलेले हे पुस्तक खूपच गाजले. टेलरने, अंतरज्ञानाने युरी वस्तू पाहू शकतो, बंद नळीतील वस्तू सर्वांसमोर वाकवू शकतो व धोकादायक किरणोत्सर्ग करू शकतो हे शास्त्रीय प्रयोगांनी सिद्ध करून दाखवले होते !


'स्टँडफोर्ड इन्स्टिटयूट'मधल्या चुकलेल्या शास्त्रज्ञांना वठणीवर आणावयास या पुस्तकाचा खूप उपयोग झाला. स्टँडफोर्ड येथील प्रयोगांचे आयोजन करण्यात अंतराळवीर एड मिचल(Ed Mitchell) पण सामील झालेला होता. त्याने सांगितले, 'अगदी अंतराळात असतानाही त्याने बरोबर ठेवलेला छोटा संगणक (Pocket Computer) स्टँडफोर्ड येथे युरि प्रयोग करत असताना काही काम देऊ शकला नव्हता. हा संगणक त्यापूर्वी वा त्यानंतरही असा कधीच वागला नव्हता. अगदी अंतराळातही त्याने छान सोबत दिली होती. कुणी सांगावे, या संगणकाला वठणीवर आणण्यास गुंतला असल्याने युरी स्टँडफोर्ड येथे नुसत्या नजरेने वस्तू वाकवू शकला नसेल !'

अणु-किरणोत्सर्गावर खूप काम केलेल्या डॉ. टेड बॉस्टिन (Ted Bastin) यांनी आणखी खळबळजनक बातमी दिली. अणु-किरणोत्सर्ग (Redioactive decay) मोजावयास स्मिथचे जनकयंत्र (Schmidt generator) वापरण्यात येतो. या जनकयंत्रात एका तबकडीवर वर्तुळाकार नऊ दिवे बसवलेले असतात. किरणोत्सर्ग कमी-जास्त होईल त्याप्रमाणे हे दिवे पुढे-मागे लागत वा बंद होत जातात. युरीच्या उपस्थितीत त्याच्या इच्छेप्रमाणे हे दिवे पाहिजे तसे पुढे-मागे होतात हे त्याच्या प्रयोगशाळेत त्याने पाहिले होते.

## ससा आणि कासव

युरी गिलरचा अश्वमेधयज्ञातील घोडा असा भरधाव सुटला होता. युरी आणि त्याचे चेले भलतेच खुशीत होते; पण हे लोक एक गोष्ट साफ विसरले होते. या जगात आणखी काही छोटी माणसे वावरत असतात. गंगाधर गाडगिळांच्या 'ससा आणि कासव' या गोष्टीतील कासवासारखी ! ही माणसे विकत घेता येत नाहीत. ही माणसे विकली जात नाहीत. स्वतःला पटलेल्या गोष्टींचा ही माणसे शेंडी तुटो वा पारंबी तुटो पाठपुरावा करत राहतात.


स्वतःची जिवंतपणे प्रेतयात्रा निघत असताना, जे इष्ट असेल तेच स्पष्टपणे सांगेन म्हणणारे कोणी आगरकर अवतरतात! नव्वद वर्षाचा कोणी म्हातारा कोव्हूर सत्यसाईबाबांच्या गुहेत जाऊन त्यांना आव्हान देतो. त्याच कुळात जन्मलेला कोणी एक जादुगार रँडो, त्याने भर बाजारात युरी गिलर आणि प्रोफेसर टेलर यांच्या सरळ चड्डीला हात लावला. 'बच्चेलोक, एक बार जोर-जोरसे टाली बजाव, म्हणत स्वतःच्या डोक्यावरची टोपी हवेत उडवीत !'




जादुगार
जेम्स रँन्डी
याने युरीची
टोपी हवेत उडवली.

जादुगार रँडीचे म्हणणे अगदी साधे होते. आपल्या पोटापाण्याच्या धंद्यावर युरी आक्रमण करतो ही त्याची तक्रार होती. युरि करत असलेली प्रत्येक हातचलाखी आपण त्यापेक्षा अधिक चांगली करू म्हणून त्याने सांगितले. हे जादूचे प्रयोग तो कोणासमोरही करावयास तयार होता. डॉ. टेलर आणि त्याच्या साथीदारांच्याबद्दल तर त्याला दया वाटत होती. कारण शास्त्रज्ञ म्हणून हे लोक मोठे होते. मात्र जादूच्या प्रयोगातील त्यांना काही कळत नव्हते. त्यांनी या प्रयोगाच्या वेळी एखाद्या जादुगाराला उपस्थित ठेवावयास हवे होते असे त्याचे म्हणणे होते. हे काम तो विनामूल्य करावयास तयार होता. त्या वेळी ते सर्व प्रयोग स्वतः चांगल्या प्रकारे करून त्यामागची हातचलाखी सर्वांना समजावून द्यावयासही तो तयार होता; पण जादुगार रँडीला प्रतिसाद मिळाला नाही. अमेरिकेतील हा मामुली जादुगार गुरुमहाराजांना आपल्या बरोबरीचे मानतो ही कल्पनाच टेलर प्रभृतींना पटली नाही. प्रोफेसर टेलर आणि मंडळी ही एका बुवाबाजीला बळी पडली आहेत वा त्या बुवाबाजीचाच एक भाग बनली आहेत हे जादुगार रँडीला समजून आले. तो हट्टाला पेटला. त्याने आव्हान दिले, 'युरीने कोणतीही हातचलाखी माझ्यासमोर करून दाखवावी ती मी पुन्हा करून न दाखवल्यास मी माझ्याजवळ असलेले दहा हजार डॉलर्स त्याला देईन !' जादुगार रँडीच्या या आव्हानाला प्रतिसाद मिळाला नाही. त्याला उपेक्षेने मारण्याचे मंडळींनी ठरवले होते. स्वतःच्या खर्चाने तो लंडनला आला. प्रोफेसर टेलर यांना भेटण्याचा त्याने खूप प्रयत्न केला; पण दर वेळी नवी सबब पुढे करून त्याला भेट देण्यात आली नाही. एका मामुली जादुगाराला भेट देण्यासाठी टेलरसारख्या शास्त्रज्ञाजवळ वेळ नव्हता !

त्यानंतर मात्र जादुगार रँडो याने टेलरला फसविण्यासाठी आणखी एक धंद्याबाहेरची हातचलाखी केली. त्याने वार्ताहराचा मुखवटा चढवला. स्वतःचे नाव बदलले. अमेरिकेतील एका साप्ताहिकातून प्रोफेसर टेलर यांच्या प्रयोगाचे कौतुक करणारा एक लेख लिहिला. त्या लेखाचे कात्रण त्यांना पाठवले. त्यानंतर तो सरळ लंडनला आला. त्याने कपडे बदलले. ओळखपत्र बरोबर घेतले. एक चांगला टेपरेकॉर्डर आणि छोटा कॅमेरा बरोबर घेतला. विमानतळावर उतरल्यापासून त्याने प्रोफेसर टेलरच्या सेक्रेटरीला फोन करावयास सुरुवात केली. त्याला मुलाखत देण्यासाठी प्रोफेसर टेलर काम




Transprant plascic tubing = प्लॅस्टिकची पारदर्शक नळी
Sealing wax = मुद्रा उठवून बंद केलेले मेण
Rubber stopper = रबराचे बुच




प्लॅस्टिकच्या बंद नळीतील युरीने वाकवलेली अॅल्युमिनियमची पट्टी. त्यावर जादुगार रॅन्डीने हातचलाखीने कोरले–रॅन्डीने वाकवलेली= (Bent by Randi)

बाजूला सारून लवकर प्रयोगशाळेत आले. त्यांच्या सेक्रेटरीने विमानतळावरून त्याला प्रयोगशाळेत नेले. वार्ताहर बनलेला रँडी त्यांच्या प्रयोगांच्या शाश्वत मूल्यांचे कौतुक करत होता. प्रोफेसर टेलर त्याला विज्ञान न समजणारे काही अमेरिकन जादुगार आपला कसा वेळ घेतात हे तक्रारवजा आवाजात सांगत होते! आपल्या पुढील लेखात जादुगार रँडीचा खरपूस समाचार घेण्याचे आणि प्रोफेसर टेलर यांचे प्रयोग तपशीलवारपणे अमेरिकन वाचकांना समजावून देण्याचे या वार्ताहराने मान्य केले.

प्रोफेसर टेलर बरोबर जाळ्यात सापडले होते. बालसुलभ उत्साहाने ते आपले प्रयोग समजावून सांगू लागले. वार्ताहर प्रश्न विचारू लागला. ध्वनिमुद्रक या सर्वांची नोंद करू लागला. प्रोफेसर टेलर यांनी प्रयोग किती ढोबळपणे आणि गलथानपणे केले ते ध्वनिमुद्रक टिपून घेत होता. त्यानंतर एखाद्या लहान मुलाने आपण साठवलेला खजिना दाखवावा त्याप्रमाणे युरीच्या स्पर्शाने मोडलेल्या गोष्टी, त्याने काढलेली चित्रे प्रोफेसर त्याला दाखवू लागले. सारी तद्दन हातचलाखी होती.जादुगार रँडी म्हणतो,'सोळा वर्षांची एखादी तरुणी आपल्या मिस्किल नजरेने एखाद्या मध्यमवयीन माणसाला क्षणार्धात मामा बनवू शकते हे आपणा सर्वांना माहीत आहे; पण बनेल डोळ्यांच्या सोळा वर्षांच्या एका मुलाने हे सारे करावे हे आपल्याला कसेसेच वाटते!'

प्रोफेसर टेलरने एका प्लॅस्टिकच्या नळीत शास्त्रीय पद्धतीने बंद केलेला अॅल्युमिनियमचा तुकडा दाखवला. प्लॅस्टिकची नळी दोन्ही बाजूंना रबरी बूच लावून बंद केलेली होती. एक स्क्रू घालून रबरी बूच प्लॅस्टिकच्या नळीत घट्ट केले होते. त्यावर मेण लावले होते. मेणावर मुद्रा (seal) होती. जादुगार रँडीने त्याचा फोटो घेतला. अगदी साधी हातचलाखी होती. रबरी बूच पाहिजे तसे खालीवर होऊ शकले असते. टेलरचे लक्ष नाही असे पाहून त्याने आतला अॅल्युमिनियमचा तुकडा बदलला मुद्रा कायम ठेवून. त्या तुकड्यावर कोरलेले होते 'रँडीने मोडलेला (Bent by Randey) त्याचाही फोटो घेतला आणि नळी गुपचुप पुन्हा प्रोफेसर टेलर यांच्या वस्तुसंग्रहालयात ठेवली. त्यानंतर जाण्यापूर्वी खोलीतील घड्याळाखाली उभे राहून त्यांनी टेलरबरोबर आपला एक फोटो घेतला. आणखी

## जादुगार रॅन्डी, जादुगार रघुवीर आणि 'माणूस'...

युरी गिलरचे वादळ उठण्याच्या वा जादुगार रॅन्डीने त्यांना आव्हान देण्याच्या खूप आधीची गोष्ट. १९७० साली 'माणूस' साप्ताहिकाने 'ज्ञान–अज्ञानाच्या सीमारेषेवर' ही खास पुरवणी सादर केली होती. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सादर केलेल्या या पुरवणीत चमत्कारांच्या संदर्भात शास्त्रज्ञ, विचारवंत, जादुगार, बुवा आणि महाराज अशा सगळ्यांच्या मुलाखती होत्या. आपल्या मुलाखतीत जादुगार रघुवीरांनी म्हटले होते, 'भानामतीचे अनेक प्रयोग हे हातचलाखीचे प्रयोग आहेत हे मी सिद्ध केलंय. अनेक बुवा-महाराजांच्या हातचलाखींचे प्रकार मी उघडकीला आणलेत. कोठेही चमत्कार घडत असेल तर मी यावयास तयार आहे. त्या चमत्काराला शास्त्रीय अधिष्ठान असेल वा तो हातचलाखीचा प्रकार असेल हे आपण सिद्ध करून दाखवू.'

— त्यानंतर आता एक तप उलटले आहे. भारतात आणि महाराष्ट्रातही बुवाबाजी धुमधडाक्याने सुरू आहे. विज्ञानप्रेमी लोकांनी एकत्र येऊन सायन्स क्लब्स (विज्ञानसंस्थांची) स्थापना करेपर्यंत हे असेच चालू राहील.

पाच मिनिटांनी एक फोटो घेतला. दोन्ही फोटोंच्या प्रती जाण्यापूर्वी टेलर यांच्या हातात ठेवल्या. त्यावर प्रेमाने त्यांची स्वाक्षरी घेतली. एका फोटोत घड्याळात आठ वाजले होते. दुसऱ्या फोटोत घड्याळात चक्क बारा वाजले होते !–युरीच्या' सरदारजीला जादुगार रॅंडी याने दिलेली ही भेट होती ! ! आपल्या प्रयोगाचे पृथःकरण करणारे 'द मॅजिक ऑफ युरि गिलर (The majic of Uri Geller) हे जादुगार जेम्स रॅन्डीचे पुस्तक बॅलेन्टाइन बुक्सने प्रसिद्ध केले आणि ते खूप गाजले. पुस्तक प्रसिद्ध झाले आणि युरीच्या लोकप्रियतेचा पारा झपाट्याने खाली उतरला !

## सुरुवातीचे म्हणून........

युरी गिलरच्या रूपाने एक वादळ आले आणि गेले. त्या वादळातून बाकी उरली ती फक्त दोन उपयुक्त पुस्तके. एक जॉन टेलरचे 'सुपरमॅन' हे पुस्तक. शास्त्रज्ञ किती सहजपणे फसतो हे दाखवणारे. दुसरे जादुगार रॅन्डीचे. द्रौपदीचे सत्त्व बरोबर घेऊन वावरणाऱ्या एका साध्या प्रामाणिक माणसाचे; पण आपल्या दृष्टीने युरि गिलरची कहाणी येथे संपत नाही तर खऱ्या अर्थाने येथे सुरू होते. कारण युरी ही शेवटी एक व्यक्ती नसते तर एक तत्त्वज्ञान असते. सर्वसामान्य माणसाला बेवकूफ बनविणारे तत्त्वज्ञान. जी. ए. कुलकर्णी याच्या 'सेरिपी इस्कहार एली 'मध्ये एक छान वाक्य आहे, 'प्रत्येक धर्मावर अशी पाटीच लावलेली असते–आपले वृषण येथे फोडून घ्या. तुम्हाला शांती मिळेल !' युरी अशा प्रकारची शांती वाटत चालला होता. जीवनाच्या प्रत्येक वळणावर अनेक कारणांनी आपण जेव्हा मोडून पडतो तेव्हा हे लोक एकच प्यालामधील सुधाकरासारखे आपणाला मदत करावयास पुढे येतात. त्यांनी दिलेला आधार आपल्यामधील माणसाला अधिक अगतिक बनवितो !

–पण युरीने हा धाऊक धंदा यशस्वी प्रकारे का व कसा केला हा आपला सुरुवातीचा प्रश्न अजून बाकी उरतोच. युरीने विज्ञान आणि बुवाबाजी यांची एक झकास गल्लत करून दाखवली. सहसंवेदना (Telepathy), अंतरज्ञान (Clairvoyance) व मेंदूची शक्ती या विज्ञानाला माहीत असलेल्या तीन गोष्टींचा आधार घेत युरीने मनाच्या अद्भुत शक्तीचे (Psychokinesis) एक प्यादे पुढे सरकवले. लोक फसले. कारण सहसंवेदना, अंतरज्ञान आणि मेंदूची शक्ति या वैज्ञानिक गोष्टी आहेत हे लोकांना ऐकून माहीत होते. मात्र वैज्ञानिक दृष्टीने या गोष्टी नक्की काय आहेत हे अगदी पाश्चात्य देशातील लोकांनाही नीट समजावून दिलेले नव्हते. विज्ञान आपण समजावून घेतले नाही तर विज्ञान राक्षस बनून असेच आपणाला पिदवत राहणार आहे. विज्ञान समजावून घेणे हा त्यावर एक प्राथमिक उपाय आहे. विज्ञानेश्वरीतून यापुढे जमेल तसे सहसंवेदना, अंतरज्ञान, मेंदूची शक्ती या सर्वांवरील संशोधन आपण समजावून घेणार आहोत.


पण खरे पाहाता हा एक प्राथमिक उपाय आहे. सर्वसामान्य माणसाच्या मनात विज्ञान, वैज्ञानिक जीवननिष्ठा, वैज्ञानिक विचारपद्धती रुजविण्यासाठी आणि त्याच्या समोरचे छोटे-मोठे प्रश्न सोडवावयास त्याला मदत करण्यासाठी विज्ञानसंस्था ( science club )चे जाळे महाराष्ट्रभर उभे करणे जरुरीचे आहे. खरे पाहता, जादुगार रॅंडीने जे केले ते जादुगार रघुवीरांनी एक तपापूर्वी 'माणूस' मधून सांगितले होते; पण आपण त्याचा पाठपुरावा करू शकलो नाही. कारण आपणाकडे असा पाठपुरावा करणारे तरुणांचे गट नाहीत. माओच्या चीनने हे फार यशस्वी प्रकारे केले आहे. आसाम-केरळमध्ये पण थोड्या प्रमाणात हे घडते आहे. आगरकरांच्या महाराष्ट्रातले तरुण हे कसे करणार हा मात्र प्रश्न आहे. आपण महाराष्ट्रात सायन्स क्लब्सचे जाळे कसे विणू शकू; हे क्लब्स कसे व कोणते काम करतील आणि त्यात आपली स्वतःची भूमिका नक्की कोणती असेल हे विज्ञानेश्वरीच्या तरुण वाचकांनी जरूर कळवावे. विज्ञानेश्वरी त्यांचे विचार प्रसिद्ध करेल. □

---

## विज्ञानसंस्थांची जरुरी

मार्क्सच्या सिद्धांतात विज्ञान आणि तंत्रज्ञान याना समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले आहे. मात्र तरीही विज्ञान सर्वसामान्य माणसापर्यंत नेण्यासाठी माओने जे केले ते साम्यवादी राष्ट्रातही अभूतपूर्व आहे. त्याने लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी राबवलेले असे विज्ञानप्रयोगाचे लोकशाहीकरण केले. विज्ञानाच्या मूलभूत कल्पना सर्वसामान्य माणसाला समजावून देण्यासाठी त्याने आकाशवाणी, दूरदर्शन, करमणुकीची साधने या सर्वांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. सभोवतालचे प्रश्न शास्त्रीय पद्धतीने समजावून घेऊन ते शास्त्रीय पद्धतीने सोडवावयाचे लोकांना शिक्षण देण्यासाठी विज्ञानसंस्थांचे जाळे पसरवले. भारतात केरळ सोडून कोणत्याही इतर राज्याने असा प्रयत्न केलेला नाही. केरळमध्ये प्राथमिक स्वरूपात का होईना पण आज हे काम सुरू आहे. खेड्यापाड्यात पसरलेले असे दीडशेहून अधिक क्लब्स आहेत. लोकांचे प्रत्यक्ष प्रश्न हातात घेऊन, ते त्याना समजावून देऊन ते सोडवत असतानाच हे क्लब्स विज्ञान त्यात नकळत मिसळून देतात. खेड्यापाड्यातून होणाऱ्या या कार्यक्रमात प्रमुख शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, डॉक्टर्स सहभागी होतात. खेड्यापाड्यांतून होणारी प्रदर्शने, भाषणे आणि भेडसावणारे प्रश्न हातात घेऊन या संस्था काम करतात; पण चीनमध्ये हे सारे फार मोठ्या प्रमाणावर आणि सर्वसामान्य माणसाला यात सहजपणे गुंतवून ते केले जात आहे.

(प्रो. अकिल अहमद याच्या Media Asia मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'फ्लो ऑफ सायन्स अँन्ड टेक्नॉलजी इनफरमेशन.–द केस ऑफ इंडिया अँड चायना' या लेखामधून)



# मुकेश

शुभदा रानडे

त्याच्या आवाजाला मन्ना डेच्या आवाजासारखी शास्त्रीय बैठक नव्हती.

त्याच्या आवाजाला तलतच्या आवाजासारखा मखमली, हळुवार गोडवा नव्हता....

त्याच्या आवाजाला महंमद रफीच्या आवाजासारखा पहाडी बाज नव्हता....

त्याच्या आवाजाला हेमंतकुमारसारखी गहराई नव्हती....

की त्याचा आवाज किशोरकुमारच्या आवाजासारखा सहजी फिरणारा, वळणारा नव्हता....

□

म्हणजे खुल्या दिलानं दाद द्यावी असं त्याच्याकडे काहीच नव्हतं. उलट काहीसा गेंगाणा–कायम सर्दी झाल्यासारखा त्याचा आवाज पहिल्यांदा चांगलाच टीकापात्र ठरला होता. त्याच्यावर मध्येच सुरांशी फारकत घेत असल्याचाही आरोप होता; पण नेमकं बोट ठेवावं असं त्याच्याकडे काही नसलं तरी एकच गुण इतका असामान्य होता की, केवळ त्या गुणाच्या जोरावर त्याला बाकीच्या कुणाचाच शह बसू शकला नाही ! आणि तो म्हणजे साधेपणा. त्याच्या हाडामासात मुरलेला साधेपणा त्याच्या गाण्यांमध्येही तितक्याच सहजतेनं आणि अलगदपणे उतरला आणि हे सरळ साधेपणच त्याचं एक वैशिष्ट्य ठरलं–त्याला पार कुठल्या कुठे होऊन गेलं ! कारण त्यामुळं मुकेशचं गाणं अगदी सामान्यातला सामान्य माणूस, गाण्यातलं ओ का ठो कळत नसलेला माणूसही अगदी सहजी गुणगुणू शकत होता. चार क्षण सुरांच्या सहवासात घालवण्याचं त्याला समाधान मिळत होतं. त्यामुळं त्याचा आवाज ' जनता की आवाज ' झाला. एवढंच नाही तर त्याच्या गाण्यातून जाणवणारा उपजत ' दर्द ' या गाण्यांना एक वेगळीच उंची देऊन गेला. जो दर्द आम्हाला मीनाकुमारीच्या अभिनयात जाणवला, मदन मोहनच्या स्वररचनांमध्ये जाणवला तोच दर्द मुकेशच्या गाण्यात जाणवला. त्यामुळंच मीनाकुमारीच्या अभिनयाप्रमाणे, मदन मोहनच्या स्वररचनांप्रमाणे मुकेशचं गाणंही भावलं, रुचलं. का कुणाला ठाऊक पण रफी-किशोरची दर्दभरी गाणी कृत्रिम वाटतात. तलतच्या गाण्यात दुःख आहे; पण त्याला वैफल्याची–एकटेपणाची किनार आहे. मुकेशच्या गाण्यातलं दुःख-दर्द अस्सल वाटतो. दुःखालासुद्धा नजाकत असते याचा प्रत्यय देऊन जातो. त्यामुळे त्याची ' दिल ढूंढता है सहारे सहारे (काला आदमी), आँसूभरी है ये जीवनकी राहे ' (परवरीश), ' वक्त करता जो वफा (दिलने पुकारा) वगैरे सारखी गाणी जाऊन भिडली ती थेट काळजालाच ! दुःखाच्या साऱ्या छटा त्यानं आपल्या गाण्यांतून साकार केल्या. त्यामुळंच आम्ही त्याच्या गाण्यातल्या नेमक्या सुरावर बोट ठेवू शकलो नसलो तर एवढं मात्र ठामपणे सांगू शकतो की, ' आ लौटके आ जा मेरे मीत ' (रानी रूपमती) अशी व्याकुळ साद घालावी तर मुकेशनंच !' मेरे टूटे हुअे दिलसे–कोई तो आज ये पूछे के तेरा हाल क्या है ' (छलिया) असं विचारावं तर मुकेशनंच ! ' मैं तो एक ख्वाब हूँ उस ख्वाबसे तू प्यार न कर ' (हिमालयकी गोदमें) अशी समजूत घालावी तर मुकेशनंच ! ' क्या साथ मेरा दोगे ! ' (समुंदरा) अशी आळवणी करावी तर मुकेशनंच आणि ' हमने अपना सबकुछ खोया प्यार तेरा पानेको ' (सरस्वती चंद्र) अशी प्रामाणिक कबुली द्यावी तीही मुकेशनंच !

अर्थात अशा खास ' मुकेश ' छापातून गाणारा मुकेश एके काळी मात्र सैगलच्या आवाजानं इतका भारला गेला होता की, अनिल विश्वासकडे गाणाऱ्या कुंदनलाल सैगलचं गाणं ऐकताना एकच खूळ त्यांच्या डोक्यानं घेतलं–आपण ' दुसरा ' कुंदनलाल सैगल व्हायचं ! मजहर खानच्या ' अनोखा प्यार ' या सिनेमात त्यानं अनिल विश्वासाच्या निर्देशनाखाली गायलेल्या ' दिल जलता है तो जलने दो ' या गाण्यात त्याच्यावर सैगलचा किती प्रभाव होता हे दिसून येईल; पण ' अनोखा प्यार ' चा जेव्हा ट्रायल शो झाला तेव्हा समीक्षक मंडळींनी हे गाणं यातील नायकाच्या व्यक्तिरेखेला अजिबात योग्य होत नाही म्हणून गाळून टाकण्याचा सल्ला दिला होता, हे ऐकताच मुकेशला अक्षरशः रडू कोसळलं. त्यामुळं त्यानं मजहर खानकडे धाव घेतली आणि ' हे गाणं गाळू नका ' म्हणून विनंती केली. मजहर खानलाही काय करावं ते सुचेना. कारण व्यक्तिशः त्याला ते गाणं अतिशय आवडलं होतं. शेवटी एक तोडगा असा काढण्यात आला की, हे गाणं पहिल्या शोपुरतं ठेवायचं आणि प्रेक्षकांच्या प्रतिसादावर पुढचं काय ते ठरवायचं. सिनेमा संपल्यानंतर प्रेक्षक बाहेर पडले ते ' दिल जलता है तो जलने दे ' गुणगुणतच आणि या गाण्याचं सिनेमातलं भविष्य निश्चित झालं. त्यानंतर अल्पावधीतच

हे गाणं प्रचंड हीट झालं आणि हे गाणं 'सैगल' नच गायलं आहे, असा लोकाचा गैरसमज पाहून तर मुकेशला हर्षोन्माद व्हायचाच बाकी राहला होता! आपल्या व सैगलच्या आवाजात लोक करत असलेली गफलत पाहून 'जा परवाने जा' (राजपुताना) 'बदरिया बरस रही उस पार' (मूर्ती) असा मुकेश जास्तच सैगलमय होत चालला होता. अनिल विश्वासनं हे पाहलं पाहलं आणि एक दिवस मुकेशची यथेच्छ कानउघाडणी केली. त्याच्यातील स्वत्वाची त्याला जाणीव करून दिली. ज्या अनिल विश्वासनं पहिल्यांदा मुकेशला त्या चौकटीतून बाहेर काढलं, 'जीवन सपना टूट गया' (अनोखा प्यार), 'अब याद ना कर' (अनोखा प्यार) 'जमानेका दस्तूर है ये पुराना' (लाजवाब) अशा अनिल विश्वासाच्याच निर्देशनाखाली गायलेल्या गाण्यातून मुकेशनं स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवला आणि त्यामुळं मुकेशच्या संगीतकारकीर्दीत अनिल विश्वासचा फार मोठा वाटा मानायला लागेल.

## ये मेरा दिवानापन...

'है सबसे मधुर वो गीत जिन्हें हम दर्द के सुरमें गाते है' हे मुकेश आणि तलत यांच्या गाण्याचं मुख्य तत्त्व. दोघांच्याही आवाजात कुठे तरी मर्यादा होत्या. दोघानाही याची जाणीव होती. त्यामुळे त्या काळात खरी स्पर्धा मानली जायची तलत आणि मुकेशमध्येच! अर्थात स्पर्धा, उच्चनीचपणा या साऱ्या गोष्टी सामान्य लोकांच्यासाठी होत्या. खुद्द तलत आणि मुकेश यांना त्याचं सोयरसुतकही नव्हतं. त्या दोघांनीही एकमेकाचे पाय खाली ओढण्याचं गलिच्छ राजकारण कधी खेळलं नाही की, एकमेकांची छुट्टी करून टाकण्याची घाणेरडी भाषा कधी वापरली नाही. दोघानाही एकच गोष्ट माहीत होती की, स्वराशी प्रामाणिक रहायचं! त्यामुळंच तलत आणि मुकेश दोघंही आपापल्या जागावर स्थिर राहिले. 'यहुदी'च्या 'ये मेरा दिवानापन है' या गाण्यासाठी शंकर जयकिशनना तलत का मुकेश असा प्रश्न पडला होता कारण दिलीप तलतसाठी हटून बसला होता तर शंकर जयकिशनना मुकेशच हवा होता. शेवटी तलत का मुकेश म्हणून टॉस करण्यात आला आणि टॉस मुकेशनं जिंकल्यामुळं 'ये मेरा दिवानापन है' मुकेशच्या खात्यावर जमा झालं. हे तरी निदान गाण्याच्या बाबतीत झालं; पण १९५९ मध्ये सर्वोत्कृष्ट गायकाचं फिल्मफेअर अवॉर्डही तलतच्या हातातून निसटून मुकेशकडं आलं होतं कारण त्या वर्षी या पारितोषिकाच्या शेवटच्या टप्प्यात तलतचं 'सुजाता'तलं जलते है जिसके लिए' आणि मुकेशचं 'अनाडी'तल सबकुछ सीखा हमने' ही दोन गाणी निवडण्यात आली होती; पण इथेही मुकेशनं तलतवर बाजी मारली आणि 'सब कुछ सीखा हमने' बक्षीस मिळवून गेलं. अर्थात या व्यावसायिक स्पर्धेचं सावट तलत आणि मुकेश यांच्या आपापसातील मैत्रीवर मात्र कधीच पडलं नाही. मुकेशची वृत्ती 'आदमी हूं आदमीसे प्यार करता हूं' (पहचान) अशी होती. त्यामुळे मुकेश अजातशत्रू होता असं म्हणायला हरकत नाही. मुकेश अजातशत्रू होण्याची मुख्य कारणही परत मुकेशच्या गाण्यातच दडलं आहे. आपल्याला लोक बेसूर म्हणतात हे कळल्यावर 'सूरकी गती मै क्या जानूं?' असं बिनदिक्कत जाहीर करून मोकळा झाला. लता सर्वश्रेष्ठ गायिका आहे. कारण माझ्यासारख्या बेसूर आदमीबरोबरही ती इतकी छान गाऊ शकते' असं सरळ साधेपणानं त्यानं सांगून टाकलं. 'मुझे तुमसे कुछ भी न चाहिए' (कन्हैया) असं आवर्जून सांगणारा मुकेश माणसांचा इतका भुकेला होता की, 'तुम अगर मुझको न चाहो तो कोई बात नहीं. तुम किसी औरको चाहोगी तो मुश्कील होगी (दिल ही तो है) असं हळूच लोकांपर्यंत पोहोचल्याशिवाय त्याला राहवलं नाही. एवढंच नाही तर 'जो तुमको हो पसद वही बात कहेंगे' (सफर) अशी त्याच्या मनाची जपणूक करण्याची तयारीही दर्शवली; पण शेवटी बेदर्द जमानाच हा! त्यानं कधी तरी मुकेशला आपलं पाणी दाखवलंच को-पण दु:खाचे फटकारे बसले, जबरदस्त अपेक्षाभंग झाले, निराशेनं घेरलं तरी मुकेशचा स्वत:वरचा ताबा कधी सुटला नाही. त्यान कधी त्रागा केला नाही उलट 'कोई जब तुम्हारा हृदय तोड दे–तडपता हुवा जब कोई छोड दे, तब तुम मेरे पास आना प्रिये' (पूरब और पश्चिम) अशी मायेची पाखर घालायला हा आपला आपल्या हृदयाची कवाडं सताड उघडी ठेवून बसला. अगदीच असह्य झालं तेव्हा 'मुझको इस रातकी तनहाई में आवाज न दो' दिल भी तेरा हम भी तेरे) असं शांतपणे सांगून मोकळा झाला आणि अशा मुकेशची व्यावसायिकांबरोबर तर मैत्री होतीच, पण रसिकांबरोबरही होती. तो आज नसला तरी ही मैत्री मात्र अजून आहे.

पण मुकेश आणि राजकपूर यांच्यातली मैत्री मात्र काही औरच! 'गाये जा गीत मीलन के' (मेला–दिलीपकुमार), 'सारंगा तेरी यादमें' (सारंगा-सुदेशकुमार), 'दिल जलता है' (पहेली नजर–मोतीलाल) 'बहारोने मेरा चमन लूटकर' (देवर धर्मेंद्र, 'मैंने तेरे लिएही सात रंगके सपने चुने' (आनंद–राजेश खन्ना), 'कभी कभी मेरे दिलमें खयाल आता है' (कभी कभी–अमिताभ बच्चन) अशी किती तरी वेगवेगळ्या नायकांसाठी त्यानं गाणी म्हटली असली तरी मुकेशचा आवाज खरा खुलला तो राजकपूरसाठीच! 'रोमॅंटिक हिरो' म्हणून प्रसिद्धी पावलेल्या राजकपूरच्या पडद्यावरच्या प्रणयप्रसंगांना मुकेशची किती तरी गाणी साक्षी ठरली. राजकपूरनं आपल्या नायिकाना 'आ जा रे' अशी साद घातली ती मुकेशच्याच आवाजात. 'दम भर जो उधर मुंह फेरे' (आह) अशी खट्याळ चंदाला केलेली लाडिक विनवणी, 'आंसू भरी है ये जीवनकी राहे' (परवरीश) अशी कडवट व्यथा, 'दोस्त दोस्त ना रहा' (संगम) असा अपेक्षाभंग, 'अे सनम जिसने तुझे चांदसी मूरत दी है, उसे मालिकने हमें भी तो मुहोब्बत दी है' (दिवानी) अशी हळवी बतावणी, 'जीना यहाँ मरना यहाँ' (मेरा नाम जोकर) अशी विकलता असे अनेक भावाविष्कार मुकेशच्या गाण्यातून सहजी व्यक्त झाले. 'मुकेश तो मेरी रूह है' असं राज म्हणाला ते उगाच नाही. मुकेश–शैलेन्द्र, शंकर जयकिशन, राजकपूर ही आर. के. च्या आवारात जमलेली एक अफलातून चौकडी! शैलेन्द्रचे मधाळ शब्द, शंकर जयकिशनचे वेड लावणारे सूर, मुकेशचा दर्दभरा आवाज आणि राजकपूरचा लाजवाब अभिनय–असे चार रंग एकमेकात मिसळून किती स्वरशिल्पं साकार झाली ते मोजताच येणार नाही! 'तुम जो हमारे मीत ना होते' (आशिक), 'कोई नही मेरा इस दुनियामें' (दाग), मुझे तुमसे कुछ भी न

चाहिए' (कन्हैया), 'दुनिया बनानेवाले' (तीसरी कसम), 'होठोंपे सच्चाई रहती है' (जिस देशमें गंगा बहती है), 'ओ मेहबूबा' (संगम) असे किती तरी खळाळते स्वर आपोआप ओठांवर घोळायला लागतात.

मुकेश गेला तेव्हा त्याची आठवण सागताना दिलीपकुमार म्हणाला होता, 'मेला'-मधलं मुकेशनं गायलेलं 'मेरा दिल तोडनेवाले' हे गाणं मी ऐकलं आणि मी इतका खूश झालो की, पुढचा-मागचा कुठलाही विचार न करता मी हा सिनेमा स्वीकारला आणि हाच दिलीप 'अंदाज'च्या वेळी मुकेशच्याच गाण्यावर अडून बसला होता. 'टूटे ना दिल हमारा टूटे ना', 'हम आज कही दिल खो बैठे', 'झूम झूमके नाचो आज', 'तू कहे अगर' ही मुकेशची गाणी लताच्या 'उठाए जा उनके सितम' किंवा 'तोड दिया दिल मेरा' पुढे फारच फिक्की वाटतात, असं त्याचं म्हणणं होतं. साहजिकच सिनेमात आपल्या वाटघाला सगळं बेस्ट तेच आलं पाहिजे असा हट्ट असणारा दिलीप या गाण्यामध्ये बदल घडवून आणला जावा-अशी मागणी करत होता; पण नौशादनं कशीबशी दिलीपची समजूत काढली आणि नौशादचा अंदाज खरोखरच अगदी खरा ठरला. लताच्या बरोबरीनं मुकेशची गाणी गाजली, एवढच नाही तर आजही 'अंदाज' म्हटल्यानंतर पहिल्यादा मनात रूंजी घालायला लागतं ते 'तू कहे अगर जीवनभर...' त्यानतर 'मधुमती'च्या वेळेसही दिलीपकुमारसाठी हेमंतकुमारचा आवाज वापरायचं चाललं होतं; पण शैलेन्द्रनं सलिल चौधरीला मुकेशचं नाव सुचवलं आणि 'मधुमती'तली 'सुहाना सफर और ये मौसम हँसी', 'दिल तडप तडपके कह रहा है आभी जा' वगैरे सगळया गाण्याचं मुकेशनं अगदी चीज केलं!

नौशाद आणि मुकेश यांचं ट्यूनिंगही चांगल्यापैकी जमलं होतं. 'मेला', 'अनोखी अदा', 'अंदाज' या तिन्ही सिनेमातली गाणी गाजली. 'मेला'मधलं 'धरतीको आकाश पुकारे' हे पहिल्यांदा पूर्ण गाणं अस नव्हतंच; पण मुकेशनं म्हटलेल्या या दोन-तीन ओळीवरच नौशादमियाँ इतके काही बेहद्द खूश झाले की, त्यानी 'धरती को आकाश पुकारे'याचं पूर्ण गाणं करून सिनेमात घातलं. 'अंदाज'च्या वेळेसही नौशाद मुकेशची बाजू घेऊन दिलीपला पटवून देत होते. दोघाचे लागोपाठ तीन सिनेमे हीट गेले होते; पण सगळं काही सुरळीत चाललं असताना नौशाद आणि मुकेश यांचे सूर कुठे बेसूर झाले कुणास ठाऊक? पण 'अंदाज'-नंतर नौशादनं मुकेशकडे पाठ फिरवली. आधी आधी मुकेशला नावं ठेवणाऱ्या सर्व संगीतकारांनी नंतर नंतर एक दोन वेळा का होईना पण मुकेशला चान्स दिलाच!

'मुकेशला जरा अवघड चाल दिली की, त्याचा गडबडगुंडा उडतो' असं म्हणणाऱ्या मदनमोहनकडं मुकेशनं, 'प्रीत लगा के मैने ये फल पाया' (आँखे), 'हम चल रहे थे' (दुनिया ना माने), 'भूली हुई यादों' (संजोग) अशी हाताच्या बोटांवर मोजण्याइतपत गाणी गायली; पण या गाण्याचा मदनचं संगीत आणि मुकेशची गाणी दोन्हीबद्दल बोलताना-लिहिताना आवर्जून उल्लेख केला जातो. मदन मोहनसारख्या अवघड संगीतकाराकडेही मुकेश यशस्वी ठरला होता एवढं सांगितलं तरी पुरे आहे; पण तरीही मदन मोहननं मुकेशकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केलं आणि तो तलतमध्येच गुंतत गेला. मुकेशला 'बेसूर' अशी पदवी बहाल करणाऱ्या सी. रामचंद्रनं 'शारदा'तलं 'जप जप रे' गाणं दिलं ते केवळ राजकपूरच्या इच्छेखातर. 'तुम्हारे लिए हुए बदनाम' (शबनम),'तू महलमें रहनेवाली'(शबनम), 'चल री सजनी अब क्या सोचे' (बंबई का बाबू), 'ओ जानेवाले हो सके तो लौटके आना' (बंदिनी) अशी एस. डी. ची अनेक गाणी मुकेशनं अजरामर करूनही गायक म्हणून मुकेश एस. डी. ला कधीच भावला नाही. ('A fine man but not such a fine singer.') हे एस. डी. चं मुकेशबद्दलचं मत कधीच बदललं नाही आणि त्यामुळं एस. डी. नं मुकेशला अडगळीतच टाकला; पण जवळजवळ प्रत्येक संगीतकारानं मुकेशला हाताळलं आणि मुकेशन त्यांच्याकडे गायलेल्या मोजक्याच गाण्याचं सोनं झालं; हा प्रकार फक्त मुकेशच्याच बाबतीत बघायला मिळतो. कारण तसं पाहायला गेलं तर सगळेच गायक सगळया संगीतकाराकडे गायले; पण त्याची सगळीच गाणी गाजली नाहीत. आज बघायलाच गेलं तर त्याच्या हजारो गाण्याच्या संग्रहातून बराचसा कचराही निघेल; पण मुकेशच्या बाबतीत तसं घडलं नाही. 'चल अकेला चल अकेला' (संबंध-ओ.पी.नय्यर), 'किस्मत बिगडी दुनिया बदली' (अफसाना-हुस्नलाल भगतराम), 'अंग्रेजी छोरा चला गया' (मजबूर-गुलाम हैदर), 'आवाज है ये प्यारकी' (अंधःकार-हंसराज बहेल), 'जिंदा हूँ इस तरहासे गमें' (आग-राम गागुली), 'दो रोजमें वो प्यारका आलम गुजर गया' (प्यार की राहे-कानु घोष) अशी किती तरी उदाहरणं घडाघड सागता येतील.

## भूली हुई यादों....

पण मुकेश, अनिल विश्वास, रोशन आणि कल्याणजी आनंदजी आणि शंकर जयकिशन या चार संगीतकारानी सर्वार्थानं फुलवला. नौशाद, सी. रामचंद्र, मदनमोहन यानी एखाद-दुसऱ्या वेळा वापरून मोडीत काढलेला मुकेश रोशननं अगदी पुरेपूर वापरला. 'ओह रे ताल मिले नदी के जलमें' (अनोखी रात), 'बहोत दिया देनेवालेने तुझको' (सूरत और सीरत), 'सताएगा तू किसे आसमाँ, जब हम न होंगे' (श्रीराम), 'तेरी दुनियामें दिल लगता नही' (बावरे नैन) या सगळ्याच गाण्यानी मुकेशभक्तांना खूळ लावलं. खय्यामच्या 'वो सुबहा कभी तो आएगी' या मुकेशनं गायलेल्या गाण्यानं एक भयंकर क्रेझ त्या काळात निर्माण झाली होती. खय्यामच्या दृष्टीनं मुकेशचे दोन मुख्य गुण म्हणजे हिंदी व उर्दू भाषेवरचं प्रभुत्व आणि गाण्यात भाव उतरविण्याची सहजसाध्य कला! 'हमसे जो, होती मुहोब्बत तुमको' (मोहब्बत इसको कहते है), 'सब ठाठ पडा रह जावेगा'(संकल्प), 'मै पल दो पलका शायर हूँ' (कभी कभी). अशा गाण्यांनी मुकेश रसिकावर चांदणं बरसवत होता.

कल्याणजी-आनंदजी हे एक नाव मुकेशची गाणी आठवताना आवर्जून घ्यायला लागतं. त्यामुळं त्यानी मुकेशलाही आपल्याकडे गाण्याची संधी दिली आणि मुकेशच्या आवाजावर ते असे काही खूष झाले की, पुढे पुढे त्याना प्रत्येक गाण्यासाठी मुकेशच लागत होता. 'मैं तो एक ख्वाब हूँ' (हिमालयकी गोदमें), 'चाँदसी मेहबूबा हो मेरी कब' (हिमालयकी गोदमें), 'चादीकी दिवार ना तोडी' (विश्वास), 'तुम्हें जिंदगी के

उजाले मुबारक' (पूर्णिमा), 'चंदनसा बदन चंचल चीतवन' (सरस्वती चंद्र), 'जिस दिलमें बसाया प्यार' ( सहेली ), 'वक्त करता जो वफा' (दिलने पुकारा), 'मेरे टूटे हुए दिलसे' ( छलिया ). ही सगळी गाणी हिंदी सिनेसंगीतात एक वेगळाच आविष्कार घडवून गेली.

मुकेश बेसूर आहे—अशी मुकेशच्या बाबतीत भल्याभल्यांनी आरडाओरड केली असली तरी एस. एन. त्रिपाठीसारख्या संगीतकाराने मात्र शास्त्रीय संगीतावर आधारित असलेल्या 'संगीतसम्राट तानसेन' मधली गाणी मात्र मुकेशलाच दिली हे त्यांचं फार मोठं धाडसच मानावं लागेल. 'झूमती चली हवा' ( संगीतसम्राट तानसेन ), आ लौटके आजा मेरे मीत (रानी रूपमती), 'मतवाली नार ठुमक ठुमक चली जाए' ( एक फूल चार कांटे ) यासारखी शास्त्रीय बैठकीवरची गाणी अशा सफाईत गाऊन गेला की बस ! सरदार मलिक 'सारंगा' तल 'सारंगा तेरी यादमें' हे गाणं मुकेशच्या आवाजात रेकॉर्ड करून घेत होते, तेव्हा या गाण्यात दोन ठिकाणी त्यांना मुरका हवा होता; पण मुकेशच्या गळयानं असहकार पुकारला. काही केल्या त्याचा आवाज वळत नव्हता. सकाळी सुरू झालेलं रेकॉर्डिंग रात्र झाली तरी संपलं नव्हतं. सरदार मलिक मुकेशला पुन्हा पुन्हा गायला लावत होते आणि मुकेशही पुन्हा पुन्हा न कंटाळता रिहर्सल करीत होता. या दोघांचा प्रचंड स्टॅमिना पाहून वादकांना नाही म्हणायची सोयच उरली नव्हती. शेवटी आता ही शेवटचीच रिव्हर्सल असं ठरवण्यात आलं आणि काय आश्चर्य ! मुकेशच्या गळयातून सरदार मलिकला हवे तसे सूर झिरपले आणि सरदार मलिकनं मुकेशला अक्षरशः मिठी मारली ! एका सुराच्या वेडयानं एका सुराच्या पूजकाला दिलेली ती अप्रतिम 'दाद' होती आणि क्षणार्धात मुकेश दिवसभराचे श्रम विसरला !

जसजसा काळ बदलत होता, सिनेसंगीतात आर. डी. बर्मन, बप्पी लाहिरी वगैरे मंडळी धांगडधिंगा घालायला लागली तेव्हा मुकेशनं सुज्ञपणे व्यावसायिक तडजोड स्वीकारली. 'मुफ्त हुए बदनाम' ( बारात ), 'नैना है जादूभरे' ( बेदर्द जमाना क्या जाने), 'तेरी याद दिलसे भुलाने चला हूँ' ( हरियाली और रास्ता ), 'ये वादा करो चाँदके सामने' ( राजहट ) अशी सगळं विसरायला लावणारी गाणी म्हणणारा मुकेश 'मैं ना भूलूंगा' (रोटी, कपडा और मकान), 'इक दिन बिक जाएगा' ( धरम-करम ), 'जय बोलो बेईमानकी ( बेईमान ), गंगारामकी समक्षमें ना आए ( पहचान ), 'मेरे माँ मुझे बचालो ( संन्यासी ) असली गाणी म्हणायला लागला तेव्हा अक्षरशः कान झाकून घ्यावेसे वाटले. चार-चार हार्ट अॅटॅक्स येऊन गेले तरी मुकेश गात होता. अर्थात 'जाने कहाँ गए वो दिन' ( मेरा नाम जोकर ) सारख्या गाण्यातनं त्याची ही खंत अधूनमधून वर डोकं काढतच होती; पण 'किसीकी मुस्कुराहटोंपे हो निसार, किसीका दर्द मिल सके तो ले उधार, किसीके वास्ते तो तेरे दिलमें हो प्यार-जीना इसीका नाम है'—असं जीवनाचं सूत्र बाळगणाऱ्या मुकेशच्या ओठावरचं हसू मात्र शेवटपर्यंत तितकंच प्रसन्न होतं आणि 'तेरी दुनियामें दिल लगता नही' असं म्हणत मुकेशनं या जगाचा निरोप घेतला तो सुरांच्या सहवासातच आणि परलोकीची वाट धरली ती सुराच्या हातात हात घालूनच ! □

( मृत्युदिन : २७ ऑगस्ट १९७६ )


जॉन मॅकेन्रो आता कफल्लक होत चाललाय. एखाद्या वैभवशाली घराचे
वासे फिरल्यावर घरच्या लक्ष्मीचे दागिने गहाण पडतात
तसं त्याच्याबाबतीत दुर्दैवाने होत चाललंय.
टेनिस जगात जिंकलेली प्रत्येक स्पर्धा हा एक अलंकार असतो.
मॅकेन्रोचे हे अलंकार आता इतरांकडे गहाण पडत चाललेत.
एखादा विलासकडे आहे.
काही इव्हान लेंडलकडे.
आणि सर्वात मौल्यवान असा विंबल्डनचा रत्नहार – जो बियॉन
बोर्गकडून हिसकावून घेण्यासाठी त्याने जीवाचा केवढा आटापिटा केला
होता – तो जिमी कॉनर्सच्या खजिन्यात आज विसावला आहे.
यु. एस. ओपनचा अलंकार मात्र आज त्याच्याकडे आहे.
तो त्याच्याकडेच राहणार का दुसऱ्या कोणाकडे जाणार
याचा निर्णय आता याच महिन्यात होणार आहे.

# जॉन मॅकेन्रो – हेलकावणारं जहाज

## पुढील अंकात द्वारकानाथ संझगिरी यांचा खास लेख

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11)



# पावसाळ्यात माझें छत गळत असे.

- किती त्रासदायक होते ते दिवस. चार थेंब आले तरी झोपडीत पाणी येई. उन्हाळ्यात गरम वारा लहान मुलांचे हाल करी. थंडीत गारठ्याने हुडहुडी भरून येत असे.
- आज माझं स्वतःचं लहानसं घर आहे. लहानसं शेत आहे. कोणाचा वरचष्मा नाही. जेव्हा एवढं सुख मिळालं आहे तेव्हा पुढेहि मिळेल.
- १९८० च्या मार्चपर्यंत देशात ७७ लक्ष कुटुंबांना घरे बांधण्यासाठी जमीन देण्यात आली. त्यापैकी ५ लक्ष ६० हजार लोकांनी स्वतःची घरे उभारली आहेत. जवळ जवळ १ कोटि ४० लक्ष लोकांना घरे बांधण्यासाठी मदत देण्यात येण्यार आहे.
- १३ लक्ष भूमिहीनांना शेतीसाठी जमीन देण्यात आली.

सविस्तर माहितीसाठी खालील कूपन भरून पाठवा.

श्री. आर. के. जॉली
असिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर
रिजनल डिस्ट्रिब्यूशन सेंटर
२३, सिदपुर इंडस्ट्रियल इस्टेट्स
हलाव पुल, मसरानी लेन
कुर्ला, मुंबई–४०००७०

नव्या २० कलमी कार्यक्रमाच्या माहितीसाठी कृपा करून मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

नाव.........................................
पत्ता.........................................
.................................पिन...............

## नवा २० कलमी कार्यक्रम

**गरिबी हटविण्याचा हा एक प्रभावी उपाय आहे.**

davp 82/190